विषय
सं. क्र. 3272

मीण पत्रकारिता

सुधीर गव्हाणे

या मेळाव्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न, पाटबंधारे प्रकल्प, भागडाचारी, वांबोरी चारी, निळवंडे धरण, रब्बी, ज्वारी, हरभरा, गहू यासाठी मुळा, भंडारदरा व गोदावरी कॅनॉलचे पाणी शेतकऱ्यांना मिळावे, पाटबंधारे खात्यातील अधिकाऱ्यांकडून होणारा पाण्याच्या , भावना थांबवाव्या , सोडवावे

REFBK-0025583

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 JUN 1998

21 APR 1991

10 JUL 1988

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ निबंध

३२५८
२५५८३
२८७८८

ग्रामीण पत्रकारिता

(समकालीन ग्रामीण महाराष्ट्राच्या समस्यांवरील रिपोर्टस्)



सुधीर वामनराव गव्हाणे

अधिव्याख्याता,

वृत्तपत्रविद्या विभाग, मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद (महाराष्ट्र)

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६००८

"ग्रामीण पत्रकारिता"
समकालीन ग्रामीण
महाराष्ट्राच्या समस्यावरील
रिपोर्टस्

"GRAMIN PATRAKARITA"
Collection of reports on
issues contemporary
Maharashtra.

सुधीर गव्हाणे

SUDHIR GAVHANE

प्रकाशन क्रमांक/८२

प्रथम आवृत्ती / डिसेंबर १९८७

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४/अ
नलवडे कॉलनी – सम्राटनगर
सागरमाळ, कोल्हापूर– ४१६ ००८

मुद्रक
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस
नागाळा पार्क–कोल्हापूर. ४१६ ००३
फोन नं २३९०६

मुखपृष्ठ रेखाटने व आतील रेखाटने : प्राचार्य एस्. एस्. शिंदे, कला महाविद्यालय, शिवाजीनगर बीड.

मुखपृष्ठ / यु. बी. जोशी

ब्लॉक / उदय प्रोसेस, कोल्हापूर

मूल्य रुपये ३०/–
प्रती : ११००

© प्रा. शुभांगी गणपतराव गोटे
अधिव्याख्याता, समाजशास्त्र विभाग
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
२० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर– ४१६ ००८

माझ्या केवळ ' शब्दांच्या ओळखीवर ' मराठी पत्रकारितेमध्ये निरपेक्षभावनेनं प्रोत्साहन देणाऱ्या या आदरणीय सग्यासोयऱ्यांना श्रद्धापूर्वक अर्पण - - !

- रंगा वैद्य, संपादक, दै. संचार, सोलापूर.
- दत्ता सराफ, माजी संपादक, सा. मनोहर पुणे.
- श्री. भा. महाबळ, संपादक, सा. मनोहर, पुणे.
- दिनकर गांगल, उपसंपादक, दै. महाराष्ट्र, टाईम्स मुंबई.
- मुकुंदराव किर्लोस्कर, माजी संपादक, किर्लोस्कर पुणे.
- श्याम मोकाशी, माजी संपादक, सा. मराठी ब्लिट्स, मुंबई
- रत्नाकर पंडित, कार्यकारी संपादक, दै. अजिंठा, औरंगाबाद.
- म. य. उर्फ बाबासाहेब दळवी कार्यकारी संपादक दै. लोकमत, औरंगाबाद.
- राजेंद्र दर्डा, संपादक, दै. लोकमत, औरंगाबाद.

सुधीर गव्हाणे

REFBK-0025583

प्राशब्द

पत्रकारितेच्या क्षेत्राचं आकर्षण मला तसं शाळेत असल्यापासून होतं. या क्षेत्रात जावं, लिहावं असं सतत वाटत राही. १९६९-७० च्या दरम्यान वाचकांच्या पत्रव्यवहारानं नि छोटचा टिपणांनी माझा पत्रकारितेचा प्रवास सोलापूरच्या संचार दैनिकातून सुरू झाला. तीन-चार वर्षातच मला या वृत्तपत्रीय लेखनाच्या क्षेत्रात जम बसविता आला. पत्रकारितेविषयी कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना मी या क्षेत्रात पाय रोवू शकलो. १९७३ ते १९८२ या दहा वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रातील महाराष्ट्र टाईम्स,

मनोहर, दिनांक, मराठी ब्लिट्झ, किर्लोस्कर, स्त्री, योजना, हेमांगी, संचार, लोकमत, अजिंठा, गावकरी, मराठवाडा, सकाळ या नामांकित वृत्तपत्रातून स्तंभलेखन, रिपोर्टस्, लेख या माध्यमातून लेखन केले. माझ्या या लेखनामधील निवडक रिपोर्टस् मी या पुस्तकाद्वारे एकत्रित करीत आहे. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारेच हे रिपोर्टस् आहेत.

या रिपोर्टस्मध्ये ग्रामीण महाराष्ट्राला भेडसावणारा रौद्र दुष्काळ आहे, ग्रामीण आयाबहिणींना पाण्यासाठी अनवाणी दाही दिशा फिरवणारा पाणी प्रश्न आहे, गरीब शेतकऱ्यांना लुबाडणारा सावकारीचा अवशेष 'फिरबोलीचा बयनामा' आहे, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही सबंध गावच्या नारुसारख्या रोगांना ग्रस्त झाल्याची ग्रामीण आरोग्य वास्तवता आहे, नामांतर दंगलीनंतर झालेल्या विषमता निर्मूलन परिषदेचा पारितोषिक प्राप्त रिपोर्ट आहे, पारधी समाजाचं गाजलेलं ढोकी हत्याकांड आहे नि त्यांचं जगणं आहे, दलितांवरील बहिष्कार आहे, व ग्रामीण कॉलेजमध्ये शिकणाऱ्या नव्या पिढीचे अंतरंगही आहेत. समकालीन ग्रामीण जनजीवनाचे विविध पदर माझ्या अल्पकुवतीनं मांडण्याचा हा प्रयोग वाचकांसमोर एकत्रित देताना आनंद होतोय.

या पुस्तकास मराठवाडा विद्यापीठाने ३००० रु. चे अनुदान दिल्याबद्दल व अल्पावधित हे पुस्तक सुबकरित्या प्रसिद्ध केल्याबद्दल मी विद्यापीठ व प्रचार प्रकाशनचे गवळी बंधू यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या पुस्तकासाठी आशयधन मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल प्रतिभाशाली कलाकार श्री. यु. बी. जोशी व प्रत्ययकारी रेखाटनांबाबत प्राचार्य एस्. एस्. शिंदे यांचा मी कृतज्ञ आहे. श्री. रमेश राऊत यांनी मुद्रणप्रत करून देण्याचे काम केले त्यांचेही आभार !

३१ डिसेंबर १९८७ **सुधीर गव्हाणे**

औरंगाबाद

The author acknowledges his indebtedness ot the MARATHWADA UNIVERSITY for the Grant-In-Aid Eeceived from the University towards the cost of publication of this book."

अनुक्रम

१) दुष्काळ

२) घोटभर पाण्यासाठी

३) मराठवाड्यातील गुलाम

४) ढोकी हत्यांकाड

५) नारूग्रस्त आख्खे गाव

६) कणाचं सामर्थ्य मणाचं करावं

७) बार्शीचे साहित्य संमेलन

८) दु:ख पेलण्या एवढे !

९) इथे दु:खांना बांध नाही

१०) ग्रामीण युवकांच्या मनाची
कवाडं ठोठावली तेव्हा.

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
दा. क्र. 3245
दिनांक 24.4.83

दुष्काळ

(१९ लाख माणसं, १४ हजार खेडी!)

' शापित ' तुम्ही वाचलीत? ही अरुण साधूंची कादंबरी. एका दुष्काळी अल्पभूधारक शेतकऱ्याची नि त्याच्या कुटुंबियांची झालेली वाताहत वाचली की, व्याकूळ व्हायला होतं. त्यातली वामन, रुक्मीणी, नानी, ज्ञानोबा, सारजा, तुकाराम ही सारी पात्रं म्हणजे दुष्काळानं फाटावं तशी फाटलेली–तुटलेली पात्रं मला चक्क भेटली. मी त्यांच्याशी बोललो. त्यांचं दुःख ऐकलं आणि हो सारी पात्रं सिनेमात जसा डबल रोल असतो किंवा आरशांच्या विविध रचनेनं जशी माणसाची अनेक रुपं दिसतात, अगदी त्याप्रमाणं मला शेकडो वामन भेटले, रुक्मीणी दिसल्या, नानीसारख्या म्हाताऱ्या बोलल्या, नि ज्ञानोबा–सारजासारखी कष्टानं खंगलेली कष्टकरी पात्रंही दिसली. ' शापित ' असणारी ! निसर्गाच्या नि उपेक्षेच्या छत्राखाली कुजून जाणारी! आपली माणूसकी हरवून बसलेली! त्यांचं हे शापितलेपण जिवंत अवतरलेलं पाहून मीही सुन्न झालो.

'रिंगणवाडचा' नजरेखाली घातल्या. नि उस्मानाबाद जिल्ह्यातील शेकडा सावरगावच्या संत तनपुरे महाराजांच्या मोफत अन्नछत्रात मी शापितातला नारायणबाबांचा आश्रमही पाहिला . . . शापितमधील

बीड जिल्ह्यातील रिंगणवाडीप्रमाणं आज मराठवाड्यात चौदा हजार खेडी रिंगणवाडीच्या रूपात जगताहेत. काही खेडी तर त्याहूनही भीषणता-दाहकता सहन करताहेत. आणि उभ्या मराठवाड्यातील सुमारे १९ लाख 'शापित पात्रं' मरणप्राय जीवन जगताहेत. संतांची भूमी असणाऱ्या आमच्या मराठवाड्यातील वारकरी पंथीय शेतकरी-मजूर पंढरीच्या दर्शनाला दिंडीत जायच्याऐवजी कामाच्या शोधात पोटार्थी, दिशाहीन दिंड्यांनी फिरताहेत, रानोमाळ-गावोगाव-राज्योराज्य. मैलोगणती पोळत्या उन्हात पायपीट करीत ! त्यांना पायात वहाणा नाहीत, पाय ह्याच त्यांच्या चपल्या. डोक्याला त्यांच्या उन्हापासून बचाव करणारी ना छत्री आहे ना टोपी आहे. उघडंबोडकं डोकं. डोळ्यांना त्यांच्या गॉगल वगैरे प्रकार असतो हे माहितच नाहीय . . . पाच मिनिटं टोपी, गॉगल नि चप्पल घालून भर रणरणत्या उन्हात फिरलं तर " काय बुआ भीषण उन्हाळा ? कठीणय बुआ ? असा उन्हाळा पाहिला नाही, चल पाहू कोकाकोला घेऊ या ! " असं म्हणणाऱ्या आपल्या शहरी सुरक्षित मानसिकतेला कामाविना भर दुपारी, उपाशी-तापाशी पोटी, लेकराबाळांसहीत, सामाना-सुमानाच्या गाठोड्यासहीत फिरणारी हजारो माणसं आपलीच भावंडं आहेत याची आपल्यालेखी नोंद आहे ? विस्तवाच्या पोळत्या जळदारप्रमाणं पोळतं उन्ह सहन करीत आठ तास रोजगार हमीवर राबून ' ३ रुपड ' कमावणाऱ्या नि रात्री तीही न मिळणाऱ्या मजूरांच्या झोपड्यातल्या चुलीला जाऊन विचारा, " किती दिवस ती बंद आहेय ? " विचारा, त्यांच्या लक्षावधी हाडांच्या सांगाड्यांना, बकाळीला लागलेल्या उपासपोरांना, ' किती दिवसांचे ते वनवासी आहेत म्हणून ? ' विचारा, त्यांच्या लेकराबाळांना, " बाळ, चॉकलेटचं नाव ऐकलंस? " उत्तर तर ' नाय ' येईलच पण ' भाकरी कधीपासून खाल्ली नाही ? ' या प्रश्नाला उत्तर येईल, " उपाशी व्हाव आठ दिस . . कण्या भिजून खाताव नसता उपाशी बसताव. ढोरं दुधू बी दिनात पेयाला " शिक्षणापासून दारिद्र्यामुळ आनंद हरवून बसलेली ही लक्षावधी " बालकं " आपल्याच महाराष्ट्र भूमीची 'लेकरं' नं ? एखाद्या वर्षातील, एखाद्या महिण्यातील एखादा दिवस पाणी

नळाला आलं नाही तर बोंबाबोंब (बेंबीच्या देठापासून, काय ही नगरपालिका ? वगैरे) करणारे, वृत्तपत्रांचे रकाने भरविणारे तुम्ही–आम्ही पाहिलंय, " घोटभर पाण्यासाठी दोन मैल अनवाणी चालून वाटीनं खरडून पाणी भरनं ! " पाण्याविना या व्याकूळ संतभूमीतील वारकऱ्यांना कोणता ' नाथ ' घोटभर पाणी देणाराय ? सांगा, आपणच सांगा. लोकशाही राज्यातील या लक्षावधी खेड्यापाड्यात राहणाऱ्या या 'रामाना' हा वनवास किती चौदा वर्षांचा राहणाराय? . हा वनवास त्यांना पिढ्यान्‌पिढ्यांचा, वर्षानुवर्षांचा. त्याला ना मुदत, ना संपण्याचा शुभशकून ! कुठलेही ' पिक ' आलं नसताना भूकेच भरघोस ' पिक ' घेऊन ही शेतकरी–कामकरी माणसं जगताहेत कशीबशी.

" तृप्त पोटांना इथे बरसात भोजनांची असे
भुकेच्या भरघोस पिकाला जळणे. जळत राहणे असे "

ही जळणारी,जळत राहणारी माणसं जगताहेत. मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागात. त्यांची ती जळती वेदना पहायाचं ठरविलं. टिपायचं ठरविलं. जळतं लाकूड जळावं तशी माणसं जळताना पाहायला निघायचं ठरविलं आणि निघालो मराठवाड्यातील दुष्काळी टापूत - - -

० ० ०

अहमदपूर तालुक्याला पोहचलो. उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळाच्या कित्येक वर्षांच्या फेऱ्यानं कंगाल झालेला हा तालुका - - - तसाच शेजारचा उदगीर, निलंगा, कळंब, भूम सर्वांची तीच हालत. सर्वाधिक अहमदपूर– उदगीरची ! बस स्टॅंडवरच उसाच्या दुकानी बैठक बसली. कुणीबी पेपरवाले आमच्या दु:खाला वाचा फोडत नसताना 'मनोहर' फोडतोय याचं सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान दिसणारं, काही तरी न्याय मिळेल ही अपेक्षा. सार्वजनिक कार्यकर्ते ॲड. शिवाजीराव देशमुख, तळमळीचे शेतकरी नि शिक्षक दत्तात्रय उगोले गुरुजी, शेतकऱ्यांची हालत पाहून व्याकुळलेला सुशिक्षित एम. ए. मराठी होऊनही बेकार राहिलेला तरुण देवीदास मंदाडे, शरणकुमार लिंबाळे, भगवान चाटे गुरुजीही सोबत बसलेले. चर्चा सुरू झाली.

शिवाजीराव म्हणाले, " पंचवीस हजारावर मजूर जगायला गेलेत. शासनयंत्रणा ढीली आहे. धान्य नाही. . . मजूरांना कामं नाही. कवर हा तरास होणार ? आता बघा, जनता लई त्रासून गेलीय. "

" काम नाहीच का अजिबात ! " विचारल्यावर देवीदास मंदाडे म्हणाला, " कामं हायत पर फार कमी. काम ५०० मजुराचं तर हजार–दोन हजार लेबर येतोय. बरं काम असतंच तर बाहेरगावी जगायला लोक कशाला गेलं असतं लेकराबाळासहित? हे बघा. तुम्हाला गावांची नावंच सांगतो की. मुळकी उंबरगा, माकेगाव, सूकणी, तेलगाव, नायगाव, नागठाणा, बेलगाव, थोडगा, सुमठाणा, नांदूर (बु.), उंबरगा, कोर्ट, यल्लादेवी उंबरगा, फत्तेपूर, लिंगदाळ, अलगरा, आजनसोंडा, कुमठा (बु.), चापोली.... मंदाडेंनी गावांची लांबलचक यादी सांगितली, गावागणीस शेपन्नास लेबर जगाय गेलयंच–"

खुद्द मंदाडेच्या गावचाच किस्सा त्यानं सांगितला. त्याचं गाव तेलगाव आहे. गावातील दलित– सवर्ण बाहेर गुजरातेत जगायला गेलेत. गुजरातला गेलेल्या नारायण मांग या दलित मजूरानं म्हाताऱ्या आईला गावी ठेवलेलं, पण ती गेली. आठ–धा दिवसांनी निरोप गेला. एकटाच गुजरातेत लेकराबाळांना सोडून आला. मौतीचं कार्य उरकल्यावर! कुणालाही सोबत आणू शकला नाही. कारण भाड्याला पैसे कुठायत? पिकपाण्याबद्दल विचारलं असता विळेगावचा मुरारी डुब्बेवार नि थोडग्याचा मार्तंड केंद्रे लगेच उत्तरले की, " ७२ पेक्षा वाईट हाल हायत. पिकपाणी कायबी न्हाई. चाळीस चाळीस एकरवाल्याला खायला हायब्रीड न्हाई.पाणीच पडलं न्हाई. जनावरास्नी कडबा न्हाई. उठवणीला यायल्यात जनावरं! शेतकऱ्याला आता पुढच्या पेराला बी–बियाणं न्हाई. होतं ते खाऊन टाकलं! खायालाच न्हाई तर बियाला कुठलं ? आता हे बघा, दिवाळीपस्तोर तरास हाय. कडब्याला अन् बियाण्याला तगाई पाहिजे. मजुरांना काम पाहिजे. राशनवर धान्यबी मिळत न्हाई, तेल मिळत न्हाई. पुसू नका असं हाल हायत शेतकऱ्याचं! जगावं की मरावं कळना! "

अहमदपूर तालुक्याचे एक सार्वजनिक कार्यकर्ते ॲड. वासुदेवराव मुंढे म्हणाले की, " तालुक्याला दुष्काळ जाहीर केलाय फक्त

कागदोपत्री ! प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडलं नाही . . ” तर व्यापारी वर्गातले गणेशलाल ओसवाल, बापूसाहेब सुर्यवंशी, रामनिवास भुतडा म्हणाले की, “ दुष्काळामुळं आमचाही धंदा भयंकर ‘ स्लॅक ’ चाललाय. सुगीवरच्या बोलीवर ज्यांना उधार कापडं दिली त्यांना पैसे मागावे कुठून ? आता नवीन उधारीनं देणंही शक्य नाही आणि रोखीनं तर शेतकऱ्याजवळ पैसा नाही. फार वाईट हाल आहेत आमचेही दुष्काळामुळं ! ” एक दिड तासांच्या या गप्पा थांबवल्या. कारण प्रत्यक्ष खेडचावर जायचं होतं. आंखो देखा “ हाल ” पाहायचं होतं. ॲड. रघुनाथराव मुंढे या तरूण वकील मित्रानं मोटार सायकलवर न्यायचं कबूल केलं. गाव पक्कं केलं. सोबत सुभाष गायकवाड हा फोटोग्राफरही होताच.

० ० ०

मोटारसायकलवर गोथाळा गाठलं. हे मुंढेचं गाव. रस्त्यावरून यताना एक छोटी नदी ओलांडावी लागली. नदीत पाणी होतं. नदीला पाणी कसं काय ? विचारता कळलं की, सुकणी टँक झाल्यामुळे पाणी आहे. गोथाळचातील शेतकरीही हवालदील होऊन बसलेले. काही पिकलं नाही. बियाणं न्हाई, जनावरं विकली, काय करणार ? खायला घालायला कडबा न्हाई. कडबा १२५ रु. झालाय. पेंडील १ रुपया ते १.२५ रु. पडतोय. लोक बाहेर गावी जगायला गेलेत. जमल तिथं, मिळल तिथं. ”

आम्हाला पुढे बेळगावला जायचं होतं. गोथाळचात चहापाणी झालं नि माकेगावचे हरिश्चंद्र लहाने गुरूजी, चाटे गुरुजी यांनी सोबत बालाजी केंद्रे या नि नारायण लहाने या तरुणांना दिलं. हो, माकेगावला चालत जायचं होतं. माकेगावला रस्ता नाहीच. पावसाळचात तर बाहेरगावचा संबंधच तुटतो. बालाजी म्हणाला की, “ घोटचापस्तोर पाय मातीत घुसतोय. ” आमची माकेगावला चालत पदयात्रा चालू झाली. दुपारच ऊन तावत होतं, मीही डोक्यावर काहीच घेतलं नव्हतं. पायात चप्पल मात्र होती. माकेगाव डोंगरात वसलेलं गाव. पार आडबाजूला. गावात वीज नाही. पण शाळा आहे १० वी पर्यंत ! पायवाटेनं चालताना नद्या सर्व आटलेल्या. पाण्याखालील दगडगोटचांनी

भरलेल्या. झाडं सुकून गेलेली. शेतं-वावरं वाळून उजाड झालेली . . . दूरवर कोणीही नाही. आमचा तो तीन किलोमीटरचा पायी प्रवास होता. चालणं जड जात होतं. सुभाषला नि मला ! पण आयुष्यभर नी पावसाळ्यातल्या त्यांच्या हालातीची कल्पना केल्यावर आपलं काहीच नाही वाटलं . . .

माकेगाव आलं. पाठीशी डोंगर असलेलं. तिन्ही बाजूंनी नदी असणारं ! (आज ती ठणठणीत आहेय.) नदीच्या एका कडला दलित वस्ती. सामाजिक विषमतेचा गावगाडा सांगणारी. गावात शिरायला रस्ता. तो अक्षरशः काट्याकुट्यांनी गच्च भरलेला ! पावसाळ्यात जाम चिखल होतो रस्त्यावर ! आणि ' काट्याकुट्यानं, चिखलातनंच लेकरांना, पोरानां वागावं लागतं ? नारायण मला दाखवित होता. सांगत होता. . . .

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त तालुके, गाव नि लोकसंख्या
(खरीप ८०–८१)

जिल्ह्याचे नाव	दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या	दुष्काळग्रस्त गावांची संख्या	दुष्काळग्रस्त लोकसंख्या
१) नांदेड	५	६३०	१०,५२,५३८
२) औरंगाबाद	१	३७	२२,९५०
३) बीड	४	१६४	१,६८,२५७
४) उस्मानाबाद	४	४४४	५,४६,६१४
५) परभणी	१	१३४	९४,२८७
मराठवाडा विभाग	१५	१,४०९	१८,८४,६४६
महाराष्ट्र राज्य	७५	११,६६१	१,१०,५८,७६५

गाव नारुच्या रोगानं गच्च भरलेलं! घराघरात नारू तुम्ही अनेकांनी नारु पाहिलाय? नसणारच! इथं घराघरात नारूग्रस्त रोगी. पट्ट्या बांधून पडलेले. त्यात दुष्काळ... काय नाही, जनावरांना चारा नाही.

गावात फिरलो. गाववाल्यांना वाटलं, कुणी डॉक्टर मदत देणारा

' सायेब ' आलाय. प्रत्येकजण नी बारकी बारकी मुलंही घरी बोलावू लागली. पेपर म्हणजे त्यांना कळतच नव्हतं. शाळेत फक्त पेपर येतात. तेही दुसऱ्या तिसऱ्या दिवशी. पावसाळ्यात काही नक्की नाही. गावकऱ्यांसोबत बसलो. बोलणं झालं. रघुनाथराव, सुभाष मी यांच्याबरोबर सरपंच वैजनाथ लहाने, निवृत्ती लहाने, केंद्रे गुरुजी, महादू कांबळे (हा ग्रामपंचायतीचा सेवक), तुळशीराम कांबळे हा मेंबर. गाव लहाने कंपनीचं! वंजारा नावाच्या कुणबी समाजाचं! शेतकरी नि वारकरी पंथीय. बाबू लहाने गुरुजी म्हणाले की, " आता १०/१५ दिवसांत बारवाचं पाणी संपल. मग पाणी नाहीय. ४ कि. मी. अंतरावरील रामवाडीच्या तळ्याचं पाणी आणावं लागतं. आणि नारुचं आजचं प्रमाण अजून वाढतेच. " विहिर पाहून आलो होतोच. विहिरीत पाय बुडवून पाणी घेतलं जाई. पाणी संपतही आलं होतं. रहाटानं पाणी काढावं तर खोल कपारीत घागर अडकून फुटायची म्हणून ते टाळलं. नारायण सांगत होता!

पिकपाण्याचं नि रोजगाराचं विचारलं. निवृत्ती लहाने म्हणाले, " कसा सांगावा वनवास बाबा. पिकलं न्हाई, हायब्रीड खायाला न्हाई. शेतकऱ्याला, मजुराला काम न्हाई. पाचेक कोसावर जावं लागतंय. त्यात पाण्याची हालत, जनवाराचे बी चाऱ्याविना हाल. लई वाईट साल लागलंय. "

माकेगावच्या दलित वस्तीत नदी ओलांडून (अर्थात कोरडी) गेलो. अनेक झोपडयांना बारकी कुलपं नाही तर सताड उघडया. होतंच काय त्यात ठेवायला !

लिंबाई कांबळे ही लेकूरवाळी, मध्यमवयीन बाई. काम न्हाई का ? म्हणल्यावर म्हणाली, " कुठाय काम बापू ? हे बघ लेकरं अन् म्या चार दिवसापासनं उपाशी बसल्येव. भीक मागितल्यावाणी हिंडूनबी काम मिळना . . . ह्या लेकराचा बा बी गेलाय तिकडं सांगवीला. "

तर लक्ष्मीबाई कांबळे म्हणाली,

" काय बी धंदा न्हाय. त्या नागझरीला सरकारी धंद्यावर गेलाव तर तुमच्या जिल्ह्यात जावा म्हणायलेत. दोन दोन कोस फिरूनबी चिपटचाचीबी मजूरी मिळना. सुगीपासनं उगी दंड बसून हाव. काय

खावं, कसं जगावं तुमीच सांगा ? "

पिण्याच्या पाण्याची चौकशी केली. दलित पाणी कुठं पितात ? तर कळालं भाकेगावला ' एक गाव एक पाणवठा ' नव्हता. सवर्णाच्या विहिरीवर दलित जात नाही. एक दलित स्त्री म्हणाली, " हामी गावात पाण्यासाठी गेला न्हाव. हामी हायच्या पायरीनंच हाव. " दलितांना पाण्याचे हाल आहेत. कुणाच्या तरी खाजगी विहिरीतनं ते पाणी

पि. पाण्याची टंचाईग्रस्त गावं व लोकसंख्या (मराठवाडा विभाग १९८०)

जिल्हा	टंचाईग्रस्त गावं (मार्च ८० पर्यंत)	टंचाईग्रस्त गावं (एप्रिल ते जून पर्यंत)	टंचाईग्रस्त लोकसंख्या (मार्च ८० पर्यंत)	टंचाईग्रस्त लोकसंख्या (एप्रिल ८० ते जून ८०)
औरंगाबाद	१००	४४९	८६,६७३	३,५१,४०८
बीड	३०	२४६	९००	७३,८००
उस्मानाबाद	३१०	५६८	२,६१,१४१	५,२५,४६८
परभणी	–	४११	–	३,०९,३७२
नांदेड	१२४	४३९	–	–

भरतात. . . पण सर्वजण गाववाल्याविरुद्ध तक्रार करायला भित होते. तुळशीराम म्हणाला, " गावात भेद हाय. " पाण्याला त्यांना तळ्यावर जावं लागतं. कधी कधी वावरातनं भीक मागून !

बोलेपर्यंत आणखी दोन-तीन बायका जमल्या. त्यातल्या काहींना वाटलं मी " आप्रेशन " साठी नाव टिपायलोय की काय ? "आप्रेशन" ला नेयाचं म्हणून त्यांनी एकदोघांची टिंगलही केली. थोडंसं हसू पसरलं पण हास्यापाठीमागं भितीचं प्रचंड आवरण मला दिसत होतं.

चहापाणी घेऊन निघताना रस्ता नाही, वीज नाही, पाणी नाही, काम नाही, पिक नाही, खायला धान्य नाही, घर धड नाही, आरोग्य नाही, नारूतून मुक्ती नाही. कशा अवस्थेत हे माकेगाव ' जळत, जळत ' जगतं तरी कसं असं वाटायला लागलं.

० ० ०

माकेगावहून सुकणी. तीच हालत. तीच अवस्था. सुकणीला तर रस्ताच नाही. अक्षरशः गाडीवाटेनं नी पायवाटेने वावरातून जावं लागलं. या गावच्या नावावर मोठा टँक बांधला गेलाय सुकणी टँक म्हणून. पण सुकणीला पिण्यास पाणी नाही. वैजनाथ चापोले, जी. एस. बोंडगे भेटले. बोंडगे शिक्षक आहेत. अपंग असूनही गावासाठी तळमळणारे. आम्ही इतक्या उन्हात आल्याचं पाहून तेही व्याकुळ झाले. थोडे आनंदीही ! कारण या गावी कोणी जात नव्हतच ! गाव पाहिलं तर सर्व झोपडयाच, घर म्हणून नाही. या गावची लोकसंख्या जनगनत वाढायच्या ऐवजी चक्क कमी झालीय.

गावाचं दुःख सांगताना बोडगे गुरुजी म्हणाले, " बघा न, आमच्या गावाच्या नावावर तळं आहे. पण आम्हालाच प्यायला पाणी न्हाई ' व्हीरा ' खोदून (छोट्या खड्ड्याला. ' व्हीरा ' म्हणतात.) पाणी काढावं लागतं. अगदी वाटीवाटीनं खरडून पाणी मिळवावं लागतं आणि हे काम दिवसा – रात्री – पहाटं चाललेलंच असतं. ' व्हीऱ्याचं ' पाणी संपलं की, तळ्यावर ५।६ कि. मी. वर जावं लागतं. यंदा तर पीक नाही. शेतकरी कंगाल झाला. जनावराला चारा नाही. पीकपाणी नसल्यानं चुली पेटत नाहीत. ७०।८० मजूर गाव सोडून बायकापोरांसहित जगायला गेलेयत. आता टँकरनं पंचायत समिती पाणी देणार तर रस्ताच नव्हता ट्रक यायला. मग गावकऱ्यांनी राबून रस्ता तयार केला. टँकर येण्यासाठी. आता रस्ता तयार आहे तर टँकर सुरू झाला नाही. तोही चार गावांसाठी एक असल्यानं, गावंही लांबलांबची असल्यानं हालत होते. "

गुरुजींनी ' व्हीरा ' दाखवायला नेलं. पंधरावीस माणसंही जमली. सोबत अनवाणी पायानं १५।२० मुलंही. काय घडतंय पाहायला आलेली. ' व्हीरा ' पाहिला. चक्क वाटीनं पाणी भरणं चाललेलं.

रोकडा सावरगावचे अन्नछत्र

यंदाच्या भीषण दुष्काळाला तोंड देण्यासाठी साहाय्य म्हणून पंढरपूरच्या संत तनपुरे महाराजांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील रोकडा सावरगाव (ता. अहमदपूर) इथं मोफत अन्नछत्र ४।५ आठवडे

चालविलं. यासाठी असं ठरलं की अन्नधान्यासाठी महाराजांनी पैसे पुरवायचे नि गावकऱ्यांनी व्यवस्था, शिजवण वगैरे बाबी सांभाळायच्या. जोपर्यंत दुष्काळ राहिल तोपर्यंत अन्नछत्र चालूच ठेवीन अशी हमी महाराजांनी दिली होती. परंतु झालं असं की अन्नछत्र मध्येच बंद करण्यात आलं. याची कारणं मोठी उद्‌बोधक आहेत. एक कारण असं की, महाराजांकडून पैशाचा चेक यायचा, या चेकचे पैसे प्रत्यक्ष हाती पडेपर्यंत गावकऱ्यांना व्यवस्था करावी लागायची. आज गावकऱ्यांजवळ तर पैसे नाहीत. दुष्काळच. पैसे एवढे कुठून आणणार ? हे एक कारण! दुसरं कारण असं की, एका गावकऱ्यानं सांगितलं की, 'या अन्नछत्रावर दररोज हजार मजूर, मुलबाळं, बायका जेवण घ्यायच्या. या भागात कामही कमी. त्यामुळं मजूर दोन वेळ अन्न खाऊन निवांत झोपायचे त्यामुळं ज्या शेतकऱ्यांची शेतात कामं निघाली त्यांना मजूरच मिळेना ते अडवून १०।१० रुपये मागू लागले.' मोठ्या शेतकऱ्यांना मजूर मिळेनात हेही एक कारण घडलं ! गावच्या एका सुशिक्षित तरुणानं आणखीन एक किस्सा सांगितला. तो असा की, " शेवटच्या दिवशी टाकळगावचे दोन दलित दारु पिऊन जेवायला आले. ' लगेच वाढा ' म्हणाले. ' पुढच्या पंगतीला देतो ' असे स्वयंसेवक म्हणाले. त्यातून बाचाबाची झाली आणि त्या दलितांना बेदम मार देण्यात आला. पोलिसात अर्ज वगैरेही झाले आणि दुसऱ्यासाठी मनःस्ताप सहन करून, कष्ट उचलून 'लष्कराच्या भाकरी का भाजा ? ' असं स्वयंसेवकांना वाटलं ! एवढा सारा हजार दोन हजारांचा ' पंक्तीप्रपंच ' कुणी सांगितलाय सांभाळायला हेही एक मत होतं! अर्थात दलित नागरिकांना मारण्याचा प्रकार प्रत्यक्ष अन्नछत्र बंद करण्याच्या दिवशी घडला. त्यामुळं तेच कारण आहे हे खरं नाही . . . कारण कोणतेही असू दे या मोफत अन्नछत्रातून शेतकरी–मजूर अंतर्विरोध नि मानवी प्रवृत्ती; शिवाय सेवाभावी जनतेची भावना या साऱ्या गोष्टी बाहेर आल्याहेत मात्र गरजू मजूर व गरीब शेतकरी अन्नाला मुकले एवढं मात्र खरं ! तनपुरे महाराजांनी रोकडा सावरगावच का निवडलं ? याचाही चमत्कार सांगितला जातो. तो म्हणजे सावरगावला बापूदेवाची समाधी आहे आणि त्यांनी महाराजांच्या स्वप्नात जाऊन अन्नछत्र सुरू करण्याची

सूचना केली म्हणे ! बापूदेवांनी अन्नछत्र पुढंही चालू ठेवण्याची सूचना गावकऱ्यांना केली नाही हं !

चारपाच जणांचे नंबर ! पाणी चारेक घागरी भरल्यावर संपेल एवढंच ! पाणी संपलं की, " जावा तळ्यावर ! " मजूर गावकरी सांगत होते.

पूर्ण देशाची लोकसंख्या पंचवीस टक्के वाढली असताना या दुष्काळग्रस्त तालुक्यातील गावाची लोकसंख्या चक्क कमी झालीय. जवळपास वाढीची पंचवीस टक्के आणि कमी झालेली पंचवीस टक्के अशी ५० टक्के जनता बाहेर पडलीय. निघनाता गुरुजीनं प्रेमानं, मायेनं सरबत दिलं. दुष्काळात खेड्यांचं सर्व काही आटलं तरी माया, अतिथ्य-पाहुणचार आटला नव्हता. तो आहे तसाच होता.

सुदैवान अहमदपूर व उदगीर तालुक्याच्या आमदारांची भेट झाली. उदगीरचे तरुण आमदार बाळासाहेब जाधव म्हणाले की, " उदगीर – अहमदपूर मिळून ५० हजार मजूर हैद्राबाद–मुंबईला स्थलांतरित झाले आहेत. तालुक्यात योजना मंजूर होऊनही कामं काढली जात नाहीत. केवळ दुष्काळ जाहीर केल्यानं कसं होणार ? भीषण परिस्थितीकडं शासनाचं लक्ष नाही. अधिकारी कामावर लक्ष देत नाहीत. अतिशय वाईट परिस्थिती आहे. याची त्वरीत दखल घ्यायला हवी.

अहमदपूरचे जागृत व विधानसभेतही आपल्या भागाचे प्रश्न उपस्थित करणारे आमदार व माजी मंत्री किसनराव देशमुख म्हणाले की, दुष्काळ जाहीर झालाय हे खरेच. पण कामं नाहीत. पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. ८४ सडकांची कामं मंजूर झालीत पण केवळ ९ कामं चालू आहेत. शेतकऱ्यांनी जनावरं अगदी कवडीमोल विकली. १९२ गावं दुष्काळी नि १२८ गावांना पाण्याची टंचाई ! मजूरांना धान्याची चिठ्ठी मिळत नाही. त्यामुळं मजुरी फार कमी पडते. ३० पैशात १ किलो धान्य दिलं जायचं. त्या हिशोबानं आता काहीही मिळत नाही. धान्याचा हिशोब धरून पूर्वी सुमारे ४७ रु. मजुरी पडे. आता २० ते २४ रु.च पडते. आणि धान्य भयंकर महागलंय.



उपयासंबंधी विचारल्यावर ते म्हणाले, " कॅटल कँप लगेच सुरू करावा. बी–बियाणांसाठी तगाई द्यावी. सर्वच शेतकऱ्यांना; कर्मचारी वाढवून, कामं त्वरित सुरू करावी, पाण्यासाठी युद्धपातळीवरून पैसा व योजना राबवावी. पाझर तलाव, गावतळी, खाजगी जमिनीचं लेव्हलिंग ही कामंही सुरू करावीत. धान्याचा पुरवठा वाढवावा. "

सामन्यांपासून आमदारापर्यंत दुष्काळचं दुःख सांगितलं गेलं होतं. आता जिल्ह्याकडं जायचं होतं.

० ० ०

' खंदार अन् अंधार ' ही म्हण बोलकीच खरी. कंधार हा नांदेड जिल्ह्याचा मागासलेला, डोंगराळ नि दुष्काळी तालुका. त्या तालुक्यातल्या मालेगावला मी आणी ॲड. शिवाजीराव देशमुख, प्रा. गंगाधर शेटकार, विलास साळुंके उतरलो. हे मालेगाव तीन–चार नावांनी प्रसिद्ध. मालेगाव (यात्रेचे), मालेगाव (घोड्याचे), मालेगाव (उचल्याचे), नि मालेगाव (हिजड्याचे) . . . आता एवढी नावं असणाऱ्या मालेगावात खंडोबाची प्रचंड यात्रा " येळ आमोशा " (डिसेंबर शेवटचा आठवडा ते जानेवारीचा पहिला आठवडा दरम्यान) ला भरते. ही यात्रा मोठी वैशिष्ट्यपूर्ण असते. घोड्यांचा बाजार असतो. वैदू लोक गाढवांचा बाजार करतात. सापवाले, गारुडी यांची लग्न–भेटी इथंच यात्रेत ठरतात. तमाशा कलावंतीण येतात. उंटाचाही बाजार भरतो नि दिडशे–दोनशे हिजडेही यात्रेला न चुकता येतात. तर अशा या जागृत खंडोबाच्या मालेगावच्या माणसांच्या जीवनातला अंधार पाहिला व मन विदीर्ण झाले.

गावच्या बसस्टॉपवरच आठ-दहा जनावरं झाडाच्या छोट्याशा सावलीत एका पेंडीवर (खाऊन खाऊन राहिलेल्या) तुटून पडत होती. गावच्या आसपास बंजारा म्हणजे लमाणतांडे आहेत. चारपाच ! त्यातील हिरापूरचा मोठा तांडा ! त्यांनाही काम नाही, पाणी नाही. गावच्या इसमानं स्टॉपवरून गावात नेलं. घरं म्हणजे झोपड्याच ! घराघरात गोठा होता. एकदोन मरतुकडी जनावरंही दिसत होती. पुढं असं कळालं की गावकऱ्यांचा व्यवसायच मुळी पशुपालन हा आहे. कंधार तालुक्यातील लोहा, माळाकोळी सर्कल नि विशेषतः मालेगाव

परिसर डोंगराळ, जमीन नसलेला, दुष्काळी. सारी माणसं काळी पडलेली. अशक्त तरीही काटक. गावात भोई, हाटकर व दलित समाज. तसंच खंडोबाचे पुजारी गोसावी समाजाचे. त्यांचीही १५।१६ घर! संभानं पोलिस पाटलाची थेट गाठ घालून दिली. हे पाटील म्हणजे वृद्ध गृहस्थ. काठी टेकीत चालणारे. अंगावर फाटका अंगरखा असणारे ' जमीन किती हाय ' विचारल्यावर म्हणाले, " बक्कळ चाळीस एकर हाय. पर काय करावं नापीक हाय. घरात हायब्रीड खायला न्हाय. "

आम्ही दूध सोसायटीच्या खोलीत गेलो. तिथं या भागाचे पंचायत समितीचे तरुण सदस्य रुस्तूम धुळधंडे आणि १०।१२ मजूर बसलेले. विचार त्यांचा कामाचाच चालला होता. धान्याचीही चर्चा होती. आम्ही सामील झालो. मजूर लोक घडाघडा बोलत होते. ते विकलांग अवस्थेत. चेहऱ्याचं चैतन्य हरवून चिंताक्रांत अवस्थेत बसलेले. त्यात दलितांचेही बरेच जण. काशिनाथ वाघमारे, रामचंद्र वाघमारे, जयवंता मरीबा, संभा वाघमारे, संतोबा कोमटे, विठ्ठल यादू, महादू हरबा, शेषराव धुळधंडे, आदी मंडळी बोलकी. ' इचारपूस ' करायला कुणी आलंय याचा त्यांना आनंद होता. पण आम्ही नेमकं कोण आहे हे त्यांना समजलं नव्हतं. त्यांना अधिकारी अन् पुढारीच माहीत. पत्रकार माहित नव्हते. कारण कुणी गेलंच नव्हतं ना तिथं ! बघता बघता ३०–४० मजूर गोळा झाले. आम्ही खोलीबाहेर बसलो. गावचे ॲड. सुभाष पाटीलही आले. जमिनीवरच बसलो. पण धावपळ करून सतरंजी आणली गेलीच. चर्चा सुरू झाली. एक–दोन सुशिक्षित सोडले तर आम्ही कोण हे कुणालाच समजलं नव्हतं तरीही ते बोलले.

रूस्तूम धुळवंडे म्हणाले की, " आमच्या कंधार तालुक्यातील माळाकोळी सर्कल सतत दुष्काळी राहिलंय. जवळजवळ या सर्कलमध्ये ३००० लेबर आहेत. मालेगावात ८०० आहेत. हा भाग डोंगराळ माळरानाचा असल्यानं जमीन-जुमला-वावरं नाहीत. मालेगाव, आंडग, गौंडगाव, लिंबोरी, घोटका, हिरापुरी, वागदरवाडी, दगडसावंगी या भागात जनावरांची संख्या जास्त आहे. लोकांचा पशुपालन हाच व्यवसाय आहे. गावातले ६५ टक्के लोक मजूरी करून जगतात. तांड्यावरले लमाणीही मजूरीवरच जगतात. आणि काम तर

न्हाई, जनावराला कडबा न्हाई, मजूराला काम न्हाई तर जनावराला काय घालील ? इथं घराघरात ७/८ जनावरं, ढोरं आहेतच. यंदाचं साल भयंकर वाईट हाय. "

काशिनाथ वाघमारे म्हणाला की, " ७२ सालचा दुष्काळ बरा होता ह्याच्यापरीस ! रुपयाला पावशेर धानं खाल्लं. घुगरी आणून खायाचो. त्या साली कामंबी लई होती. कसंबसं भागलं. पर औंदा साल लईच बेकार हाय. ढोरांचीयबी अन् माणसांचीयबी एकीच हालत हाय. औंदा चार महिण्यातनं आठ दिस काम मिळतंय अन् काय खावं ? "

रूस्तुम धुळवंडे म्हणाले की, " नांदेड जिल्ह्यातील एक नंबरची आमची दूध सोसायटी व्हती. तीन-तीन हजार लिटर दूध रोज जायाचं. पर सद्या सोसायटी दुष्काळानं बंद हाय. एक लिटरबी दूध न्हाय. म्हणजे बघा ! "

संभा वाघमारे म्हणाला, " सायब या साली चहुकून उन्हाळा हाय. ढोरं– गायी उठवणीला आल्याती. रोजी ५/६ जनावरं मरायला लागल्याती. चारा न्हाय, आणायला पैसा न्हाय. "

वाघमारेनं हे सांगितलं तेवढ्यात आंडगा गावाहून एक माणूस म्हैस मेल्याचा निरोप घेऊन आला. गुंडेराव चेरेकर यांची ! म्हैस बँकेकडून कर्ज घेऊन घेतलेली. दूध नाही, चारा नाही. मेली ! कर्ज फेडनं आलं. शेषराव धुळधंडे हा अतिशय स्पष्ट बोलणारा गडी. धडाधड तो आपली कैफियत मांडित व्हता, " सायेब आमचं जगणं कन्हाय ' आथरूण धोंड्याचं, पांघरूण गवताचं ' असं झालया. काम न्हाय म्हून बक्कळ अर्ज दिलेत पर काम काय दीनात. नुस्ते कागदावर काम काढलं म्हणतेत. आता तुमीच सांगा कोपराला गुळ लावल्यावर हामाला खायाला, चाटायला भेटंल का ? "

एक म्हणाला, " हामच्या गावचे इरसाल गंगथडी भागात लोक सुगीला जगायला जातेत.पाखरावानी बघा . . . चार आणे माणूस जातं. कुणी भोकरात कुणी सिकंद्रीबादला. इटंच्या भट्टीवर तर कुणी नंग्या माणसाच्या देशात. (म्हणजे चांदा भागात) पर औंदा आठ आणे लोक बाहीर गेले. "

" चूल पेटती का न्हाय ? " मी.

" कह्याची चूल घेऊन बसलाव. कामच न्हाय तर काय खावं! माती खावून जगावं काय ? कवा रोजगार मिळाला तर शेरभर कण्या करून लेकरास्नी देताव. लई तरास हाय हो ! "

दुसरा : " कायबाय पातळमुतळ करून कधीमधी खाताव. नसता चार-चार दिस चूल बंद राहतीया. "

तिसरा : " एक तर कामच न्हाई अन् कवाबवा मिळालं तर चिठ्ठी बंद झाल्याच्या योगानं २०।२२ रुपये आठवड्याला पडत्येत. मंग काय आणून खावं ? १२ रुपय धडी ज्वारी झालीय. सांगा कसं जगावं आम्ही ? "

चवथा: " सायब चार आणं हामच्या गावचं माणूस बेपत्ता हाय. कुणी गुजरातीत, कुणी मंबयला रेती बंद्रावर गेलंय. कुणी कुठं? जिथं रस्ता फुटल तिथं. "

रुस्तुम धुळधंडेन एक किस्सा सांगितला.

" दुष्काळ निवारण कमिटी पाहणीस आली, तेव्हा प्रत्यक्ष १५।२० ही मजूर कामावर नसताना त्या दिवशी ते येणार म्हणून ७०० मजूर एका दिवसासाठी कामावर लावलं. दुसऱ्या दिवशी बंद." शेषराव पुस्ती जोडत म्हणाला, " मोटारी येणार म्हणला की काम दिलं बघा. मोटारींनी शिवार सोडलं की इकडं काम बंद! दाखविल्यावनी केलं बघा."

एक मजूर : " हामाला लेकरावांसाठी पाळणा नको, काय नको. हामाला काम द्या, वक्कळ व्हईल. हामी हामची लेकरं सांभाळताव."

दुसरा : " तळ्याचं काम चाललय तर बंद केलं. आता काम न्हाय की. लिंबोरी रस्त्याचबी काम बंद केलय. आता काम कवा सुरू करणार काय की ! "

तिसरा : दुष्काळात मेल्यावर सुरू करत्याली. "

बोलणं संपले; म्हणजे संपवलं. चार–पाच तास झाले होते. गावात घरोघरी फिरलो. खंगून गेलेली मरतुकडी जनावरं ! मरणासन्न 'उठवणी' ला आलेली! चुली बंद! माणसं विकलांग अवस्थेत बसलेली. दोन कि. मी. वरच तळ्याच्या कामावर चालत गेलो. तिथं दुरूस्ती कामावर १५/२० मजूर होते. मजूरीकिती पडते म्हणल्यावर म्हणाले

" तीन रुपये " मुकादमाला धान्याची चिठ्ठी देता का ? विचारलं. तो म्हणाला, " अजून आर्डर आली न्हाई. त्यावदल्यात रुपाया देताव. " मजूर कमी मजुरीनं अस्वस्थ होते. शिवाय " १५/१५ दिवस पगारही व्हत न्हाईत. " असही एकजण म्हणाला.

तळ्याहून परतताना आटलेल्या नदीचं नाव विचारलं "फुलझडी" नाव सांगितलं शेषरावानं ! पूर्वी फुलं, फळं लागायची म्हणे तिथं ! आता ते सारं झडून गेलंय. माणसंही झडून गेलीयत. जनावरंही !

ॲड. पाटील यांच्याकडं चहा घिऊन स्टॉपवर मी मजुरांना म्हणालो, " काय वो, तुमचा खंडोबा काय मदत करीत न्हाई का ?"

एकजण उत्तरला, " तो हाय म्हणून तर अशा हालतीत हामी जगताव. नसता मेलोच असतो. "

देवावरची ही श्रद्धा ह्या मरणासन्न परिस्थितीतही जिवंत पाहून मी आश्चर्यचकित झालो. खंडोबादेखत आयुष्याचा झालेला "येळकोट" ही माणसं भोगत होती. मोर्चा काढावा तर 'खंदारला' चलत जायाची " ताकद न्हाय " म्हणत होती. ' भाकरीचं त्येलच' मोटारीत न्हाई तर ती चालंल कशी वो ? ' असं वाघमारे म्हणाला. त्याचंही तंतोतंत खरं होतं

० ० ०

सोमणवाडी बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई तालुक्याचं गाव. डोंगरकपारित वसलेलं. आजूबाजूला पानगाव, बाभळगाव ही गावं ! येताना " बाबधरा " घाट ओलांडला. घाटाजवळच्या ' झऱ्या ' ला बारमाही पाणी असतं. नि बाबधऱ्याजवळ भूत आहे म्हणतात. तर त्याच्या तावडीतून वाचून मी व ॲड. रघुनाथराव मुंढे सोमणवाडीस पोहोचलो. गावातले सरपंच वगैरे मंडळी पानगावच्या बाजाराला गेली होती. गाव असंच ओसाड, जुन्या घरांचे, बहुतेक झोपड्यांचे ! जनार्दन सोनवणे या गावातल्या प्रमुख शेतकऱ्याच्या घरी बसलो. चार–पाच जण जमले. चर्चा सुरू झाली. १२५ घरांचं गाव. या भागातील म्हणजे उजनी सर्कलच्या निरपणा, सौंदणा, बागझरी, वडगाव, बाभळगाव, कांदेवाडी, दठण, भतनवाडी, धर्मापुरी, आदी गावात दुष्काळाची भीषण झळ पोहोचलेली !

जनार्दन सोनवणे म्हणाले की, " रब्बीचा भाग गेला. " पाऊस नाही पिकं नाहीत. हायब्रीड जिथं १०० पोती व्हायची तिथं ५–१० पोती झाली. पिकं चक्क कोलमडून पडली. जनावराला चारा न्हाई. मजुरास्नी काम न्हाई. शेतकऱ्यांचे हाल तर पुसू नका. आता पेराला बियाणं नाही. जनावरं विकली. पेरणीची पंचाईत व्हनार," गावातल्या एकमेव मुस्लीम कुटुंबातला जलौद्दीन पठाण हा तरुण बोलका. तो गावात शिलाई काम करतो. ' तुझं कसं चाललंय ?' म्हणल्यावर उतरला, " कसला काय तळचावर जावं लागतयनं ?"

जलौद्दीन, जलार्दनराव यांनी बरीच माहिती सांगितली. एक गंमत बोलता बोलता कळाली. " गावात ४ थी पर्यंत शाळा आहे आणि चारी वर्गासाठी एकच खोली आहे आणि या चारही वर्गासाठी केवळ एकच मास्तर आहे. तोही कधी येतो. आला तर झोपा काढतो. शिकवत न्हाई. " आहे किनई कमाल !

कडब्याची हालत फार वाईट आहे. जलौद्दीन म्हणाला की, " लोकायनी जनावरं विकून टाकलीत. हायीत त्यांनाच कडबा मिळना. रुपया–सव्वा रुपया पेंडी झालाय. म्हंजी जनावर एक महिना सांभाळायचं तर शे–पाचशे खर्च. त्यापरीस इकलेलं बरं म्हणून विकून टाकत्यात."

मजुरीबाबतही असं कळालं की, काही दिवस मिळते, काही दिवस नाही. मजुरी चार–पाच रुपयेच पडते असेही समजले. तळचावरील मजुरानीही तेच सांगितलं ! १५ दिवस मजुरी मिळाल्यावर त्याचा पगारबी उशिरा भेटतो. लोक बाहेर जगायला गेलीयत. हेही समजलं. जाता–जाता सोमणवाडीचा एक किस्सा . . . .सोमणवाडीला दलितांसाठी वेगळा 'व्हीरा' आहे–नि सवर्णांसाठी वेगळा ! त्याशिवाय 'तिर्थ' आहे. यावर्षी सवर्णांचा 'व्हीरा' आटल्यानं त्यांना दलितांचा 'व्हीरा' येथूनच पाणी भरावं लागतं. दलितांच्या 'व्हीऱ्याचं' पाणी मात्र अजिबात आटत नाही. सवर्ण पाणी चक्क दलितांच्या ' व्हीऱ्यावरनं ' भरतात. आहे नं माकेगावच्या बिलकूल विरुद्ध स्थिती ?

याच सोमणवाडीला यावर्षी आणखीन् एक गंमत केलीय निसर्गानं! गावात पीकं आली नाहीत तरी असणारी आमराई यंदा भयंकर मोहरलीय. आंब्याच्या ओझ्यानं झाडं वाकलीयत, एवढ भरपूर आंबा

पिकलाय, सवर्णांबरोबर दलितांनाही आंब्याची झाडं आहेत. शिवाय गावचा " समायिक " " कटाळचा " (आंब्याच्या झाडाचं नाव) आहेच. पाणी मिळणं कठीण असलं तरी यंदा रस भरपूर आहे. आम्हीही मग या उन्हाळचातला पहिला आंबा खाल्ला व रसही ! हो, ही संधी दवडणं अयोग्यच होतं.

तर वाचकहो, ही काही ' नमुना ' गावं. तुमच्यासमोर मला दिसली तशी उभी केली. तुम्हीच ठरवा मला यात ' शापित ' ची पात्रं भेटली असतील की नाही ? सांगा तुम्हीच यांच्या " दु:खांना बांध " कधी आपण बांधणार आहोत. त्यांना सुखाचा शोध कधी लागणाराय ? हेच खरं.

" या दु:खांना बांध नाही
नि सुखाचा शोध नाही
उपेक्षेला अंत नाही
मरणयात्राही थांबणे नाही. "

❖

घोटभर पाण्यासाठी....!

रणरणते उन्ह तापल्या पोळावं तसं पोळून काढत होतं. काळी माय तडे गेलेला देह घेऊन तान्हेजून गेलेली होती. दुष्काळानं ग्रासलेली माणसं चिपाडागत झालेली होती. माणूस, माती आणि पाणी सर्वंच आटल्यागत झाले होते. घरंदारं ओस पडली होती.उठवणीला आली खंगलेली जनावरं पर्णहीन झाडांचा आसरा घेऊ पाहत होती. या बापड्यांना सावलीही महाग झाली होती आणि माणसांना ? त्यांची काय हालत होती ?

उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळमहर्षी अहमदपूर तालुक्यातल्या माकेगावच्या दलित वस्तीतील लक्ष्मीबाई कांबळेशी मी बोलत होतो. अर्धीअधिक वस्ती जगायला गेलेली. वाट फुटेल तिकडं. काम मिळेल तिकडं . . . कुणी भोकरात, कुणी हैद्राबादला विटाच्या भट्टीवर तर कुणी मुंबईला रेतीबंदरावर.वावटळीत आलेल्या पाचोळ्यागत दिशाहीन वाहणं नशिबी आलेली ही माणसं. वावटळ नेईल तिकडं पाचोळ्यांना जावं लागतं . . . . पाय फुटेल तिकडं या माणसांना फिरावं लागतं. पायाचा भुगा होतो चालून चालून. तुम्हा आम्हा संध्याकाळी व्यायाम म्हणून फिरायला जाणाऱ्याना हे जीवघेणं फिरणं कधी समजावं ? ही माणसं डोकं असूनही दिशा ठरवू शकत नाहीत, पाय असूनही आपला मार्ग चालू शकत नाहीत, झोपडं असूनही त्यात राहू शकत नाहीत, काम

मागणारे हात असूनही काम मिळवू शकत नाहीत. घाम गाळूनही टिचभर खळगं भरू शकत नाहीत. . . माणूस असूनही माणसासारखं जगू शकत नाही. . . ॲपलच्या आणि इनसॅटच्या काळात ही लक्ष्मीबाई सारखी लक्षावधी माणसं घोटभर पाण्यासाठी. . . तहान भागविण्यासाठी दिवसरात्र–रानोमाळ भटकतात. शोधतात पाणी सोन्याचा शोध घ्यावा तसं. मला लक्ष्मीबाई म्हणाली,

"बापू,काय सांगू .. तुला .. ? भीक मागितल्यावनी पाणी मागून पिताव..दोनदोन कोस फिरावं वणवण तरीबी पाणी मिळंना चरवीभर.."

तहानलेली मनं

अशा पाण्यासाठी वणवण फिरणाऱ्या, आंथरूण धोंडयाचं अन् पांघरूण गवताचं करणाऱ्या लक्ष्मीबाई गावोगाव आहेत, खेडयाखेडयात आहेत. तालुक्या–तालुक्यात आहेत. जिल्ह्या–जिल्ह्यात आहेत. राज्या राज्यात आहेत, आपल्या महान परंपरांच्या भारत वर्षातही आहेत. शेकडोंनी, लाखोंनी आणि कोटयावधींनी आहेत. तहानेनं व्याकूळ झालेल्यांची ' कोरड ' कधी आपण पूर्ण करणार आहोत. . . उन्हाळा येतो ओरड होते. वर्तमानपत्रे छापतात. शासन व्यवस्था करतं. . . पण दुखणं चालूच राहतं. . . एखादा सण यावा तसं हे चार चार महिण्याचं ' तान्हेजलेपण ' ग्रामीण जनतेच्या, शेतकरी, मजूर, दलितांच्या नशिबी. ते संपणाराय कधी ? या तहानलेल्या व्याकुळ कोटी कोटी जीवांना कोणते आणि किती संत एकनाथ महाराज पाणी देणाराहेत ? की नाथांविना अनाथ राहणारीच ही ग्रामीण माणसं आहेत ?

आपल्या संपूर्ण देशात पिण्याच्या पाण्यासाठी उन्हाळयात तडफडणाऱ्या गावांची संख्या वाचली तर तुम्ही हादरून जाल. आपल्या देशात पाच लाख शहात्तर हजार खेडी आहेत आणि त्यातील पिण्याच्या पाण्यासाठी कठीण म्हणून घोषित झालेली (प्रॉब्लेम व्हिलेजेस्) १ लाख ५३ हजार आहेत. ही आकडेवारी आहे १९७१–७२ ची. ताज्या आकडेवारीनुसार देशातील दोन लाख खेडयांना पिण्याच्या पाण्याच्या अतिकठीण समस्येला तोंड द्यावं लागतंय. पिण्याच्या पाण्याची व्यवस्थित सोय असणारी आपल्या देशात फक्त ७६,००० खेडी आहेत. म्हणजेच फक्त १४ टक्के खेडयांना पाणी मिळतं आणि

राहिलेल्या ८६ टक्के खेड्यांना काही ना काही 'हालत' व 'दुरावस्था' आहेत. भारताची स्थिती पाहिली तर मोठी विचित्र आहे. . . . देशातील तामिळनाडू, आंध्रप्रदेश, केरळ, हरियाना, गुजरात या राज्यात पाण्याची चांगली सोय झालेली आहे तर उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, महाराष्ट्र, ओरिसा, मध्यप्रदेश, जम्मू–काश्मीर या राज्यात 'दूरावस्था' दयनीय अशी आहे. खाली दिलेली राज्यवार स्थिती पाहिली की, 'स्थिती' समजू शकेल.

ही आकडेवारी काय दर्शविते ? आपल्या देशातील सुमारे दोन लाख खेड्यातील सुमारे वीस कोटी ग्रामीण बांधवांना पाण्यासाठी दरवर्षी नित्यनियमानं व्याकुळ व्हावं लागतं. एखादा किल्ला जिंकावा त्याप्रमाणं घागरभर पाण्याच्या लाभासाठी दिवसरात्र जागावं लागतं. रानोमाळ भटकावं लागतं. सोन्यासारखा पाण्याचा शोध घ्यावा लागतो. शिवाय ही सारी श्रमणारी-राबणारी माणसं असतात. यांना दररोज श्रम केले तरच पोटाला तुकडा मिळू शकतो.

मग कामाचा वेळ पाण्याला देणं फार अवघड होतं. काही काही रात्री पाणी भरतात. अहमदपूर–उदगीर तालुक्यात तर साठ साठ फूट खोल विहिरीत उतरून वाटीनं पाणी भरलं जातं. काही वेळा अशा विहिरीत पडून बायाबापड्या दगावल्या आहेत. काही खेड्यात चलमा किंवा हीरा नदीच्या वा ओढ्याच्या पात्रात खोदून वाटीवाटीनं पाणी भरावं लागतं.मराठवाड्यातील पाणी टंचाईची स्थितीही मोठी भीषणरूप आहे. उन्हाळ्यात एप्रिल ८० ते जून ८० या कालावधीत टंचाईग्रस्त गावं आणि लोकसंख्या पाहिली की या प्रश्नाची दाहकता लक्षात येते.

मराठवाडा : पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त गावे व लोकसंख्या (१९८०)

जिल्हा	टंचाईग्रस्त गावे	टंचाईग्रस्त लोकसंख्या
औरंगाबाद	४४९	३,५१,४०८
बीड	२४६	६३,८००
उस्मानाबाद	५६८	५,२५,४६८
परभणी	४११	३,०९,३७२
नांदेड	४३९	३,५१,७०२

जीवाचा आटापिटा

या आपल्या मराठवाड्यातील आकडेवारीचा अर्थ असा की, आपल्या या प्रदेशात दरवर्षी उन्हाळ्यात ज्यांना पाण्यासाठी जीवाचा आटापीटा करावा लागतो ती खेडी आहेत जवळपास दोन हजार आणि टंचाईग्रस्त लोकसंख्या आहे जवळपास पंधरासोळा लाख. . . . . ! या लोकांच्या जीवनात उन्हाळा येतो तो तुमच्या-आमच्यासारख्या प्रमाणं सुट्टी घेऊन नाही, आराम घेऊन नाही, पंखा घेऊन नाही, कुलरमधील थंडगार पाणी घेऊन नाही, फ्रीजमधील गार पाण्याच्या बाटल्या घेऊन नाही, थम्सअप – लिम्का घेऊन नाही की आईसक्रीम घेऊन नाही. उन्हाळा येतो त्यांच्यासाठी जीवघेणा व्याकुळ वनवास होऊन . . . ! घोटभर पाण्यासाठी मरणासन्न यातना देणारा मोसम होऊन, पायात पायताण नसताना विस्तवाप्रमाणे चटके देणाऱ्या जमिनीवर, रस्त्यावर चालायला लाऊन, काही जणांचा पाण्यासाठी खोल विहिरीत पडून जीव घेऊन, काळ होऊनही हा उन्हाळा येतो . . . . त्यांना नसते मग महाबळेश्वर किंवा आणखी कुठलेही थंड हवेचे ठिकाण . . . . त्यांना असतात महायातना . . . . दरवर्षी नियमानं येणाऱ्या. त्यांना थंड हवेच्या ठिकाणाऐवजी भेटतात मग नारूसारखे भीषण रोग, कॉलऱ्यासारखे जीवघेणे रोग... खरुजासारखे त्वचारोग . . .! शरीर,मन आणि जीवन विकलांग करणारं हे जीवन जगताहेत ही खेड्यापाड्यातली माणसं . . . . ! त्यांचं हे दुःख, समस्या संपणार तरी कधी ?

या उध्वस्त माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनानं प्रयत्न केले आहेत हे निर्विवाद पण आहे ती पैशाची तरतूद अपुरी आहे आहे काही ठिकाणी निसर्गाचीही साथ नाही तर काही ठिकाणी तंत्रज्ञांचा अभाव आहे, यंत्र सामुग्रीचा आहे.

प्रश्न सुटणे कठीण

सध्याच्या उपलब्ध शासकीय अंदाजानुसार आपल्या महाराष्ट्रात प्रत्येक गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवायचा असेल तर सुमारे २२० कोटी रुपयांची गरज आहे. एवढी रक्कम जोपर्यंत आपण प्राध्यान्यक्रम देऊन राखून ठेवीत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणे कठीणच दिसतेय. मात्र केंद्र शासनाने या प्रश्नाचे गांभीर्य ओळखलेले आहे.

योजनाकारांना आणि देशातील अर्थशास्त्रज्ञ व नियोजकांना, ही स्वातंत्र्यानंतरही पाण्यासाठी तडफडणाऱ्या कोट्यावधी भारतीयांच्या प्रश्नाची तीव्रता जाणवली आहे आणि म्हणूनच सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या नियोजनातच मुळी गरीबांसाठी कार्यक्रमातील ११ कलमामध्ये देशातील एक लाख नव्वद हजार खेड्यांना सुमारे दोन हजार सात कोटी रुपये खर्च करून पिण्याचे कायम पाणी पुरविण्याचे कलम घेतले आहे. सहावी पंचवार्षिक योजना ही अधिक आश्वासक अशी आहे असे म्हणावे लागेल, कारण पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नास प्रथमच प्राधान्यक्रम आणि आवश्यक पैशांची तरतूद या योजनेत केलेली आहे व नियोजन मंडळाची ही भूमिका स्वागतार्ह अशी आहे.

आपल्या महाराष्ट्राच्या पातळीवर प्रश्न सोडविण्याची शासनाची भूमिका पाहता तीन मार्गांनी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामध्ये विहिरी, बोअर विहिरी आणि पाईप वॉटर सप्लाय स्कीम

(पाणीपुरवठा योजना) यांचा समावेश आहे. यासाठी प्रत्येक जिल्हा पातळीवर एक समिती आखली आहे. शक्यतो विहिरींनी प्रश्न सोडविता येतो का हे पाहिलं जातं, त्यानंतर बोअरवेलनी आणि या दोन्हींनी प्रश्न सुटत नसेल तर पाईप वॉटरस्कीम राबवली जाते.

महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन या दोहोंच्या गावाचे निकष वेगवेगळे आहेत. त्यानुसार आपल्या राज्यात केंद्र सरकारचे योजनेनुसार ३०७० तर राज्य शासनाच्या योजनेनुसार १२७९ खेडी कठीण

मानायला हवीत. महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा शासनाचा संकल्प याप्रमाणे आहे.

केंद्र सरकारच्या योजनेनुसार १.६ कि. मी. किंवा त्याहून अधिक अंतरावरून पाणी आणावे लागत असेल, खेडं कॉलराग्रस्त असेल, खेडे नारूग्रस्त असेल किंवा पाणीजन्य रोगाने पछाडलेले असेल आणि खेडचात पाणी जादा क्लोराईडस्, फ्लोराईडस् वा इतर विषारी केमीकल्स असतील तर ते खेडे कठीण खेडे मानले जाते. महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार पाणीपुरवठा वा सामुदायिक विहिरीतील फर्लांगापेक्षा दूर असेल, ॲसील झोनमुळे किंवा सलाईल ट्रटमुळे पाणी उपलब्ध नसेल, कॉलराग्रस्त खेडी, नारूग्रस्त खेडी, डोंगराळ भाग, तालुका ठिकाण पण नगरपालिका नसणारे पण पाणीटंचाई असणारे, या गटात मोडणारी खेडी कठीण मानन्यात येतात. ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसाठी लोकसंख्येतील ५० टक्के अधिक संख्या अनु. जाती-जमातीची असेल तर खर्च १०० टक्के सरकार करणे, याचा इतर ठिकाणी १० टक्के खर्च जनतेने करावा लागतो. सहाव्या पंचवार्षिक योजनेतील पहिल्या तीन वर्षात १०,८३१ खेडचांना आणि राहिलेल्या दोन वर्षात ६,२८१ खेडचांना पाणीपुरवठा करण्याचा राज्यशासनाचा संकल्प आहे.

पाण्याचा प्रश्न सोडविण्यातील काही नैसर्गिक अडचणी आहेत. मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील खडक हे कठीण खडक आहेत. हार्ड रॉक्स आहेत, हार्ड रॉक्समुळे पाणी मिळत नाही. खडकांमध्ये मुरूम असेल तर खडकांच्या जॉईन्टस्मध्ये पाणी असते. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांशी व उपसंचालकांशी मी जेव्हा या विषयावर चर्चा केली तेव्हा त्यांनी आणखी एक अडचण सांगितली. ती म्हणजे तंत्रज्ञांचा अभाव. पाणी शोधण्यासाठी 'जिओ फिजिस्ट' तडा लागतात पण हार्कोस पूर्ण महाराष्ट्रात कुठल्याही विद्यापीठात नाही. तो फक्त उस्मानियात आहे आणि त्यामुळे सदा अधिकारी मिळू शकत नाही. आधीच कठीण खडक, त्यात तंत्रज्ञ नाहीत, अशी अडचण होते. बोअरवेल्ससाठी लागणाऱ्या कॅलिक्स मशीन्सही आपल्याकडे कमी आहेत. सुशिक्षित बेकारांनी ट्रक्स घेण्याऐवजी या मशीन्स घेतल्या तर

राज्यालाही मदत होईल व त्यांनाही उत्पन्न मिळेल. आणखी एक बोअर वेल्स केल्यानंतर त्यांची देखरेख पाहणारा, माहिती असणारा माणूस हवा, नाहीतर बोअर वेल्स चालू झाल्यानंतर सहा महिन्यांनी-वर्षांनी त्या बंद पडतात. ही मेन्टेनन्सची व्यवस्था व्हायला हवी. हे काम जिल्हा परिषद करू शकेल.

शासनाने मध्ये मील वॉटर स्कीम आयोजली होती. एक लाख रुपये खर्चाची ही मिनी वॉटर स्कीम होती. परंतु या स्कीमला विद्युत पुरवठा लागतो. हा विद्युत पुरवठा जर खेड्याला नसेल तर पुन्हा अडचणी ! लाईट नाही म्हणून पाणी नाही अशी अडचण होते. बऱ्याच वेळा जी पाण्याची साठवण असते तीही पुरी पडत नाही. यामुळे विद्युत मंडळ, पाणीपुरवठा खाते यांचा समन्वय हवा. काही खेड्यांमध्ये आजूबाजूच्या दोनतीन खेड्यांना मिळून एक योजना बनवता येते. तशीही बनवण्याचा कायम स्वरूपाचा प्रयत्न करायला हवा. त्यासाठी तांत्रिक अडचणींचा बाऊ करता कामा नये.

फक्त शोभा

पिण्याच्या पाण्याचा हा भीषण प्रश्न सोडवायचा असेल तर मला वाटते शासनाने वेगळे असे ग्रामीण पाणी पुरवठा खाते काढावे. त्याचा वेगळा अधिकारी वर्ग, तंत्रज्ञ असावा आणि महाराष्ट्रातील विद्यापीठांनाही अनेक नवीन कोर्सेस सुरू करताना ' जिओ फिजिक्स ' हा विषय – विभाग त्वरित सुरू करण्याचा निर्णय घ्यायला हवा. आपल्या कोट्यावधी माणसांना घोटभर पाण्यासाठी वर्षानुवर्षे, पिढ्यान् पिढ्या वणवण फिरावं लागावं हे तुम्हा आम्हा सर्वांनाच लांच्छनास्पद आहे. . . .

शरणकुमार लिंबाळे हा कवी म्हणतो की,

" तुडुंब विहिरीचं पाणी उसाच्या लाख देठांना
मिळत का नाही माणसाच्या सुक्या ओठांना ?
ओसाड अरण्यातून आदमचा आवाज
का यावा ओंजळभर पाण्यासाठी ?
लाख कारंजी का उडवित इंद्राच्या बागेत
फक्त शोभेसाठी ? "

महाराष्ट्र राज्य : पाणी पुरवठा कार्यक्रम

कार्यक्रम	केंद्रशासनाच्या निकषांची कठीण खेडी	राज्य सरकारच्या निकषांची कठीण खेडी	एकूण खेडी
पाईप पाणी पुरवठा योजना	३,०७०	१,२८९	४,३५९
बोअर वेल्स	९,८६५	–	९,८६५
खोदलेल्या विहिरी	–	२,८८८	२,८८८
(एकूण)	१२,९३५	४,१७७	१७,११२

(सन ७९–८०)

राज्य	एकूण खेडी	अती कठीण टंचाईग्रस्त खेडी	टक्केवारी
राजस्थान	३३,३००	२४,०००	७० टक्के
बिहार	६७,५५६	२५,०००	३७ टक्के
महाराष्ट्र	३५,७७८	१७,११२	४८ टक्के (जवळपास)
उत्तरप्रदेश	१,१२,५६१	३५,५०६	३० टक्के
भारत	५,७६,०००	१,९०,०००	–

(भारतात फक्त १४ टक्के म्हणजे ७६,००० खेड्यांना पाण्याची सोय आहे.)

❖

मराठवाड्यातील गुलाम

विसाव्या शतकात 'गुलामगिरी' ही एक पुस्तकातील हकीकत आहे असं जरी 'शहरी श्रेष्ठांना' वाटत असलं तरी आजही पंतप्रधानांनी वीस कलमी कार्यक्रमात जी 'वेठबिगार' मुक्ती जाहीर केलीय त्या अनुषंगाने जे क्रूर किस्से, बाहेर येत आहेत ते पाहिलं म्हणजे सरंजामशाहीच्या जमिनदारी धनिकवृत्तीचे 'जळते अंश' अजूनही जीवंत आहेत हेच जाणवते.

अनुशासनाच्या अपूर्व परिस्थितीतही पदयात्रेच्या निमित्ताने व वीस कलमीच्या प्रचाराच्या निमित्ताने जेव्हा कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते फिरतात तेव्हा त्यांना जे दिसतं ते विचित्र असतं, कालबाह्य असतं, भयंकर असतं! आता मराठवाड्यातील एका गावात तीस मजूर 'गुलामा'चे जीवन आजही जगताहेत असं सांगितलं तर तुमचा विश्वास बसेल का? पण तसं आहे. त्या गावाचं नाव आहे. 'हिसोरी' (ता. लातूर, जि. उस्मानाबाद) या गावाचे महान सत्ताधीश नोकरशहाकडे नि त्यांच्या भाईबंदांकडे तीसपेक्षा जास्त बांधील मजूर (बाँडेड लेबर) आहेत. हे सर्व गरीब गुलामीचं हीन जीवन जगणारे मजूर 'दलित' आहेत!

कधी काळी वाडवडिलांनी काढलेल्या कर्जाच्या फेडीसाठी श्रमाचं पाणी करणारी ही दुसरी पिढी आहे. कर्जाचे अजून व्याजच फिटत नाही.

मुद्दल बाजूलाच राहिले. नोकरी सोडून पण देता येत नाही. पोलिसपाटील असल्याने नोकरीचीपण जबरदस्ती ! कुणाची बायकापोरेपण त्यांच्या कर्जफेडीसाठी राबताहेत ! त्यासाठी फक्त हायब्रीडचे तुकडे 'गिळायला' मिळतात ! कपडे केले तरी त्याचे पैसे कर्जामध्ये दीड-दुपटीने मांडून पिळत राहतोय. यात कोणी तरुण आहेत, कोणी कोवळे आहेत, काही म्हातारेपण आहेत.

'गुलामा'ची बादी

हीच ती विसाव्या शतकातील दलित समाजाची 'गुलाम' मजूर माणसं –

१) गोरोबा गणपती सोनावणे (वय ३०) वडिलाची संपूर्ण हयात मालकाच्या सेवेत गेली. कर्ज फिटलं नाहीच. सध्या लादलेले कर्ज रु. १२००/-

२) भानुदास गणपती सोनावणे (वय ३५) दहा वर्षापासून 'गुलाम'. घरातील चारीही माणसं गुलामीतच. बायकापोरे पण !

३) निवृत्ती बाबु सोनवणे (वय २५ वर्षे) १४ वर्षे राबतोय. कारण काय तर पाटलाच्या शेतावर घाम गाळताना अपघात होऊन जखमी झाला. जखम दुरुस्तीसाठी म्हैशीचा दाखला देऊन वर अजून स्वत:ला गाढवागत राबतोय्. कर्ज १९०० रु.

४) अर्जुन सखाराम सोनवणे (वय ३५) लहानपणापासून गुलामी, बाप पण मालकाकडंच गुलाम होता. कर्ज १००० रु.

५) रंगनाथ महादेव सोनवणे (वय ३५ वर्षे) १७ वर्षे राबतोय. बापपण हयातभर राबला तरी बापाचे कर्ज ७५० रु. शिल्लक नि ह्याचे स्वत:चेही कर्ज रु. १०७५/–

६) दादाराव नामदेव सोनावणे (वय १५ वर्षे) हे कोवळं पोर. वडिलांनी राबूनही न फिटलेलं कर्ज फेडण्यासाठी जिंदगी गुलाम बनवून बसलाय.

७) मुरलीधर नामदेव सोनावणे (वय ३०) बापाचं कर्ज फेडण्यासाठी भावाबरोबर राबतोय्. दडपशाहीनं बेजार, स्वत:च कर्ज नसूनही नोकरीची जबरदस्ती !

८) मल्हारी हरिबा सोनवणे (वय ३०) चार वर्षे राबतोय.

५०० रु. कर्जासाठी. बापाच्या २०० रु. कर्जाचं 'नसलेलं ओझं' पण हाच सांभाळतोय गुलामगिरीत !

९) तुकाराम अंकुश सोनवणे (वय २२) ७ वर्षे बांधीलकीचा राबता ! हयातभर बापाला न फिटलेल्या कर्जाच्या फेडीसाठी ! कर्ज ३००० रु.

१०) दासू अंकुश सोनवणे (वय २६) सात वर्षापासून गुलामी ! बापाचे कर्ज (३००० रु) भावाबरोबर फेडण्यासाठी.

११) तुळशीराम दगडू सोनवणे (वय २२) जबरदस्तीची गुलामी! बापाचे कर्ज फेडण्यासाठी. बाप जिंदगीभर राबूनही ! हिशोब दाखविण्यात टाळाटाळी !

१२) परशुराम किसन कांबळे, सात वर्षाचा कर्जफेडू गुलाम !

१३) ग्यानबा बाबू सोनवणे (१६ वर्षे) पाच वर्षापासून हे पोर घामाचं पाणी करून 'गुलामी'त जगतंय. नोकरीची जबरदस्तीही आहेच!

या तेरा बांधील मजुरांबरोबर खालील दलित मजुरांना पण पिळले जाते.

१) नामदेव शिंदे २) पांडुरंग सखा सोनवणे ३) साधू हिराजी ठगे ४) भीवा सखा सोनवणे ५) सुधाकर किशन सोनवणे ६) हरिदास तात्याबा सोनवणे ७) दादाराव किशन सोनवणे ८) केरबा शंकर सोनवणे ९) शिवाजी पांडुरंग देडे १०) देवबा हरिबा सोनवणे ११) ग्यानबा रामचंद्र सोनवणे १२) किशन लिंबा कोळी १३) म्हादू रामा शिंदे १४) धवन विठोबा तेली १५) विलास विठोबा तेली १६) करीम शेख १७) वसंत दोडे १८) दगडोबा देडे.

दोन वेळची भाकर देऊन यांना केवळ जिवंत ठेऊन जनावरागत राबवून घेतलं जातं. पिढ्यान पिढ्याची ही गुलामगिरी आहे. बापाचं कर्ज फेडलं तर त्याच्या नावावर नसलेलं कर्ज लावलं जातं व गुलामी चालूच राहते. नाडणूक, पिळवणूक चालूच राहते. ना वार्षिक वेतन ना मासिक वेतन ! नुसती कर्जफेडीची गाढवी राबतेगिरी ! या गुलामांनी सुटकेसाठी कुणाजवळ प्रयत्न केल्यास त्यांना कुत्र्यासारखं झोड झोड झोडपलं जातं !

परवा पदयात्रिक गेले तेव्हा त्यांना भेटलात तर जीवे मारीन

म्हणून पाटलाने दम भरला. तरीही ह्या नरकातून सुटका करून घेण्यासाठी रातोरात दुसऱ्या गावाला येऊन त्यांनी आपले 'हाल' कमुनिस्ट पदयात्रिकांना सांगितले. पदयात्रिकांनीही सर्वांची नावे, अर्ज घेऊन त्यांना सुटका करण्याचं वचन दिलं. लातूरचे मंत्री ना. शिवराज पाटील (चाकूरकर) यांनाही प्रत्यक्ष भेटून हा सरंजामदारीचा घृणास्पद प्रकार सांगितला. या बाबतचे निवेदन उस्मानाबाद जिल्हा कम्युनिस्ट पार्टीतर्फे ना. शंकरराव चव्हाण यांना पाठविले आहे.

❖

ढोकी हत्याकांड

ढोकीला अनेक वेळा पास करून गेलोय. बसमधील इतर प्रवाशाप्रमाणं मी तेरणा तीरावरील तेर परिसरातील तेरणा सहकारी साखर कारखान्याचं चकाकते सुवर्ण वैभव अचंबित डोळ्यांनी दरवेळी टिपून घेत असे !

आजही संत गोरा कुंभारांच्या पावलांनी पुनीत झालेल्या ढोकी परिसरातील मातीकडं निघालो होतो. ढोकी फॅक्टरी जवळ आली तशा उसाच्या बैलगाड्यांच्या रांगा दिसू लागल्या. उसाचे भरघाव ट्रक नि बड्या शेतकऱ्यांचे 'हरितयशाचे' ट्रॅक्टरही जात होते. या उसाची तेरणा कारखान्यात 'गोड साखर' तयार होणार आहे. याच परिसरात उसाच्या रसाऐवजी माणसांचं लालबुंद रक्त गाळणाऱ्या कटु घटनेची हत्याकांडाची कथा ऐकायला मी आज चाललो आहे. उसाच्या रसाच्या गाळचाबरोबर ढोकीने क्रूररित्या रक्ताचं गाळपही केलंय !

फॅक्टरी आली. उतरलो. हॉटेलात चहाला गेलो. पारध्यांच्या पेढीचा (इकडे पारध्याच्या पालाला पेढी म्हणतात) ठिकाणा हवा होता. हॉटेलात महसूल खात्याची माणसं पारध्यांच्या पेढीवर "चांगला चा" न्यायला आली होती. त्यांनी हातानी दिशा वेटरला दाखविली. पेढीची दिशा कळली. पेढीवर पोहचलो. तिथं असिस्टंट कलेक्टर आले

होते. ' चांगला चा ' त्यांच्यासाठीच होता ! पारध्यांसाठी नव्हे.

पेढीच्या चारी बाजूला नजर फिरविली. पाठीमागं उजाड रान, रानामध्ये पेढी. पेढीसमोर झोपडपट्टी, झोपडपट्टीला लागून रहदारीचा सोलापूर–नांदेड रोड, रोड पलीकडं छोटी टेकडी, टेकडीच्या बाजूला तेरणा फॅक्टरीचे भव्य गेट, गेटसमोर कळंब रस्ता !

पेढी केवढी, तर दहाबाराच कोपी ! बांबूच्या, वेताच्या बनवलेल्या ! हवेच्या झुळकीनेही उडतील अशा ! ना मजला, ना भित ना निटसं झोपडंही ! स्वयंपाकघर, बैठक वगैरे नावं मोकळ्या मातीलाच ! अशी ही कोप. कोपीत जर्मनची दोनचार भांडीकुंडी. भाकरीचं टोपलं. काही कपडेलत्ते पडलेले. बस्स झाला संसार ! चुलदेखील कोपीत नाही. ती कोपी बाहेरच आणि मातीची नव्हे तर दगडं मांडून केलेली.

काही चुली पेटल्या होत्या. हायब्रीडची भाकर एक स्त्री भाजत होती. कोंबडी भोवती पिलांचा गोतावळा तसा तिच्या भोवती पाच सहा पोरांचा गोतावळा. विंचवासारखा कारभार. पाठीवरच यांचं बिऱ्हाड. सदैव भटकंती ! किती स्थिर सरकारं आली गेली यांना ना ठाव ना गाव !

असिस्टंट कलेक्टर तरुणच होते.तहसिलदारांनी केलेल्या कुटुंबाच्या नोंदीच पुन्हा एकवार ते घेत होते. बाजूलाच एस. आर. पी. व पोलिसांचा तंबू पडला होता. तो संरक्षणासाठी, पण संरक्षणाची गरज संपल्यावर ! हे नेहमीचंच ! काही आकरीत घडत न्हाओ तोपर्यंत पोलिस येत न्हाओत; नि येतात ते उपयोग नसतो तेव्हा ! ' शोभेच्या बाहुल्यांसारखे शस्त्र घेऊन ! ' असिस्टंट कलेक्टर श्री बाठीया फ्री वाटले. ओळखपाळख झाल्यावर रिलिफ मेझर्स व पुनर्वसनाबद्दल विचारल्यावर म्हणाले, " आम्ही पुनर्वसन व सहाय्यता याबाबत प्रयत्न करतोय. कारण हा कम्युनल ॲटॅक आहे की नाही याबाबत शासनाचं मत बनायचंय. आम्ही माहिती पाठवितोय. सद्या काहीही देऊ शकलो नाही."

बाठीया साहेबांनी खास आलेला ' चांगला चा ' प्रेमाने दिला. मलाही पूर्वी हॉटेलवाल्यानं ' जनता चा ' दिल्यानं मी आनंदाने घेतला आणि माझ्या कामाला लागलो. पारधी मंडळींशी साहेब लोकांचे काम

झाल्यावर निवांत बोलायचं ठरविलं ! तोपर्यंत घटनेबाबत काही शोधा-शोध सुरू केली. बसमध्ये त्या भागातील एक शेतकरी म्हणाला होता,

" बरं झालं सायब पारधी मारले. लई कडू व्होतं. लई तरास व्हता. "

त्या शेतकऱ्याची बाजूही साधारण एकजात सवर्णांची बाजू !

तेर सर्कलचे गिरधावर (सर्कल इन्स्पेक्टर) एन. डी. देशपांडे, ढोकीचे पोलिस पाटील पांडुरंग पाटील, तलाठी त्र्यंबकराव देशपांडेंशी बोललो. ते म्हणाले,

" कल्लाप्पा पारध्याची पेढी. ही खरी कोलेगावची पेढी ! कोलेगावाला पारध्यांचे कोलेगावच म्हणतात. कोलेगावहून तिथल्या गावकऱ्यांनी यांची घरे लुटून हाकलून लावलं म्हणून १५ दिवसांपूर्वीच सहा फेब्रुवारीला कल्लाप्पानं पेढी इथे आणली. पेढीची जमीन ही त्यानं १५ दिवसापूर्वीच श्रीमती लक्ष्मण कलावटेकडून दोन गुंठे, हजार रुपयांना घेतलीय आणि लगेच ही घटना घडली. "

मूळ गावी म्हणजे कोलेगावला लुटल्याने कल्लाप्पा ढोकीला स्वत:च्या जागेत राहयला आला होता तर !

कारण विचारता गावकऱ्यांची बाजू मांडताना पोलीस पाटील श्री. पांडुरंग पाटील म्हणाले,

" कल्लाप्पाच्या पार्टीला मारलं. पण इथल्या ढोकीच्या दुसऱ्या पेढीला कुणीही हात लावला नाही. असं का ? पूर्वी ७३ साली सर्कल इन्स्पेक्टर पाटील व परवा दिवाळीत आक्टोबरच्या सुमारास फौजदार ठोंबरे काही गुन्ह्यांच्या चौकशीसाठी पेढीवर गेले असता त्यांच्यावर पारध्यांनी हल्ला केल्याने ते जखमी झाले व्हते. या भागातील शेतकऱ्याला लई तरास व्होता. पीकं लूट, रस्त्यात लूटमार कर, हीरीवरच्या मोटारी चोर, बायावापडयांची छेड काढ. असं हे करायचे ! राती पाच-पाच माणसाला एक-दोन पारधी लुटायचे. जाणं मुश्कील झालं व्हतं ! लोक किती दिस सहन करणार ? म्हणून हे घडलं बघा. पाच सहा खेडयाचे लोकं आलते बघा. "

त्या भागातल्या एका दुसऱ्या शेतकऱ्याला कारण विचारल, "नाव न घेता लिव्हा भंग सांगतो. एक दिस आधी ह्या पारध्यांनी गोरेवाडीचा

हरबरा खुडला अन् देवळालीची हीरीचं मोटर चोरली म्हणून देवळाली, कोलेगाव, पळसप, बुकनवाडी, ढवराळा, कावळे, वाडी, वाणीवाडी इथलं लोक यीवून मारलं ! "

सारं बोलताना एक जाणवलं की, त्या भागातील शेतकऱ्यांचा पारध्यांनवर जबर राग होता. आता पुन्हा अटकसत्र चालू केल्यानं आणि माजी राज्यमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांचे अनुयायी साखर कारखान्याचे चेअरमन अरविंद गोरे, शहाजी गोरे, उद्धव सरकोळे हे कारखान्याचे सिक्यूरीटी ऑफीसर आदि बडी मंडळी यात आरोपी म्हणून पुढं आल्यानं एकच खळबळ माजली आहे. ५४ जणांवर कोर्टाने खटले भरले आहेत. तर त्यातील नऊ जण फरार आहेत. कोलेगावच्या लोकांनी पारध्यांपासून संरक्षण मागितलं आहे व त्यासाठी राज्य राखीव दलातील पोलिसही लगेच 'प्रॉम्टपणे' पाठविण्यात आले आहेत.

'यात राजकारण आहे का ?' असं एका कर्मचाऱ्याला विचारल्यावर तो म्हणाला,

" राजकारण आता शिरलं. डॉ. पद्मसिंह पाटील विरुद्ध किसनतात्या समुद्रे. (माजी चेअरमन फॅक्टरी) यांच्या गटाचं राजकारण यात आहे. जुनी दुष्मनकी असंल बी ! एका पेढीला एक पुढारी संरक्षण देतो, तर दुसरीला दुसरा ! असंबी असू शकल. "

आता पोलिसांनी म्हणे १९ फेब्रुवारीला गुन्हा अन्वेषण विभागांना ३८ लोकांवर ऑक्टोबर ७९ मध्ये पारध्यांची वस्ती जाळली, मारले म्हणून कोर्टात गुन्हा दाखल केला आहे. जुनी घटना आता उकरून काढल्यानं आणि गावकऱ्यांच्या मते पारधी कुणाचीही नावं घेत असल्यानं शेतकऱ्यात भीतीचं वातावरण आहे, असं आपलं त्या भागातील लोकाचं मत !

एकंदरीत राजकारण वगैरे सारं लक्षात घेता त्याचे मत असं,

" झालं ते बरं झालं. लई तरास व्हता. "

ना घटनेचा खेद ना खंत ! ना आघोर कृत्याची पश्चातापाची जाणीव. ही एक बाजू !

० ० ०

आता पेढीकडं वळालो. पारधी मंडळीची बाजू सगळ्यात

महत्त्वाची. ढोकीच्या मूळच्या पेढीचे व कल्लाप्पाचे मावसभाऊ महादू बापू काळे व बुकनवाडीच्या पेढीचा सरदार गुलाब म्हणाले,

" कोलेगावला आख्खं लुटलं. जीव बचवायला इथं पंधरा दिसाखाली आलतो आन् असं घडलं. काठ्या, कुऱ्हाडी, गजण्णा घेऊन आले. कोलेगावच्या गायरानात बांधकामात चाललेल्या माडीच्या गजण्णा होत्या ! या भागातल्या पेढ्या त्यांनी लुटल्या. कोळेगाव, पळसप, बुकनवाडी, बाकरवाडी, वडोळा, गोविंदपूर, वडवळा, कोथाळा इथल्या पेढ्या गाववाल्यांनी ' पारध्यास्नी हुसकायचं ' म्हून लुटल्या ! ढोकीलाबी आलते पर गावातील पुढारी माणसांनी लुटू दिलं न्हाओ ! देवळालीच्या सरकाळ्यानं दोनदा लुटमार केली पेढीची ! पण एकदाच धरपकड झाली. "

एवढ्यात कल्लप्पा चव्हाणचा पोरगा श्रीरंग चव्हाण, आप्पा चव्हाण आले. त्यांना मी पेपरवाला आहे म्हणून सांगितल्याने ' आन पेपर छापनाछ ' असं पारधी भाषेत गडीबायांना सांगितल्यावर सारे माझ्याभोवतो गोळा झाले. ही पेढी ११२ जणांची बायकापोरांसहीत ! हा गोतावळा सर्व कल्लाप्पा चव्हाणचा ! तो प्रमुख, त्याचाच आधी खून झाला ! या हत्याकांडात कल्लप्पा या ७० वर्षाच्या म्हाताऱ्यासहीत गणप्पा चव्हाण हा त्याचा भाऊ, चंदर अंतु शिंदे हा ५० वर्षाचा कल्लापाचा मेव्हणा, रोहिदास चंदर शिंदे हा २२ वर्षाचा तरूण पुतण्या, बबन कल्लप्पा चव्हाण हा २० वर्षाचा कल्लाप्पाचाच भुलगा व छगन शामराव काळे हा कल्लाप्पाचा जावई अशी कल्लाप्पा कुटुंबातीलच माणसं ठार झाली आहेत. ही पेढी म्हणजे कल्लाप्पा, त्याची बायकापोरं, जावई, पणतू, नातू, त्यांच्या बायका असा सग्याचा गोतावळा! तेराबायका जखमी झाल्यात. काहींचे फ्रॅक्चर झालेय. ११ पोरांना मार बसलाय ! सारा इतिहास कल्लाप्पा भोवती तयार झालेला! ते सांगू लागले. - - -

कल्लाप्पांची सून कलावती जरा बोलकी होती त्याचा दोन्ही हात फ्रॅक्चर झालेला भाऊ गुलाब सांगू लागला ! सोमवार दिनांक १८ फेब्रुवारी ८० ची ती भीषण घटना. . .

" हामी झोपलेलं व्हतो. सकाळी सहा वाजायची वेळ. काय झोपलेलं, काय चेव व्होते. हामच्या ध्यानीमनी न्हाय. हामाला

कोलेगावावरनं लुटून हाकून दिलते. परपंचबी लुटाय नव्हता. जीव फकस्त व्हता. जीव कशाला घेतील हा इचार ! हामाला माहित असतं तर पळून जात व्हणाव ! माणसं आली, माणसं आली म्हून कालवा झाला. दोन टरक व्होत्या. एक टॅरॅकटर व्हता ! सरकाळचाची एक टरक, कोलेगावचा सरपंच विष्णू लोमटचाची टरक अन् गोऱ्याचा टॅरॅकटर व्हता. हिकून काही आलं. तिकून काही आलं. जमलं तसं आले. कुणी पायदल आलं कुणी गाडीनं. कुणी टरकनं ! चार साडे-चारशे माणूस. पेढीला चक्करच टाकला. कडं पडलं.

पहिल्या सुरुला म्हाताऱ्याकडं आले. (म्हातारा म्हणजे कल्लाप्पा) दगडू कदम, सरकाळे, शाजी गोरे व्हते. म्हातारा झोपला व्हता. उठला. बाहीर आला. पाव्हणे आले म्हून रामरामी घातली. तर शेवटची रामरामी हाय म्हनले. आन् मानवर काठी घातली. पायावर कुऱ्हाडी मारली. म्हातारा पडला. डोक्यात गजनी घातले. म्हातारा मेला. कल्लाप्पा मेला का नाही बघाय डोळ्यात बोट खुपसले. कल्लाप्पाचा जीव घेतला. दुष्मन मेला म्हून जय घातली. ''

मी म्हणालो, '' बाकीची मंडळी काय करत होती ? मधे पडली नाहीत का ? ''

कलावती व गुलाब सांगू लागले. पोरगा श्रीरंगही बोलत होता, '' बाया मधी पडत व्हत्या. एका एका बाईच्या अंगावर दहा-दहा माणूस. काय करणार सायब, बायास्नी लई मार दिले बघा. हामच्या लेकराबी मारले वं ! ''

म्हाताऱ्याला मारल्यावर गण्णप्पाला मारले. चंदर, वसंत, लोमटे, परभू वाघमारे त्याला मारीत व्हते. डोक्यात कुऱ्हाडी घातले. पाय तोडले. गजणी डोळ्यात खुपसले. तो बी मरून पडला. ''

गण्णप्पाची बायको अंजनाबाई पुढं आली. ती भावनावश होऊन म्हणाली, '' नव-याच्या अंगावर मी पडले म्हून गजण्यांनी मारलं. हे डोकं फुटलं. कुऱ्हाडीनं मारलं. ''

एक मला दिसलं. त्यांच्याकडं भीति नव्हती. खटाखट ते बोलत होते. नाव घेत होते. कल्लापाला दोन बायका. धाकटी बायको गजराबाई अगतिक होऊन म्हणू लागली,

" ढबराळं, पळसप, बुकनवाडी, गोऱ्हेवाडी, देवळाली, पाच या गावाचं लोक आलतं. दनादना म्हाताऱ्यावर काठ्या घातल्या. मदी पडल्यावर आमाला मारले. कल्लाप्पा मेल्यावर ' एक मेले तर मेलेच, दहा मेले तर मेलेच ' म्हून हल्ला केला. बायाबापड्यांचं पांघरून राहू दिलं न्हाअी. गळ्यात मनी राहू दिला न्नाअी. लेकराच्या सऱ्या, काकनं नेली. नाकातल्या मोरण्या, लुगडे, भांडीकुंडी तोडले. इतकी भीक लागली व्हती त्यास्नी ! चारबाऱ्या लुटले. "

श्रीरंग व गजराबाई म्हणाली, " सरकारनं कायबी दिलं न्हाअी. शिवराज पाटलानं दौनशे रु. व बाबा आढाव, प्रा. भांडवलकरानी पाचशे रु. दिलं. "

कल्लाप्पा व गण्णप्पाला मारल्यावर चंदर संतू शिंदे (५०) या मेव्हण्याला मारलं. ते सांगताना चंदरची दोन्ही हात फ्रॅक्चर झालेली सून रकमाबाई सुबराव शिंदे म्हणाली, " चेचून चेचून काढलं. कुठं कुठं मारलं काय सांगू ? जागचे जागी ठार झालं. सासऱ्याच्या अंगावर पडले तर डोस्क्यात कुऱ्हाड घातली. हातावर गजण्या मारले. फ्रॅक्चर झाला. टाकं पडलं ! "

किती बायका व मुलं जखमी झाली विचारल्यावर श्रीरंग म्हणाला,

" तेरा बायका आन् नाना, पोपट, गणा, शाजी, अच्युत, मच्छींद्र ही पोरंबी जखमी झाली. एक घंटा रण चाललं व्हत. बाजूच्या झोपडपट्टीचे व इतर लोक बघत होते. कुणीबी मदी पडलं न्हाअी. "

पोलिस केव्हा आले विचारल्यावर कलावती म्हणाली, " मारु लागल्यावर मी लहान लेकरू सोडलं अन् पळत ढोकीच्या पुलीस ठेसनात गेले. कांबळे साहेबाला सांगितलं ! वर्दी घालून मला तिथंच थांबायला सांगून ते सायकलवर आले. तवर दोन मढे पडले होते. "

दवाखान्यात जखमींना नेलं. त्यात २२ वर्षांचा व ६ महिण्याची गरोदर बायको असणारा चंदर, शिंदेचा पोरगा रोहिदास चंदर शिंदे (२२ वर्षे), बबन कल्लप्पा चव्हाण हा चार महिण्याचा मुलगा असणारा कल्लप्पाचा २१ वर्षाचा तरुण मुलगा मेला. कल्लाप्पाचा जावई छगन शामराव काळे हाही पुढे मेला.त्याला नागरबाई, उजाबाई

दोन बायका. तीन मुली, तीन मुलं ! कल्लाप्पाचा पोरगा आप्पा चव्हाण पूर्वी केलेल्या लुटमारीची माहिती देताना म्हणाला, " दिवाळीच्या टायमाला दोनदा आमच्या पेढीची कोलेगाव व पळसपला लुटमार केली. कोलेगावची आमची पक्की इटाची घरं लुटली. रिपोर्ट पोलीसानं घेतली न्हाअी. चवकशी केली न्हाअी. तिथून इथं मालकीच्या जागंवर पंधरा दिसापूर्वी आलो तर हे घडलं ! पळसपचं बाईनं केलेल्या रानातली पीकं लुटली, झाडं तोडली. बे भाक केलं ! २२ लोकावर फौजदारी केली.

माझ्या म्हाताऱ्यानं ठाण्यात ' मला मारतील, धोका हाय, चवकशी करा ' असा अर्ज केला. पण चवकशी झाली न्हाअी. तीनदा लुटलं. आज जीवच घेतला. "

ह्या घटनेमागं काहीतरी वेगळं कारण असावं असं मला वाटलं आणि त्या दृष्टीनं विशेषत: सरकाळेबाबत त्यांची दुष्मनी काय असं विचारल्यावर श्रीरंग म्हणाला,

" कोलेगावच्या शिवारात हामची बावीस एकर जमीन हाय. सरकाळेनं तिथंच जमीन घेतली. बांधाला बांध हाय. सरकाळेच्या रानात पाषाण हाय. आमाला पाच हातावर पाणी. सरकाळचा पाणी द्या हीरीचं म्हणला. आमी न्हाई दिलं. खाल्ल्या बाजूला नदी आडवली. पाईप लाईन आमच्या रानातनं नेऊ द्या म्हणला. आमी न्हाअी म्हनलं. मंग उस, इंजन आमचं त्यानं मोडलं. आमचा त्याला व त्याचा आमाला तरास सुरू झाला. आमाला दोनदा त्यानंच लुटलं. मंजी आमी कोलेगावातनं पळून जावं मंग जमीन त्येला मिळंल असा डाव होता. "

पळसपच्या पारूबाई कोळी या बाईच्या पासष्ठ एकर जमिनीची वहीवाट जबरीनं कल्लाप्पा करतोय अशीही विरोधी पार्टीची तक्रार होती. ती म्हातारी देखील मला भेटली. तिनंही तिची कथा सांगितली. पार्वतीबाई शंकर कोळी ही म्हातारी म्हणू लागली, " माझं कोन न्हायी. लेकरूबाळ न्हाअी. मला सासुरवाडीची ६४ एकर जमीन मिळाली. नंदंच भावाचं अन् दादारावाचं मजं भांडण व्हत. ते मला मारायचे. मला जमीन त्येचा नावावर करू दे म्हणायचे. जमीन चांगली हाय. मेल्यावर तुज्याच नावानं म्हनल्यावरबी मला घरात मारलं. म्या गाव सोडलं.

ढोकीत राहयले. कल्लाप्पाजवळ गोतावळा हाय, कानूनबाज हाय म्हून जमीन करायला दिली आन् कोर्टात वाद चालला. वादाचं तिक्कं केलं तर निम्मी जमीन दीन म्हतले. कल्लाप्पानं आतापर्यंत कोर्टाचा खर्च केला. माझ्या पोटापांखरूणाचा केला. घराचा वाद राहयला. तो जागंचा वाद निक्का झाला की जमीन देणार व्हते. तर असं घडलं !"

म्हातारी पार्वतीबाई पुढं भावनावश होऊन म्हणाली, " दुष्मन माझं कायबाय बोलत्यात. मी ठिवल्याली म्हून लोक बोलत्यात. शेत ५ वरसाखाली दिलं. तुमी नातवावानी. माझं वय बघा. दुष्मन कायबाय बोलत्यात."

मी पार्वतीबाईला म्हणालो, "काहो हे पारधी मंडळी चोऱ्यामाऱ्या करतात हे खरं का ? "

ती म्हणाली, " हो चोऱ्या करतात. कानावर आलं असतं तर मी बाई माणूस. मी कोळी ते पारधी. मी शेत दिलं असतं का ? कष्टानं शेत करून खात्यात, कानूनबाज हाय म्हणून शेत दिलं. "

कलावतीला व श्रीरंगला, लोकांना चोऱ्यामाऱ्यामुळे तुमचा त्रास होतो हे खरं का म्हणल्यावर ते म्हणाले, " ते काय तरी कारण सांगत्यात. बावीस एकर जमीन. परत बत्तीस एकर बटईनं करतो. चोऱ्या करायच्या असत्या तर आमी शेत केलं असतं का ? आमालाच त्यांनी दोनदा लुटून नेलं आन् आमालाच चोर म्हणत्येत ! "

" कल्लाप्पाला पूर्वी शिक्षा झाली आहे का?" असं मी विचारताच त्याचा समवयस्क भाऊ गुलाब बापू म्हणाला, " निझामाच्या वेळंस पण हायकोर्टात हामी बरी झालो. तवा ८।। वर्षाची शिक्षा झालती. अपीलीत मुंबईत बरी झालु."

अशी ही पारधी लोकांची बाजू. त्यांच्या अत्याचाराची, सांडलेल्या रक्ताची अशी ही कथा. जमिनीच्या वादाची कथा !

० ० ०

निघताना मी विचार करू लागलो. 'पारधी चोरही असतील, तरी अशी जीवघेणी, अमानुष शिक्षा कायदा हातात घेऊन द्यावी का ? चोरी करणं गुन्हा मोठा की जीवं मारणं ? कल्लाप्पा एखाद्या बामणाच्या घरी जन्मला असता तर असा चोर झाला असता का ? त्याचं गाव

नाही. स्थिर ठिकाणा नाही. पोराबाळांनाही शिक्षण नाही. घर नाही. हा या समाजव्यवस्थेचा दोष आहे का नाही ? आणि सर्वात महत्त्वाचं प्रतिष्ठित म्हणवून घेऊन शेतकऱ्यांना पिळणारे, शोषण करणारे (पांढरे चोर) व्यापारी, कर्मचारी आणि इतरही छुपे यांना का नाही आपण अशीच शिक्षा देत ? त्यांना आपण प्रतिष्ठा देतो. त्यांनी टाळूवरचं लोणी खाऊन केलेल्या पैशांनी त्यांची नावं शाळा कॉलेजांना दानशूर ही पदवी देऊन देतो. अधिकाऱ्यांची साहेब म्हणून विणवणी करतो, भ्रष्ट पुढाऱ्यांना सन्मान देतो. पारध्यांनी केलेल्या गुन्ह्याचं समर्थन कोणीच करणार नाही. पण त्यांना अशी शिक्षा तर इतरांना कोणती देणार आहोत ? त्यांनी गरीब शेतकऱ्यांना जरूर त्रास दिला असेल, त्यांची ही शिक्षा तर गरीब शेतकऱ्यांना पिढ्यानपिढ्या पिळणाऱ्यांना कोणती ?

माझा एक कविमित्र शरणकुमार लिंबाळे म्हणतो,

" चहूकुन हल्ल्याने मरणाऱ्यांचा हुंकार
चार बदमाशांच्या तावडीत गुदमरणारा आक्रोश.
ओंजळभर पाण्यासाठी व्याकूळ टाहो.
सांगा, सांगा, गंधर्वांनो, कुठल्या पट्टीतील सूर आहेत ? "

❖

नारूग्रस्त आरव्खे गाव

आज आपण सर्वत्र आरोग्य सेवा व्यवस्थित पोहचली जातेय. असं म्हणतो, पण हे खरं आहे का ? पूर्वीच्या काळी साथीच्या रोगांनी माणसं खेड्यापाड्यातून पटापट मरायची. आज ती अवस्था राहिली नाही. त्यामानानं खूपच प्रगती झालीय. तरीही ग्रामीण भागात काही ठिकाणी अनारोग्यानं थैमान घातलेलं आजही पाहावयास मिळतं !

आता हेच पाहा नं! नारू नावाचा रोग. हा रोग आपणास फक्त वाचून किंवा ऐकूनच माहीत आहे. बहुधा पाठ्यपुस्तकातून वाचलेला आणि नारूत माणसाचं चित्र पाहिलेलं असेल ! पायाला नारू झालेला माणूस आणि त्यातून बाहेर आलेला नारूचा जंतू !

तर मराठवाड्याच्या अंतर्गत भागात अजूनही काही खेड्यांची दशा खरोखरच अतिशय वाईट आहे. त्यातीलच काही खेड्यात 'नारू' नावाचा संसर्गजन्य नि पाण्यातून संसर्ग होणारा रोग आपलं साम्राज्य राखून आहे.

मराठवाड्यात आजमितीला नांदेड, उस्मानाबाद आणि परभणी जिल्ह्यातील काही खेड्यात नारूनं, लोकांना हैराण केलंय. ती गावं म्हणजे उस्मानाबाद जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील माकेगाव, नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्याची पाताळगंगा नि खेरकवाडी,

पोलिसवाडी ही खेडी व परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील तांदुळवाडी हे गाव.

या खेडचातील घराघरांतून नारूग्रस्त माणसं आहेत. त्यातून लहानथोर, बायका, पुरुष, मुलं, कुणीही सुटलेलं नाही. किंबहुना या गावातून 'नारू' न झालेला माणूस शोधून मिळणं केवळ अशक्य आहे. सर्वांनाच नारू झालेला आहे. एका एका माणसाला किती म्हणून नारू व्हावे ? एका माणसाला एका वेळी पंधरा पंधरा, वीस वीस नारू झालेले आहेत.

नारू होतो कशामुळं ? दुषित पाण्यामुळं. नारू या रोगाचा आणि मराठवाड्यातील अहमदपूर, कंधार,गंगाखेड या तालुक्यातील पिण्याच्या पाण्याच्या भीषण दुर्भिक्षाचा जवळचा संबंध आहे. या तालुक्यातून अर्ध्याहून अधिक खेडचात व तालुक्यातील ७५ टक्के खेडचात पाणी



टंचाई ही असतेच. ही टंचाई अगदी ऑगस्ट महिण्यापर्यंत चालू असते. संपूर्ण मराठवाड्यात पाणी टंचाईच्या या काळात सुमारे २००० खेडचांना नि सुमारे १५ लाख लोकसंख्येला अतिशय कष्टात दिवस काढावे लागतात आणि नारूचं कारण हेच आहे.

ज्या ज्या गावात नारूचा प्रादुर्भाव आहे त्या गावात पाणी टंचाई आहे आणि विहिरीत पाय–हात बुडवून पाणी भरलं जातं, किंवा पाण्याची खूप टंचाई असल्यानं वाटीनं वगैरे खरडून पाणी मिळवावं लागतं. जवळपास ८।१० किलोमीटरपर्यंत कुठंही पाणी नसल्यानं

नाईलाजानं दूषित असलं तरी ते पाणी प्यावं लागतं किंवा काही ठिकाणी गावातील विहिरीचं पाणी संपलं की ४–५ कि. मी. वरील तळ्यातून पाणी आणलं जातं व या तळ्यात हमखास नारूचे जंतू असतातच !

माकेगावच्या विहिरीबाबत बोलायचं झाल्यास रहाटानं पाणी काढण्याची व्यवस्था असली तरीही उन्हाळ्यात विहिर खोल जात असल्यानं व आत आरपार कपार असल्यानं घागर फुटते म्हणून मग पायऱ्यावरून उतरून पाणी काढलं जातं व घराघरातून नारू आढळतो.

मी जेव्हा माकेगावात फिरलो तेव्हा या गावातल्या घराघरात 'नारू' झालेला पेशंट होता. घरात एकानं तरी पट्टी बांधलेली होतीच. त्यात लहान मुलं होती, तशाच बायकाही होत्या व तरुण, म्हातारे पुरुषही होते.

तिथल्या कामधेनू विद्यालयाचे चाटे गुरुजींनाही नारू झाल्याचं त्यांनी दाखवीलं. जो नारायण लहाने माझ्यासोबत होता त्याच्या लहान बहिणीलाही नारू झालेला. नारू एकाला किती ? अनसाबाई कांबळे या तरुण स्त्रीला ११ नारू एकावेळी झाले .... निवृत्ती मोहोळ या दलितास १३ जागी नारू ! अर्जून लहाने याचीही कथा तीच !

सुकुमार श्रीहरी गवळी हा ५–६ वर्षांचा मुलगा. आजीजवळ म्हणजे भागीरथीबाई घोडकेजवळ राहायला आलेला. त्याला पायाला नारू. मी गेलो तेव्हा पडून पडून रडत राहिलेला होता, मलूल व रडवेल्या चेहऱ्यामागून त्याला होणारा त्रास जाणवत होता. आजी म्हणाली, " लई तरास हाय बापू. रातभर लडत बसला व्हता. ह्याचा आज्जा खचल्यापासनं हा इथंच हाय. "

हा मारोती लहाने. ३०–३५ वर्षांचा तरुण. याला दोन नारू झालेले. तीनेक महिने पडून ! " लई सळवतोय " असं तो म्हणाला.

ही छबू तुकाराम लहाने. ५ वर्षांची मुलगी. तिच्या पायाला नारू झालेला. मी पाहायला गेलो तेव्हा ती खूपच रडायला लागली. त्या लहान मुलीला जीवघेण्या यातना होत होत्या ते पाहावलं नाही अगदी !

बाबू केंद्रे गुरुजी व निवृत्ती लहानेंनी सांगितलं की, " लक्ष्मण, भानुदास नि लिंबाजी लहाने यांना इतके नारु झाले की शेवटी चक्क ते अपंग झाले आणि त्यातील लिंबाजी लहाने जे बी. ए. बी. एड्. झालेले आहेत, त्यांना अपंग म्हणून पाटबंधारे खात्यात नोकरीही लागली.

काही लंगडेही झालेयत. "

नारूनं माणूस फार विकलांग होतो. अशक्त माणूस तर मरणप्राय यातना भोगतो. धडधाकट गळाटून जातो. त्याला जेववत नाही, खाववत नाही. त्याला कायम पडून राहावं लागतं.

निवृत्ती लहाने यातला एक गंमतीदार किस्सा सांगताना म्हणाले, " हामच्याकडं नारू झाला की 'भागीपण' आलं असं म्हणतात. मंजी नारू झाला की शेतं पडीक राहत्यात, कामावर जाताच येत नाही. पडून राहावं लागतं ना ?"

असं हे " भाग्य " (भागीपण) हे नागरिक बोलतात ! परभणी जिल्ह्यातील तांदूडवाडीलाही हेच हाल होते. गावातील एक मोठी विहिर आहे. तिला पायऱ्या आहेत पण त्या न बुजवाव्या अशी म्हाताऱ्या माणसांची श्रद्धा ! नारू झाला तरी चालेल पण पायऱ्या बुजवायच्या न्हाई. त्यामुळं गाव नारूग्रस्त झालंय. पाहुणा म्हणून माणूस ८।१० दिवस राहिला तरी नारू व्हायचाच. तेथील कार्यकर्ते देशमुख नि सुरेश जाधव हा तरूण वकील मित्र म्हणाला, " अंधश्रद्धेमुळं हा त्रास होतो. जनतेला किती त्रास होतो पण ते भावना बदलायला तयार होत नाहीत."

कंधार तालुक्यातील पाताळगंगा नि खेरकडवाडीची हीच दूर्दशा! हीच कथा . . . . तिथल्याही जनतेची हीच हालत! एका-एकास १०-१० नारू म्हणजे पहा !

या नारूला काही उपाय नसल्यानं (आरोग्य खातं कधीमधी औषधं देतात पण निरुपयोगी) शेतकरी नि रोगी खाजगी नि गावठी उपाय करतात. तेही फारच क्रूर असतात. ते असं करतात की नारू उमटल्या उमटल्या त्या जागेवर लोखंड तापवून त्याला डाग द्यायचा. हा डाग देतानाचा त्रास अतिशय असतो पण लोक सहन करतात. परंतु नारूग्रस्त जाणत्यांचं म्हणणं असं की, " डाग दिला तरी जातोच असं न्हाय. तो दुसरीकडून निघतो, पण जरा हलका जातु. " म्हणजे डाग देऊनही काही उपयोग होत नाही.

बरं हा आजार तीन महिने छळतो व त्रासाबरोबर माणसालाही गाळून टाकतो. तीन महिने घरी बसणं म्हणजे मजूरीवर पोट भरणाऱ्यांची काय हालत होत असेल याचा विचारही करवत नाही.

शेतकऱ्यांची पीक पाण्याची कामं न झाल्यानं त्याला धड भीकही मागता येत नाही अशी ही दुर्दशा !

काहीजण वेगळीच गावठी रीत अवलंबतात, ती सांगतात, एक गावकरी म्हणाला की, " नारूच्या तिसऱ्या सुजला, मंजी तवर दोन महिनं झाल्याले असत्यात, त्यावेळी दाभण नारुच्या ठिकाणी घालून ह्यातनं पू, नासकं रगत काढत्यात, असं केलं की, १५ दिसात नारू थांबतू ! पण असा थांबला तरी दुसरीकडं येण्याचं संकट कायमचं असतं !

माकेगावला गतवर्षी १५७ जणांना नारू होते. अशीच हालत इतरही खेड्यांची ! माणूस कोलंबियाद्वारे अवकाशात संचार करीत असताना मराठवाड्यात विसाव्या शतकातही मानवाला या संकटांना तोंड द्यावं लागतं हे दुर्दैव म्हणावं लागेल. दुसरं काय ?

❖

कणाचं सामर्थ्य मणाचं करावं !

(पारितोषिक प्राप्त लेख)

' झम झम ल ला ल ला ' या साथीच्या तालात ' डोंगरमाथ्याला आमचा गाव– कुणी फुगावं कुणी मरावं– डोंगरमाथ्याला आमचा गाव.' ' लोककथा ७८ ' हे जिवंत नाट्य वेदनांच्या ओंजळचा पाजीत होतं ! रत्नाकर मतकरींनी अुभ्या केलेल्या ह्या वेदनानाट्याचा क्षणक्षण प्रत्येकाच्या हृदयात घर करीत होता. कुणाच्या नव्हे बहुतेकांच्या डोळ्यांना अश्रूंचा कळा बोचीत होत्या. पहिल्या दिवसाच्या प्रयोगानं अेक ' जिवंत धगधगतं दुःख ' दाखविलं सर्वांना सायंकाळी ७ ते ८।।. त्या दिवसाचं सार्थक ! सर्वात समर्थ संवादसत्र ! " लोककथा ७८ " ठरलं ! अितर चर्चासत्राहूनही अधिक इफेक्टीव्ह !

० ० ०

राजस्थान हायस्कूल गजबजलं होतं.

प्रास्ताविक संयोजक प्राचार्य जनार्दन वाघमारे उभारले आहेत. ' मला बाहेर हिंडताना ' ' विषमता चाललीय पाहा ' असं ' नावाजलं ' जातंय.मराठवाड्यातील अत्याचारानं समतेची चळवळ पाठीमागं गेलीय.

नामांतर व्हायला हवं. अन्यथा अत्याचारांना जस्टिफिकेशन मिळेल नि लोकशाही प्रक्रिया गतिरूद्ध होईल. मराठवाड्यानं निर्माण केलेल्या प्रश्नांची अुत्तरं मराठवाड्यातच शोधावित हा हेतू. ही व्यवस्था अनेकांना भरडतेय–भाजतेय. आदिवासी, भटक्या जमाती, शेतमजूर, मुस्लीम, ग्रामीण स्त्रीया, शेतकरी आणि दलित या सर्वांच्याच प्रश्नांना उत्तर हवंय.

'न्यू क्वेस्ट'कार प्रा. अ. भि. शहा इंडियन सेक्यूलर सोसायटीची भूमिका मांडतात.

" धर्मप्राबल्यानं घटनेमध्ये विदित केलेल्या मूलभूत मानवी मुल्यांच्या रक्षणासाठी अन्यायाविरुद्ध जनमत जागे करण्याचे कार्य सोसायटी करतेय.

पुरोगामी शक्तीचे विघटन

फुले प्रतिष्ठानचे डॉ. बाबा आढाव " भावांनो, नि बहिणींनो आपली बांधीलकी सामाजिक समतेशी. इथं विविध विचारांच्या संघटना आलेल्या. प्रत्येकाचा कांगोरा वेगवेगळा. पण परिवर्तनाच्या ऐरणीवर आपणा सर्वांना एकत्र यायचंय. नांदायला बायकोनं न आल्यावर यावं वाटतं तशी आच आज गरजेची आहे. "

प्रा. गं. बा. सरदार आता उद्घाटन भाषण करताहेत " मी पुस्तकी क्षेत्रातला माणूस. आपली मतं वेगळी, दृष्टी वेगळी, विचार वेगळे पण समाजपरिवर्तनाचं उद्दिष्ट अेकच. सर्व शोषितांचे प्रश्न एकाच पातळीवरचे, प्रत्येकाचा आशय वेगळा. तपशील वेगळा. मार्ग वेगळा. पण शोषणमुक्त समाजनिर्मिती हे ध्येय एकच. यासाठी विविध विचारसरणींची माणसं एकत्र जमलीत. त्यामुळं सामुहिक समग्र जीवनाचं दुखणं आणि इलाजाची चर्चा व्हावी. अज्ञान, परंपरा आणि हितसंबंध हे तीन परिवर्तनाचे अग्रीम अडथळे. त्यातही पुरोगामी शक्तीकेंद्र कमी. खरं म्हणजे पुरोगामी शक्ती विघटित होत आहेत. आणि संघटित स्वरूपात सनातनी शक्ती वाढताहेत. विविध सामाजिक संस्था हव्यात कशाला ? त्यात ' अेकमुखीपणा ' का नाही ? खरं म्हणजे विविध संघटना ह्या ' नव्या ' जाती संघटना झाल्या म्हटलं तरी चालेल ! खरं म्हणजे 'विधायक कार्याचं कर्मकांड' होवू न देणं महत्त्वाचं ! खरं म्हणजे

मी बोललो ते पुस्तकीच आहे. "

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य म. भि. चिटणीस म्हणाले,

" विचारानं प्रगत पुरोगामी माणसं आचारानं विषमता पाळतात. मार्क्सच्या मतानुसार या देशात सर्वात जास्त 'अेलीएनेशन' व 'डिह्युमनायझेशन 'दलितांचं झालं. भारतीय लोकशाही ही मेजॉरिटीची म्हणजे कम्युनल मेजॉरिटीची झाली,म्हणून दलित, शोषित अेकत्र यायला पाहिजेत. समता निर्मितीसाठी विषमता हवीच असते, सवलतींसाठी ! धर्मांध नि अंधश्रद्ध बनविणारी पाठ्यपुस्तकं नि आकाशवाणी यात परिवर्तन व्हायला पाहिजे. "

दलिताची व्याख्या

पहिलं चर्चासत्र. प्रा. ना. य. डोळे अध्यक्ष. वक्ते बाबुराव बागूल. संचालक प्रा. जी. अेल. हिंगोले. विषय दलित-दलितेतर सामाजिक संबंध.

बाबुराव बागूल. काळाभोर रंग. गंभीर चेहरा.

निवडणूकीनं जातीसंघटना संघटीत झाल्या. जातीचं उदात्तीकरण झालं. दलित-दलितेतरांची माझी व्याख्या. सामाजिक उत्पादन प्रक्रियेत स्थान नसणारा दलित ! दलित-दलितेतरांना अेकत्र आणण्यासाठी आर्थिक लढे अुभारायला हवेत नि सामाजिक-सांस्कृतिक लढाही हवा. डाव्या पक्षात जातीय संघटना जात नाहीत. जनसंघ ब्राह्मण जातवादी तर रिपब्लिकन पक्ष दलित जातवादी. पण दलितांची जातीय संघटना क्षम्य हवी. राजकारणास जातीय पक्षीयात फाटाफुटीस पाठिंबा द्यायला हवा. राजकारण आवश्यक. राजकारण पुरोगामी गटाच्या ताब्यात कसे येईल याचा विचार व्हावा. काहीही विचार न करता मी हे बोलतोय. "

आय काँग्रेसचे अॅड. विठ्ठलराव दुडिले 'पोलरायझेशन ऑफ कॉस्ट' ऐवजी 'पोलरायझेशन ऑफ आयडियालॉजी' ची मागणी करताहेत. खासदार शृंगारे, संदिपान वडगिरे, सौ. हिंगोले, अॅड. होळीकर, नरेंद्र दाभोळकर, तानाजी ठोंबरे, प्रा. दत्ता सोमवंशी, अुमाकांत पाटील, चंद्रकांत घोडके, काँ. गोपाळ शेळके, दिलीप कदम, प्रा. शाम आगळे, हुसेन दलवाअी, सुधीर गव्हाणे आदीनी चर्चेत 'रसरंग' भरलेला आहे.

आपण भाऊ भाऊ, दोघे मिळून खाऊ

दुपारचं सत्र. विषय : दलित अंतर्गत परस्पर संबंध व समस्या

आहेय. अभिवक्ते प्रा. रावसाहेब कसबे, अध्यक्ष ॲड. मनोहर गोमाटे तर संयोजक गणपतराव पिडगे आहेत.

प्रा. रावसाहेब कसबे : " वरिष्ठ जातीय डावपेचांवर महार मांगाच्या डावपेचाचे राजकारण चालते. सवर्ण अस्पृश्य संबंधासारखेच दलितांमधील अंतर्गत संबंध असतात. जाती व्यवस्थेचे विचार दलित जातीतही जीवंत आहेत. असं असलं तरी दलित जातींना सर्वजण एकत्र यावं ही सामान्याकडे जाणीव आढळतेय.

भारतीय अितिहास जातींचा नि जातीयवादाचा आहे. सांसदीय लोकशाही स्वीकारल्याने ही लोकशाही ' कम्युनल डेमॉक्रसी ' झालीय. आपण ' अेक माणूस अेक मत ' हे तत्त्व स्वीकारल्यानं या देशातील विविध जाती या 'मतांच्या बँका' झाल्याहेत. जातिसंघर्ष, जातिव्यवस्था मोडण्यासाठी आणि टिकविण्यासाठी होतो. महार-मांग, चांभार, ढोर या समाजातून वर्गीय जाणिवांनी तयार झालेलं नेतृत्व अुभारलं गेलं पाहिजे. सांसदीय लोकशाही हे ध्येय नव्हे, समाजपरिवर्तन हे ध्येय. व्यापक पायावर वर्गीय संघटना अुभारल्या तरच क्रांतिमार्ग सुस्पष्ट होतील. "

' चर्चा ' गरम होते आहे. गोरोबा पवार मातंग समाजाचे ग्रामीण नेते, म्हणताहेत महारांवर आरोप करताना ' शेंबूड नाकाला, सांगतो लोकाला. ' लोकशाहीची बालुशाही झाली अन् सवलतीनं म्हारांचं वाफं भिजलं. मांगाचं वाफं कोरडंच राहिलं. तवा " आपण भाऊ भाऊ, दोघं मिळून खाऊ. " गोरोबांनी धमाल अुडवली. ओमप्रकाश कलमे, प्रा. दहिवले, कॉ. ज्योत्स्ना मराठे, प्रा. उद्धव कांबळे, भागवत सांगवीकर, प्रा. गवई, पार्थ पोळके, आण्णाराव लामतुरे, शांताराम पंदेरे, पिराजी कांबळे, ॲड. रामचंद्र मोरे, सुधीर गव्हाणे मुद्दे मांडताहेत. पिराजी कांबळे ग्रामीण कार्यकर्ते. गोरोबा पवारांना अुत्तर देताना मोठा विनोद करताहेत. गोरोबा महारांचे वाफे भिजले. बाबासाहेबानं मोटंनं पाणी काढलं. मांगाचं कोरडं राहिलं म्हणल्यावर पिराजी म्हणताहेत, "माझ्या माहितीप्रमाणं बाबासायबानं कुठलीबी पाणीपुरवठा योजना केली न्हायी. मोटंनं पाणीबी काढलं न्हाअी. मग मांगाचं वाफ भिजल्यात कसं ?"

पुन्हा मंडपात बसलोय. स्टेजवर अध्यक्ष खा. तुकाराम शृंगारे, अभिवक्ते : डॉ. रा. प. नेने, संयोजक : श्री. मा. ना. मामडगे बसलेले.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३२५८
दिनांक २५/१२/९३
२८/४/९९

विषय : राखीव जागा व शैक्षणिक सवलतींचा प्रश्न

डॉ. रा. प. नेने : " सामाजिक न्यायासाठी राखीव जागा द्याव्यातच पण त्याही प्रत्यक्ष दिल्या जात नाहीत. राखीव जागांना निम्म्या राज्यांनीच मान्यता दिलीय. राज्याराज्यात सवलतीबाबत भेद. कार्यक्षमता न बिघडता सवलती द्याव्यात असं घटना म्हणते, त्याचा दुरूपयोग करतात. सवलती तृतीय श्रेणीतही ३४ टक्यांपैकी २० टक्के जागा (शिक्षक) भरल्याहेत. सवलती व राखीव जागांना विरोध या देशातील अर्थव्यवस्था कोलमडल्याने होतोय. पण राखीव जागांमुळे सवर्ण गरिबांना नोकरी मिळत नाही असा बुद्धीभेद केला जातोय. आर्थिक दुर्बलानीही सवलती मागाव्यात पण नकारात्मक भूमिकेने दलितांच्या सवलतींना विरोध करू नये. खाजगी क्षेत्रात तर दलितांना जागाच दिल्या जात नाहीत याचा विचार व्हावा."

अेकोणीस मार्च

बलुतेदारीचे रूप बदला

दुसरा दिवस. आजची सुरुवात 'बलुतेदार जातींच्या प्रश्नावरील' चर्चेने होतेय. अभिवक्ते डॉ. अनिल अवचट, अध्यक्ष श्री दलपतराव साळुंके, संयोजक वसंतराव जगताप आहेत. अभिभाषक अनिल अवचट बोलत आहेत, " बलुतेदारांचे प्रश्न ह्या जातिव्यवस्थेचे प्रश्न आहेत. बलुतेदारीचे कायदेकानू गावातच बनतात. अर्थात त्यांचे आर्थिक प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यासाठी त्यांची संघटना उभी करायला हवी."

डॉ. बाबा आढाव म्हणतात, " कनिष्ठवर्णीयांची बांधीलकी अुच्चवर्णीयांशी असते, ती बदलून बलुतेदारांची बांधीलकी कनिष्ठ वर्णीयांशी व्हावी. "

प्रा. कांबळे, खा. शृंगारे, भाऊसाहेब पवार, चंद्रकांत माघाडे, सरिता देवस्थळी, नागेश चौधरी (नागपूर), ओमप्रकाश कलमे, पी. अेल. सुर्यवंशी, गोरोबा पवार, हुसेन जमादार, बाबाराव यल्लमवाड, प्रा. हिंगोले, प्रा. मधुकर मुंढे, विनायकराव कुलकर्णी, दलपतराव साळुंखे बोलले आहेत.

कुणी बलुतेदारांची संघटना नको. ' जुन्या खोडाला पाणी घालाच कशाला ? ' म्हणतय. हुसेन दलवाई मुस्लिम बलुतेदारांचे तर सरिता

देवस्थळी बलुतेदार स्त्रीयांच्या श्रमसहभागास स्थान नाही म्हणतेय. खा. शृंगारे बलुतेदारांमधील गुंतागुंत सांगताहेत. व्यवसाय परिवर्तनानेच बलुतेदारांचे प्रश्न सुटतील असा सूर निघतो आहे. डॉ. अनिल अवचट सहभागी झालेल्यांच्या शंकांना लगेचच उत्तर देताहेत. सत्र संपत आलेय.

आदीवासींवर वसाहतवादाचे आक्रमण

'आदिवासी जमातींचे प्रश्न' चर्चेला घेतले गेले. 'शहादा चळवळीचे' ध्येयधुंद म्होरके कुमार शिराळकर अभिवक्ते आहेत तर अध्यक्ष आदिवासी कार्यकर्ती छायाताई सुरतवंती आहेत. राजाभाऊ उदगीरकर संयोजन करीत आहेत. चर्चा खूपच चांगली होते आहे. अभिभाषक कुमार शिराळकर म्हणताहेत,

"आदिवासी जमातीवर वसाहतवादाचं प्रगत समाजाच्या रूपानं आक्रमण झालं व त्यांनी त्यांची विविधांगी पिळवणूक सुरू केली. स्वच्छंदी जीवन त्यानंतर फिरती शेती; त्यानंतर आता 'स्थिर शेती व्यवसाय' ही आदीवासींची विविध स्थित्यंतरे आहेत. स्थिर शेतीनं त्यांचं जमिनीशी नातं जोडलं गेलं. या आदिवासींची सावकारी, व्यापारी, जमिनदारी व भांडवली असं चार प्रकारचं शोषण होतेय. आदिवासींचे काही नेमके विशिष्ट प्रश्न असले तरीही त्यांचे प्रश्न या देशातील सर्व शोषित, दलितांसारखे प्रश्न आहेत. ते वर्गीय व वर्णीय प्रश्न आहेत. आदिवासी आपल्या मोर्चावर पोलिसांनी हल्ला केल्यास प्रतिकार करतात. त्यांनी स्वसंरक्षणार्थ, अन्यायाविरुद्ध लढताना केलेली प्रतिकात्मक हिंसा मानावी काय? हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. पिकविलेले दाणे तोंडात पडावे म्हणून लढणाऱ्या आदिवासींना हिंसाचारी म्हणावे काय? आदिवासींची चळवळ एकूणच दलित शोषितांच्या चळवळीस जोडायला हवी. ती अलग राहून आदिवासींचे प्रश्न सुटू शकणार नाहीत म्हणून व्यापक आदिवासी, दलित, शोषितांचा लढा क्रांतीसाठी अधिक ताकदवान बनविणे हे महत्त्वाचे!"

प्रा उद्धव कांबळे : "आदिवासींमध्ये धर्मशक्तीही शिरताहेत. ख्रिश्चनायझेशन व हिंदूनायझेशन हे मोठे धोके परिवर्तनाच्या चळवळीस आहेत. त्यांचे भाषिक आरोग्य, जंगल कायदा, अंधश्रद्धा, आरोग्य आदि समस्याही कठीण आहेत!" वसंत पळशीकरांनी कुमार शिराळकरांच्या

'न्याय्य मागणी करताना स्वसंरक्षणार्थ आदिवासींनी केलेला प्रतिकार' समर्थनीय नाही असं सांगून त्यांची अस्मिता बांधावी व परिवर्तनातून नवी व्यवस्था चांगली येईलच याची शाश्वती नाही असं म्हटलं.

बसवराज कोरे, के. डी. पाटील (कोल्हापूर) यांच्या नंतर डॉ. बाबा आढाव उभेयत :

"हिंसा दुधारी शस्त्र. स्त्रीनं बलात्कार करणाऱ्याचा बदला घेतल्यास ती अहिंसा असं गांधींना वाटत असे."

आण्णाराव लामतुरे नंतर प्रा. सुदर्शन मोरे आदिवासी स्त्रीच्या लढाउपणाविषयी सांगताहेत.तर प्राचार्य राजाराम राठोड (औरंगाबाद) "घटनेनं दिलेल्या सवलती आदीवासींपर्यंत पोहचल्याच नाहीत.सवलती आता जर बंद केल्या तर त्याचा सर्वात जास्त फटका आदिवासींच्या पिढीस बसणाराय" असं मत देतात.

अशोक फूल नंतर छायाताई सूरतवंती ह्या आदिवासी कार्यकर्त्या अध्यक्षीय समारोपास उभ्या आहेत. त्यांची पांढरी खादिची साडी व आदिवासी उच्चारप्रधान मराठी भाषा मोठी लोभस वाटतेय, "अमरसिंह महाराजांच्या प्रेरणेनं आम्ही आदिवासी स्त्रिया आंदोलनात उतरलोय. आदिवासी स्त्रीला मजुरीचे समान हक्क हवेत आम्ही लढा देतो आहोत."

आदिवासींच्या आदिम अंधारातील जीवनावर फारच उद्‌बोधक चर्चा झाली, छायाताईचे अनुभव सर्वाधिक बोलके तर कुमार शिराळकरांचे विश्लेषण रॅशनल असा तो दुहेरी संगम.

० ० ०

भटक्या जमातीचे प्रश्न

'भटक्या जमाती व गुन्हेगार जमाती यांच्या शिक्षणाचे व पुनर्वसनाचे प्रश्न' या विषयावर चर्चा प्राचार्य राजाराम राठोड या भटक्या जमातीमधील प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या विचारी व्यक्तिच्या अध्यक्षतेखाली सुरू होतेय. त्यांच्या मते, "तीस वर्षांमध्ये भटक्या जमाती व गुन्हेगार जमातीवर पहिल्यांदाच सर्वपक्षीय व सर्वजातीय व्यासपीठावर चर्चा होते आहे ही आमच्यासाठी अत्यानंदाची बाब !"

शंकर भारती संयोजक आहेत. अभिभाषक प्रा. मोतीराज राठोड भलतेच खुमासदार व तितकंच नोकदार बोलताहेत. सर्वजण त्यांच्या

कुठल्याही अभिनिवेश नसलेल्या पण ' ओरिजनल ' भाषणास दाद देत आहेत, ते म्हणताहेत,

" ज्या देशात झाडांची, जनावरांची मोजणी होते, त्यांच्या प्रश्नाची चर्चा होते पण माणूस असणाऱ्या भटक्या जमातीच्या माणसांची मोजणी होत नाही. त्यांच्या प्रश्नांची चर्चाही होत नाही. भटक्या जमातीवर पहिल्यांदा एका इंग्रज लेखकानं लिहिलं. भारतातील विद्वानांना लिहावं वाटलं नाही. भटक्या व गुन्हेगार जमातीचे लोक पोटाकरता चोरी करतात म्हणून त्यांना अमानुष छळवादास व शिक्षेस तोंड द्यावे लागते पण या देशात दिवसाढवळ्या लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करणारी माणसं पोट पुढं करून आरामात हिंडतात. भटक्या व गुन्हेगार जमातींना १९६४ पासून शिष्यवृत्ती मिळू लागली. पहिली पदवीधर बॅच ७५ साली सुरू झाली. ३५ लाखांपैकी फक्त २ टक्के समाज स्थिर झाला आहे. "

चर्चेत डॉ. म. भि. चिटणीस, व्यंकटेश चौधरी, श्रीधर दापकेकर, गोरोबा पवार, नारायण गायकवाड, प्रा. अंबादास वरदेकर, सुरेश शिरपूरकर, डॉ. अनिल अवचट यांनी भाग घेतला.

० ० ०

भारतीय मुस्लिम परंपरावादी

' भारतीय मुस्लिमांच्या सामाजिक प्रश्नांवर ' अभिववते श्री. मुनीर सय्यद बोलण्यास अुभे आहेत. संयोजक आण्णाराव लामतुरे, अध्यक्ष प्रा. अ. भि. शहा चर्चा करू नका, आमच्या धर्मात दखल देऊ नका ' असा इशारा लातूरच्या मुसलमानांनी दिल्याने थोडी धाकधूक होती. पण सारे कसे शांत, शांत पार पडलेय.

" मुस्लीम सत्यशोधक चळवळ ही व्यापक समता चळवळीचा एक भाग आहे. समता, सामाजिक न्याय ही मूल्ये त्यामागे उभी आहेत. मुस्लीम समाज मस्जीदमध्ये समतेनं वागतो; बाहेर श्रीमंत मुसलमान गरीबांना गुलामासारखंच वागवितात. भारतीय मुसलमान स्वत:ला तुर्की, अिजिप्त या आफ्रीकन मुसलमानांहून श्रेष्ठ समजतात. बेटीव्यवहार होत नाही. भावी पिढीची जडणघडण करणाऱ्या ५० टक्के स्त्रियांना हा समाज पडदापद्धती, तलाकपद्धतीनं पुरुषांच्या दावणीला

जनावरासारखं बांधलं आहे. तिला वारसा हक्कही मिळत नाही. भारतीय मुसलमानांमध्ये कोणत्याही प्रकारची सामाजिक अभिसरणाची चळवळ न झाल्यानं तो समाज धर्मांध आणि प्रचंड परंपरावादी झाला आहे. पाकिस्तानी क्रिकेट संघ विजयी व्हावा म्हणून प्रार्थना करणारे मुसलमान इथं आहेत तसेच त्यांच्या या गोष्टीवर टीका करणारे अब्राहमसारखे 'संडे'चे संपादकदेखील तयार होताहेत ही चांगली गोष्ट आहे.'

प्रा. सुभाष जोशी (निपाणी), चंद्रकांत माघाडे (पुणे), सौ. रत्नप्रभा बेंबळेकर, नरेंद्र दाभोळकर, सौ. सुनिती आरळीकर, प्रवीण वाघ, सौ. हेमा रसाळ, हेही स्त्री-शिक्षण, आर्थिक प्रश्न, अन्याय आदि विचार सांगते झाले आहेत.

आता दणदणीत आवाजात सय्यदभाऔ (पुणे) म्हणताहेत : "मुस्लिमांना नोकऱ्या मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पण 'इस मुल्कमे हिफाजत नही चलेगी' म्हणणारे जमाते इस्लामी व मुस्लीम लीगचे कार्यकर्ते घरातील बाईला पायातील चपलीसारखे क्रूर वागणूक देतात. घरातील आयाबहिणींना माणसासारखी वागणूक देणाऱ्या मुसलमानांनी बाहेर मुसलमानांना समान हक्क द्या म्हणताना जरा घराकडं पाहावं."

प्रा.अ.भि. शहा यांनी अध्यक्षीय समारोपात म्हटले, "मुस्लिमांचा आर्थिक प्रश्न हा दारिद्र्यरेषेखालील सर्व भारतीयांचा प्रश्न आहे. देशाचा आर्थिक विकास व न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाल्यास सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया 'सेक्यूलर' राष्ट्र निर्मितीसाठी आवश्यक आहे.

वीस मार्च

दुर्बल शेतकरी आणि शेतमजुरांचे प्रश्न व संघटन अभिभाषक शे.का.प. नेते खा. उद्धवराव पाटील, संयोजक : संदिपान बडगिरे व अध्यक्ष भास्करराव जाधव.

"शेतमालाचे भाव पडते आहेत. शेतीचे विकेंद्रीकरण होते आहे आणि दुर्बल शेतकरी व शेतमजुरांच्या संख्येत वाढ होते आहे. हा वर्ग संघटित व्हायची क्रांतीसाठी नितांत गरज आहे."

डॉ. बाबा आढाव : "गरीब, मध्यम आणि दुर्बल शेतकऱ्यांच्या

प्रश्नांची जाण शहरी मंडळींना नसते. आजचा कष्टकरी कर्मचारी वर्ग या शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी उठत नाही. डॉ. वि. म. दांडेकरांनी मांडलेल्या संघटित–असंघटित वादाचा विचारही येथे व्हावा. "

प्रा. सुदर्शन मोरे : "बँक कर्मचाऱ्याचं वार्षिक उत्पन्न १७,७५०रु. तर ५४ अेकर सिलिंग जिरायत शेतकरी एकरी १५१ रु. उत्पन्न धरल्यास ते होते ८,००० रुपये. कर्मचाऱ्यांचे कामाचे दिवस १८० तर शेतकऱ्यांचे १२ महिने, हा विरोधाभास. "

श्रीकांत दापकेकर, शिवाजी काळे, प्रा. दहिवले देखील बोललेयत.

नक्षलवादी कॉ. गोपाळ शेळके: " शेती कसणारा शेतकरी. खरा शेतकरी हा घाम गाळणारा शेतमजूरच मानायला हवा. "

संघटित असंघटित वाद कशाला ?

शहादचाचे कुमार शिराळकर: " संघटित–असंघटित हा डॉ. वि. म. दांडेकरप्रणीत वाद हा एकूण ह्या व्यवस्थेविरुद्ध संघटित होणाऱ्या चळवळीस खीळ घालण्यासाठी भांडवलदार मंडळींनी बनविलेला वाद आहे. दांडेकरांचे भांडवलशाही विचारवंत आणि चरणसिंगासारखे खोटे नेते यांच्यापासून कष्टकरी शेतकऱ्यांची संघटना वाचवली पाहिजे. शेतकऱ्यांचे शोषण संघटित कामगार नव्हेत तर ही भांडवलशाही व्यवस्था करतेय. ही गोष्ट विसरू नये. " रोजगार हमी, मजुरी वाढ, सिलिंग यामुळं ' रिफार्म ' साधेल ' रिव्होल्युशन ' साधणार नाही ही गोष्ट विसरू नये. " शेषराव मोहिते, के. डी. पाटील, शांताराम पंदेरे, गोरोबा पवार, सूर्यकांत पोळ, पार्थ पोळके (सातारा), रविंद्र रसाळ, रंगा वैद्य, प्रा. जाधव इत्यादिनी आपले विचार मांडले.

खा. उद्धवराव पाटील: " शरीर डॉक्टराप्रमाणं आपण समाज डॉक्टर होऊन ' डायग्नोसिस ' करतोय. ब्रिटिशांचे काळात १७.५ टक्के शेतमजूर होते ते ७१ साली ३० टक्के झाले. पूर्वी सावकार शोषण करायचे आज राष्ट्रीयकृत बँका आणि खाजगी बँका करताहेत. आमचा देश एकीकडे रॉकेट, अणूबाँब तयार करतो पण शेतातला नांगर-कुळव तिथंच उभा आहे. एकीकडं दुर्बल शेतकरी जमिनी विकून मजूर होतोय आणि दुसरीकडं आम्ही एक–दोन एकर जमीन वाटप करतोय. ही मिश्र अर्थव्यवस्था बदलायला हवी तरच मूलभूत समस्या मिटेल.

अन्यथा मजूर ४५ टक्के झाल्यास नवल नाही."

० ० ०

स्त्रियांच्या नशिबाचा भोग

एकदाचा स्त्रीयांचा प्रश्न चर्चेला आलाय. कॉ. जोत्स्ना मराठे अध्यक्षस्थानी. अलका मोरे, सौ.सुनीता आरळीकर, मेहरुन्निसा दलवाई बसल्याहेत स्टेजवर ! विषय आहे : "ग्रामीण स्त्रीयांचे शैक्षणिक व सामाजिक प्रश्न."

आधीच महिलांवर अन्याय झाल्याने 'आम्हाला वेळेचं बंधन नको, आमचं ऐका 'असं सौ. मराठे यांनी सांगितल्यावर सर्वजणच माना डोलावताहेत. लता भिसे, सरिता देवस्थळे, मंगला खिवसरा, क्रांतीगीत गाताहेत. फटफटी बदलावी तशी बायको बदलणारे बागायतदार.

अभिवक्त्या बारामतीच्या अलका मोरे. "शहरी स्त्रीयांना ग्रामीण स्त्रीयांचे प्रश्न समजत नाहीत. त्यांनी ते समजून घेण्याचा प्रयत्न करावा. ग्रामीण भागात आजकाल 'फटफटी बदलावी तशी बायको बदलणारे' बागायतदार आहेत."

सौ. विजया इंगोले म्हणताहेत, ब्रिटनमधील कौमार्यभंग टेस्ट-विरूद्ध बोलण्याचा भारतीय पुरुषांना काही अधिकार नाही. इथं अल्पवयीन मुलींनवर बलात्कार करणारे पुरुष आहेत त्यांचं काय ? स्त्री मुक्तीसाठी पुरुषांनीच पुढं आलं पाहिजे."

नीलम गोऱ्हे, सौ. हेमा रसाळ, मंगला खिवसरा, मेघा जोशी, विश्वंभर चिचोलकर, नेने, लता भिसे, डॉ. विणाताई सुराणा, छायाताई सुरतवंती आपापल्या भाषणात स्त्री अत्याचार अन्याय उघड करताहेत. मुक्ताबाई चिचवडे (पाटील) ही म्हातारी मोठ्या अभिमानानं येऊन म्हणाली : "बायकांची चूक हाय. गड्याचीबी चूक हाय. अेकमेकाला दोष देऊ नाही. वंगाळ बोलू नाही."

सरिता देवस्थळे : "कुटुंब हे स्त्रीचं पिळवणूक केंद्र आहे. उत्पादक प्रक्रियेत तिच्या श्रमाचा मोबदला मिळत नाही." प्रा. हिंगोले, यदुनाथ मोरे, सुनीता आरळीकर, रुपसिंग हेही प्रश्न मांडण्यासाठी स्टेजवर आले आहेत.

कॉ. जोत्स्ना मराठे अध्यक्षीय समारोपात म्हणाल्या : "नेहमीचे

प्रश्न अल्पसंख्यांकांचे असतात पण स्त्रीमुक्तिचा प्रश्न हा बहुसंख्यांकांचा आहे. क्रांतीशिवाय स्त्रीमुक्ती अशक्य आहे. " खूपच उशीर झाल्याने सर्वजण 'पोटोबा 'साठी धावताहेत.

° ° °

कणाचं सामर्थ्य मणाचं करावं

आता महत्त्वाचा व शेवटचा परिसंवाद सुरू होतोय. बरीच बडी मंडळी भाग घेणाराहेत. सभागृह भरले आहे. ' सामाजिक समतेचा लढा–आव्हाने व पुढील दिशा ' हा विषय. डॉ. बाबा आढाव अध्यक्ष.

प्रा. अ. भि. शहा म्हणाले, " पारंपरिक धर्ममूल्यांवर आघात करावे लागतील, संघर्षही करावा लागेल. सर्व थरांतील तरुणांनी हे कार्य करावं. "

" सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी ताज्या परिस्थितीत डोळसपणे एका व्यापक व्यासपिठावर एकत्र येण्याची नितान्त गरज आहे. सरंजामशाही, भांडवलशाही अर्थव्यवस्था मोडण्यासाठी सर्व डाव्यांनी अेकत्र येऊन दलितांच्या नेतृत्वाखाली क्रांतीकारक चळवळी उभाराव्या लागतील. " (अजित सरदार.)

जातिव्यवस्था ही आर्थिक व बौद्धिक विभागणीही आहे. गुणवत्तेला नाकारणाऱ्या या व्यवस्थेविरुद्ध आपणास लढले पाहिजे. (नागेश चौधरी, नागपूर)

" मुल्यांचा पराभव झालाय पण ते आव्हान स्वीकारावं. कणाचं सामर्थ्य मणाचं कसं करावे, चळवळ स्वावलंबी कशी बनेल ते पाहावं " (खा. बापुसाहेब काळदाते.)

अध्यक्षीय समारोपात डॉ. बाबा आढाव: " जातिव्यवस्थेच्या चिखलातून आज एक एक पुरोगामी कमळं फुलताहेत. ती वाढायला पाहिजेत. वास्तव घुबड घुमल्यासारखं घुमत असतं. आचारानं विचारांचा मुडदा पडू देता कामा नये. समाजाशिवाय व्यक्तीचं स्थान गौन आहेय. आपली बांधीलकी कार्यक्रमाला हवी आहे. "

° ° °

सगळेजण मिरवणुकीनं डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्याकडं निघताहेत. पुतळ्याजवळ प्रा. गं. बा. सरदार चवदार तळ्याची आजची आठवण जीवंत करीत बाबासाहेंबांना हार घालताहेत. टाळ्याचा गजर.

❖

बार्शीचे 'साहित्य संमेलन'

'ए खारमुरेवालाय . . . . . !' असा आवाज कानी आला की, ओळखावं आपण बार्शीत आलोय. हे गाव बहुरंगी नि बहुढंगी ! इथं चहा इतका स्वस्त नि मस्त मिळतो की बस् ! इथली डाळ जशी प्रसिद्ध तशा तमाशाच्या 'संगीत बाऱ्या' प्रसिद्ध. बार्शीची 'बार्शी लाईट' रेल्वे आख्ख्या होल इंडियात ग्रेट तर इथला वेश्याव्यवसायही दर्जेदार आहेच असं (अनुभवीचं) एक मत ! 'संगीत बारीच परस्त्रिगमनाय च बार्शी शहर प्रसिद्धः' असं श्रेष्ठ संस्कृत वगैरे भाषेत म्हणावं असं ! इथल्या माणसाचीही गंमत न्यारीच ! इथं हिंदू-मुसलमान दंगेही दणकेबाज झालेत पण सवाऱ्या नि डोला बसतो तो हिंदुंच्या गल्ल्यागल्ल्यात गणपतीच्या उत्साहानं नि विसर्जनाला लागते स्पर्धा ! (कधी कधी मारामारीही) सोलापूर जिल्ह्यातील सोलापूरनंतरचं हे 'गिरणगाव' कामगार वस्तीचं ! शाहीर अमरशेख ही इथल्या कष्टकऱ्यांचीच देन.

अशा या बार्शीत पुण्याच्या बावन्नाव्या बावनकशी नि चंद्रपुरी त्रेपन्नाव्या चविष्ट अ. भा. साहित्य संमेलनानंतर ५४ वे साहित्य संमेलन भरलेय . . . .

शुक्रवार १ फेब्रुवारी ८०

कालपासूनच मुख्य मंडपाचं दर्शन घ्यायला बार्शी लोटतेय. आताशी परगावचे प्रतिनिधीही सुटकेसेस नि शबनम सावरत येताहेत. बार्शीवर शाहीर अमरशेखाच्या नावानं उभारलेलं हे संमेलन नगरु कष्टकऱ्यांशी बांधीलकी ' बोलतेय. तीन प्रवेशद्वारं आहेत, एकापाठी एक. मुख्यप्रवेशद्वारावरच संयुक्त महाराष्ट्र सम्राट अमरशेखांचा अर्धपुतळा स्वागत करतोय. त्याची मांडणीही कलात्मक. कवी कुंजविहारींच्या 'भेटे नऊ महिन्यांनी' या स्वातंत्र्यासक्त काव्यपंक्तीच्या नंतर लोकशाहीर रामजोशीची लुटूपुटू चाललेली ' नार ' नि सुंदरा मनामध्ये भरली ' ही लावणी कानात घुमविणारं हे प्रवेशद्वार आणि प्रत्येक बांबूवर शिरिष घाटे या नव्या दमाच्या, नव्या रेषेच्या बार्शीकार चित्रकाराने बोलक्या केलेल्या काव्यपंक्ती! प्रत्येक कविता प्रत्ययकारी! प्रत्येक कविता प्रत्ययकारी नि आशयगर्भ रेखाटनांनी जिवंत झालेली. कविता वाचत वाचत गर्दी पुढे सरकतेय. बार्शीतील अनेक साधीभोळी माणसं ह्या भव्य सोहोळ्याचं उत्साहदर्शन घेताहेत. एक अडाणी म्हातारी बाई म्हणतेय, 'काय बया, काय की मेळावा हाय म्हणं. बया, बया ! येवढ्या मंडपात कसलं लगीन झालं असतं हाय का नाय?'

परगावचे फार प्रतिनिधी आलेयत. नमस्कार चमत्कार चालूय. आता दहा वाजताहेत. प्रदर्शनांच्या वगैरे उद्घाटनांचा सोहळा सुरू होणाराय. अमरशेखनगरच्या परिसरात २५ स्टॉल्स उभेयत. मुलांनी महिलांनी चालवलेले. ' ग्रंथाली 'चा स्टॉलही आकर्षून घेतोय. ' महिला समाज–घराची अुब देणारे ' आणि कंसात खाद्यपेय पदार्थ असा एका स्टॉलचा बॅनर कोटी करणाऱ्यांना हसवतोय. एकंदरित जत्रेला आल्यागत वाटतंय. ' सन्माननीय अतिथी ' कवी, लेखक, समीक्षक, वक्ते चहापान करताहेत. त्यांचा चहापानाचा पेला पिऊन होईपर्यंत तिकडे मुख्य मंडपात " संगीत रुसला गं बाई रुसला " प्रयोग झालेला आहेच. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष यौवनवीर म्हातारे कवी अनिल आपल्याला कोणी रिसिव्ह करायला आलं नाही नि हॉस्पिटलमध्ये तिसऱ्या मजल्यावर ' राहण्याची सोय ' (डॉ. मधुकर आष्टीकर म्हणतात आम्हाला ' अॅडमीट ' केलंय) केल्यानं रुसलेत,

रागावलेत ! संयोजकांनीही या थकल्या माणसाची सोय कुठंतरी बंगल्यात करायची तर तिसऱ्या मजल्यावर केलीय. आधीच महाराज तापट नि तिखट. खणखण बोलू लागले. रागानं ग्लास फेकू लागले. संयोजकांचं सोय करण्यामध्ये चुकलं पण अनिलांचंही चुकलं ! महामंडळ ही संयोजक नियंत्रक संस्था ! तुम्ही दोन तीन दिवस आधी येऊन व्यवस्थेला मदत करायची तर तक्रार कशी करून जमेल ? पण अनिलांना कुणी सांगावं ? काय बिशाद आहे बोलायची. महाराज उद्घाटनाला यायला तयारच नाहीत.

इकडे महामंडळाचे चिटणीस डॉ. मधुकर आष्टीकर देखील संतापलेत. तेही एक उद्घाटक पण त्याचं कारण वेगळं. कालच्या महामंडळाच्या बैठकीत मराठवाडा विद्यापीठ नामांतराविषयीचा विरोध वा पाठींबा ठराव न घेतल्यानं कार्याध्यक्ष पन्नालाल सुराणांनी त्यांना सुनावलं की, ' तुम्हीच जबाबदार आहात काही गोंधळ झाला तर ! मुद्दाम तुम्ही ठराव येऊ दिला नाही. काही घडलं तर आम्ही तुम्हाला जबाबदार धरू. " झालं, बिचारे आष्टीकरही रूष्ट ! नागपूरकर मंडळी परत निघालीत अशी हवा ऐकू आली. आष्टीकर मंडपात दिसले. उद्घाटनाची वेळ तर झाली. कार्यवाह दिनुभाऊ सुलाखे आष्टीकरांना स्टेजवर येण्याचा आग्रह– विनंती करताहेत. पण " आम्ही संमेलन उधळवणारे म्हटल्यावर शक्य नाही " असं ते म्हणताहेत आणि मी मंडपातच थांबीन व नागपूरला जाणार नाही हेही सांगताहेत. स्टेजवर वाजणारी सनई. संयोजक दिनुभाऊ सुलाखे, पन्नालाला सुराणा यांना ते गोड वाटत नाही. ' ज्यांनी बोल सुनावले त्यांनीच यावे ' असं म्हटल्यावर पन्नालाला सुराणा स्वत: डॉ. आष्टीकरांकडे आलेत. " डॉक्टर साहेब, मी माझे शब्द मागे घेतो कृपया चला " म्हटल्यावर डॉक्टर आष्टीकरही जास्त आढेवेढे न घेता स्टेजकडे निघालेत. पण डॉ. आष्टीकर गरीब, सज्जन माणूस ! ते निघालेत. पण महामंडळ अध्यक्ष अनिलांचा ' रूसवा ' त्यांच्या वयाइतकाच मोठा आणि हट्टी. ते यायला तयार नाहीत. रुसवा मिटला नाही. अनिलांची ' वाट पाहाणं ' शक्य नाही. मिनतवारी पटली नाही. शेवटी तसाच उद्घाटन कार्यक्रम सुरू करायचं ठरलंय.

कवि अनिलांच रूसणं अजूनही चालूच आहे. ते येणार नाहीत. संयोजकांचे प्रयत्न फोल झालेले. महामंडळाचा अध्यक्ष आणि संमेलन-नियंत्रक जबाबदार माणसांचे हे बेजबाबदार रूसणं कुणाला पटावं? शेवटी अनिलांच्या ऐवजी डॉ. आष्टीकरच 'सर्व काही मोकळेपणाने विसरून' बार्शी कलामंडळाचे उद्घाटन करण्यास निघताहेत आणि 'आपला अंत न पाहात भाषणाचा शेवट करतो' म्हणताहेत.

डॉ. आष्टीकर ते आटपून आल्यावर मंडपात कवी अनिल आलेयत. स्टेजमागे गुप्त बैठक बसलीय. न. म. जोशी, देहाडराय, आष्टीकर, अनिल वगैरे आहेतच. अनिलांचा "पारा" तापलाय. पन्नालाल नि संयोजकांनवर ताशेरे उठताहेत. "नामांतर ठराव दोन्ही आणले नाहीत हे चांगले केलेत. यात आमची काय वाईट भूमिका होती" असं अनिल म्हणताहेत. एकंदरित व्यवस्थेवर आणि संयोजकांवर नागपूरकर संतापलेत. त्यांची थोडी गैरव्यवस्था झालीय हे खरंय! गुप्त बैठक संपलीय.

तिकडे बार्शीत अभिनव अशी "साहित्य दिंडी" या "संगीत रुसवा फसवा प्रयोगा'स विसरून जोरात निघालीय. बार्शीतील पंचवीसेक कलापथकं त्यात आहेत. एक मैलभर लांबीची ही दिंडी मोठी प्रेक्षणीय व विलोभनीय वाटतेय. विविध ऐतिहासिक प्रसंग, भजनी मंडळ्यांबरोबरच संतवाङ्मयाचे उपासक अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदारही दिंडीत हजर आहेत. दिंडी पाहायला बार्शीकरांनी गर्दी केलीय. गावाबाहेर असणाऱ्या संमेलनाची गोरगरीब बार्शीकरांना जाणीव झालीय. ११ ची दिंडी ११।। ला मंडपात पोचली. तिकडे भव्य जेवण, मंडपात जेवायला रांगा, कितीतरी राबणारी नि बनवणारी, वाढणारी माणसं. त्यांना संमेलनाशी देणं-घेणं नाहीय.त्यांना 'पोटासाठी रोजगार' मिळालाय हेच सत्य. एक स्वयंपाकी बाई म्हणत्येय, "काय हाय की बया. आमास्नी सयंपाकाला बोलिवलं आमी आलु. आमाला त्यातलं काय समजतया सायब."

आता सायंकाळचे ४ वाजताहेत. संमेलनाच्या उद्घाटनाची, मुख्य कार्यक्रमाची सुरुवात आता होणाराय. गर्दी वाढते आहेच. स्टॉलवर गिऱ्हाईकांची गर्दी वाढतेय. सभागृह भरते आहे. संमेलन उद्घाटनासाठी

स्टेजवर सारे रथी महारथी विराजमान झालेयत. रूसलेले अनिलही आलेयत तर ! आणि गं. बा. सरदारांच्या आगमनाला टाळ्या पडताहेत. मुख्य मंडप गच्च भरलाय.

संमेलनाध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार आता थकल्या वयात खुर्चीवर बसून आपल्या नेहमीच्या चॉकलेटी कलरचा कोट, टोपी – धोतर या ड्रेसमध्ये (शांतचित्त नि पंतीसारखं सोज्वल व्यक्तिमत्व) आपलं सत्तावीस पानांचं भाषण वाचताहेत.

दीर्घवेळ चाललेल्या या गंभीर पिंडाच्या भाषणानं स्टेजवर शंभरवर बसलेले साहित्यश्रेष्ठी आता १५।२० वर आलीयत. सारे बाहेर चहाला गेलेयत. शिवाय भाषण छापील मिळत असल्यानं कोणीही ऐकण्याच्या भानगडीत जास्तवेळ पडलेले दिसत नाहीय. श्रोत्यांचं नि प्रतिनिधींचं काय सांगावं. बाहेर स्टॉलवर जत्रेगत जोराची गर्दी उसळलीय. ' जनांचा प्रवाह ' आतबाहेर चालूच आहेय.

शनिवार २ फेब्रुवारी

आज दुसरा दिवस. आज विषय नियामक समितीची बैठक आहेय. ३१ च्या महामंडळाच्या बैठकीत नाकारलेल्या ठरावाविरूद्ध महाराष्ट्र साहित्य परिषदेची मंडळी घटनात्मक वाद मांडीत होती. त्याचे पडसाद या संमेलनात पडणाराहेत. साऱ्यांचे डोळे आणि कान विषय नियामक समितीकडे लागलेयत. त्याआधी फक्त दोन परिसंवाद. राज्यभाषा शाखा संमेलन व वास्तवातील खेडे व साहित्यातील खेडे. मुख्य मंडपात राजभाषेचा संसार तर आनंदभवनात दुसरा. एकाचवेळी दोन परिसंवाद. त्यामुळ गर्दी वाटून. पण ग्रामीण परिसंवादाला गर्दी जादाच, आनंदवनाजवळ बाहेर बैलं उभारली आहेयत. बाजूला आड आहेय. पाणी पाटानं वाहतेय. म्हणजे वास्तवातीलच खेडे दिसतेय हे !

तिकडे विषय नियामक समितीही सव्वा दहा वाजता सुरू झालीय. पंचदीसेक सदस्य हजर आहेत. अनिल अध्यक्षस्थानी बसलेत. कामकाजास सुरुवात झालीय. ठराव येताहेत. चिटणीस डॉ. आष्टीकर नेहमीच ठराव मांडताहेत. खरा ठराव असतो नामांतराचा. त्याची चर्चा कधी सुरू होणार यावर साऱ्यांचं लक्ष लागलेलं !

पुण्याचे डॉ. वि. रा. करंदीकर बोलायला वेळ मागताहेत.अनिल देताहेत. यांनी, महाराष्ट्र साहित्य परिषदेनं दहा दिवसापूर्वी पन्नास प्रतिनिधींच्या सह्यांनीशी दिलेला नामांतराचा ठराव विचारात घ्यावा असं मत मांडलं. त्यावर अनिल म्हणताहेत,

" ठराव हा प्रतिनिधींनी मांडावा लागतो आणि तसा तो मांडलेला नाही. छाननी करण्यासाठी मी ठरावाची मूळ प्रत मागविली ती दिली नाही. छाननीचा महामंडळास अधिकार आहे. संस्थेचा ठराव हा कार्यकारी मंडळाचा. तो प्रतिनिधींचा नाही म्हणून तांत्रिकदृष्टचा अग्राह्य आहे. "

पन्नालाल सुराणा: " घटनात्मक प्रश्नाचा आणि मराठवाडा साहित्य परिषदेचा संबंध काय ! "

निर्मलकुमार फडकुले, ' प्रश्न साऱ्या महाराष्ट्राचा आहेय. '

उभारलेले प्राचार्य कुरुंदकर खाली बसतात.

अनिल:– ' घटक संस्थेला ठरावाचा अधिकार नाही. आता माझं ऐका. तुमचं ऐकलं. ठराव प्रतिनिधीचा आहे का सांगा ? '

पन्नालाल सुराणा मध्ये बोलू मागतात.

' मधे मधे बोलू नका. '

म. प. दिक्षीत ' मला दोन मिनिट देता का ? '

' देणार नाही ' अनिल.

ग. बा. बेहरे– ' अध्यक्ष महाराज मला बोलू द्या ! '

' नाही. खाली बसा. ' अनिल.

' तुम्हाला दोनदा उत्तरे द्यायला नको. म्हणूनच बोलू द्या ' बेहरे.

' बोलायचं नाही, मला बोलू द्या. ' अनिल.

' तुम्ही स्वत:ला काय सुप्रीम कोर्टाचे जज्ज समजता काय ? दमदाटी चालणार नाही. फाजील तांत्रिक मुद्यावर वाद घालू नका. ' बेहरे तडकतात.

' फाजील शब्द मागे घ्या ! असं बोलू नका. ' अनिल.

'फाजील याचा अर्थ अतिरेकी. वाईट नाही.' डॉ. निर्मलकुमार फडकुले स्पष्टीकरण देतात.

ग. वा. बेहरे – ' फाजील शब्दाचा अर्थ चांगला आहे. तुम्ही

वाईट घेताहात कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य हे संमेलनाचे प्रतिनिधी आहेतच. तेव्हा तो ठराव प्रतिनिधींनी मांडलेलाच ठराव होतो. तेव्हा कार्यकारीणीच्या सदस्यांचा हा प्रतिनिधी ठरावच आहेय. कार्यकारीणी काय दगडांची आहे का? '

' कार्यकारिणीचा ठराव हा घटक संस्थेचा ठराव. तो ग्राह्य नाही' अनिलांचा हट्ट. डॉ. व. दी. कुलकर्णी चहा आलाय हे पाहून अनिलांजवळ समझोत्यास जातात. दोनदा चहा येतोय. मध्येच फोटो काढण्यावरून वाद होतो. माझा विरोध आहे असं अनिल म्हणतात. तोपर्यंत फोटो निघालेले असतात. तुमचं मत असेल तर असू द्या असं ते शेवटी म्हणताहेत.

घटनेबाबत वाद घातल्यास तीन दिवसही पुरायचे नाहीत. नंतर विचार करू! – डॉ. व. दी. कुलकर्णी.

निर्मलकुमार फडकुले, ग. वा. बेहरे, ' ठराव संमेलनात मांडायचाच. आताच निर्णय घ्या. तुम्ही नाही मांडला तरी ५० प्रतिनिधींच्या सहचा घेऊन आम्ही तो मांडणारच आहोत. '

डॉ. फडकुले– ' ठराव मूलत: संयत, सामाजिक न्यायाचे दृष्टीने महत्वाचा आहे, कुणाचीही बाजू त्यात नाही. फक्त संमेलनाने दखल घेण्याची गरज आहे. अध्यक्षांनी तो ठराव मांडावा. '

पन्नालाल सुराणा– ' महामंडळाचे बैठकीत तांत्रिक कारण नाकारून मतदान घेतलं. आताही मतदान घ्या. आशय पाहा. '

अनिल:– ' आशय पाहून चौहान आणि मसापचे दोन्ही ठराव चर्चेस ठेवले. मतदान फेटाळले. त्यावर चर्चा करायची का ? '

महावीर जोंधळे:– 'मराठवाड्याच्या वतीने कुरूंदकर बोलतील! '

अनिल:– 'मला काही अक्कल आहे की ! आता मराठवाड्याचे प्रतिनिधी कुरूंदकर बोलतील. '

प्राचार्य कुरुंदकर:– ' मराठवाड्याला बोलायची संधी दिली नाही हे सौजन्य नव्हे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या थरात या प्रश्नाबाबत मतभेद आहेत. खुल्या अधिवेशनात गोंधळ होऊ नये म्हणून पुणे मसापने ठराव मागे घ्यावा अशी मी विनंती करतो. '

' ठराव मांडायचाच असेल तर चर्चा करा पण पुढील गोष्टींचा

विचार करा. ' अनिल सुचवितात.

ठराव मांडण्याचा आग्रह होतो.त्यावर प्राचार्य कुरुंदकर म्हणताहेत,

" ठराव मांडू नये असं आमचं मत आहे. कोणताही ठराव मांडू नये. ठराव मांडायचं ठरलंच तर मराठवाड्यातील जनतेच्या भावनेचाही विचार करावा अशी दुरुस्ती करावी. "

एवढ्या वेळात गं. बा. सरदार अनिलांच्या आक्रस्ताळेपणास चिडून त्यांना ' हळू बोला ' असं एकदाच म्हणालेयत. कुरुंदकरांच्या सुचनेवर ते म्हणतात,

" मराठवाड्यातील जनतेचा म्हणजे सर्व जनतेचा, दलित व दलितेतर असा उल्लेख स्पष्ट हवा. "

' मराठवाड्याची जनता म्हणजे मी सर्व जनताच मानतो. त्यावर आण्णासाहेब सरदारांनी आक्षेप घ्यावा याचं मला दुःख वाटतं ' कुरुंदकर.

' कुरुंदकर, माझा आक्षेप नाही. मी मत मांडलं. ' गं. बा.

' सरदार व कुरूंदकरांनी एकत्र बसून नवीन ठराव तयार करावा व तो अध्यक्षांनी मांडावा ' आष्टीकरांची नवी सूचना.

' नवीन ठराव करू नये. मसाप ठरावात बदल करावा. लवकरात लवकर निर्णय घ्यावा हे नको. पब्लिक ओपीनीयन घ्यावे. ' त्यावर अनिल.

ग. वा. बेहरे– ' आपण आपलं काम बघा. ठरावात काय करायचं ते सरकार बघेल. '

' संमेलनात गोंधळ झाल्यावर काय ? अध्यक्षाचा बापही आला तरी लोक ऐकणार नाहीत. ' अनिल.

अनेकजण : ' बाप शब्द मागे घ्या. '

अनिल : ' मागे घेतला. '

ठराव अध्यक्षांनीच मांडावा असं ठरतंय. अनिल शेवटपर्यंत ठराव न येण्याचा प्रयत्न करताहेत. शेवटी मंजूर झालेला ठराव :

" मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या निमित्ताने महाराष्ट्रात गेली दोन वर्षे सामाजिक तणावाचे व दुराव्याचे जे एक अनिष्ट वातावरण निर्माण झाले आहे त्याची साहित्यिकांनी दखल घेणे निकडीचे

आहे. म्हणून सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला बाधा येऊ न देता आणि मराठवाड्यातील सर्व जनतेच्या भावनांचा आदर करून महाराष्ट्रात सामंजस्याचे निरोगी पर्व सुरू होण्याचे दृष्टीने महाराष्ट्र शासनाने नामांतरच्या प्रश्नावर लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची कार्यवाही करावी असे हे संमेलन शासनाला आवाहन करीत आहे. ''

ठराव बाहेर आल्यावर दुपारी दलित पँथर अध्यक्ष, प्रा. अरुण कांबळेंनी भोंगळ व अस्पष्ट ठरावामुळे दलित शाखा संमेलनावर व इतर कार्यक्रमांवर बहिष्काराचा निर्णय पत्रकार परिषदेत जाहीर केलाय. त्यामुळे उद्या काय होणार याची जोरात चर्चा चालूय. कांबळेंनी गं. बा. सरदारांनी घेतलेल्या स्पष्ट भूमिकेचं, दलित साहित्याच्या घेतल्या गेलेल्या दखलीचं स्वागत केलं. पण नामांतर ठरावामुळं बहिष्कार घालण्याचं नक्की केलं.

उद्या काय होणार या चर्चेतच रात्रीचं १० वाजता सुरू झालेलं कवी संमेलन नारायण सुर्वेच्या प्रभावी संचलनाने पहाटे ३ वाजेपर्यंत चाललं. त्या अभूतपूर्व कवीसंमेलनास उद्घाटन समारंभापेक्षाही तुडुंब गर्दी होत आहे. नारायण सुर्वे पूर्ण संमेलन व श्रोत्यांना पकडीत ठेवताहेत. श्रोतेही चांगलीच दाद देताहेत.

आप्पासाहेब उर्फ अनिलांपासून ते किशोर पाठकापर्यंत तीन पिढ्यांचे कवी हजर आहेत. भाऊ पंचभाई हा नागपूरचा तरुण दलित कवी गोड आवाजात अत्यंत प्रभावी काव्य म्हणतोय,

'' तू रोवलेले फुले बुद्ध येथे
कुणी तोडला मी जुळवीत होतो ''

प्रल्हाद चेंदवणकर हा मुंबईचा '' ऑडिट '' कवी '' तुमच्या पावलाखाली दडपलेले आमचे श्वास अजूनही धुमसत आहेत'' असं सांगत '' रस्ता आमच्या बापाचा '' ही दादपूर्ण कविता म्हणतोय.

५४ कवींचे हे कवीसंमेलन प्रा. यशवंत मनोहर, श्रीकृष्ण बेडेकर, दया पवार, ना. धों. महानोर, सुहासिनी इर्लेकर हेही गाजवितात. वसंत सावंत 'मी माणसाला शोधतो आहे' म्हणतात तर प्रा. यशवंत मनोहर, ' कालचा पाऊस आमच्या गावी आलाच नाही ' म्हणताहेत. प्राचार्य गजमल माळी, रा. ना. पवार, प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, ही अनिल,

केशव मेश्रामसहित चांगल्या कविता सादर करताहेत आणिशेवटी पहाटेच्या 'झुंझरका' वेळी नारायण सुर्वे ' मनीऑर्डर ' नि "पोर्टरची स्वगतिका" सादर करून त्या अभूतपूर्व कवीसंमेलनाचा समारोप करताहेत.

रविवार, ३ फेब्रुवारी

आज तिसरा दिवस. खुल्या अधिवेशनाची चर्चा. संमेलन उधळणार का ? याचा जोरदार वाद–प्रवाद ! सकाळी दलित शाखा संमेलन आणि नवोदित कविंचा महानोरांच्या अध्यक्षतेखाली मेळावा. काल अरूण कांबळेंनी संमेलनावर बहिष्कार घातल्यानं आज काय होणार अशी हुरहुर आहेच.

दलित शाखा संमेलन मुख्य मंडपात भरलंय. सकाळचे साडेनऊ झालेयत. बाबुराव बागूल अध्यक्ष. शाहीर आण्णाभाऊ साठेंचा फोटो स्टेजवर. प्रारंभी ' जग बदल घालूनी घाव सांगून गेले भीमराव ' हा आण्णांचा पोवाडा शाहीर धुळप म्हणताहेत. बागूल प्रास्ताविकात म्हणताहेत,

" दलित साहित्य स्थिती आणि गती ' हा आजचा विषय आहे. युगसमांतरता हे दलित साहित्याचे वैशिष्टच आहेच. माणूस हा विश्वात्मक असतो. भावना, अंग ह्या दलित नसतात. धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, परिवर्तनासाठी दलित नायक हा श्रमणारा, राबणारा, पिडीत, शोषित आहे. तो लढ्याचा एक भाग आहे. "

अर्जुन डांगळेंचं भाषण चालू असतानाच बाहेरून निरोप येतो. बाहेर पँथरचा मोर्चा आलाय. धावपळ होते. पत्रकार पळताहेत. स्टेजवरील गं. बा. सरदार छाया गोडबोलेंनी निरोप आणल्यावर बाहेर निघताहेत.

बाहेर मोठ्या संख्येने बघे जमलेयत. स्वयंसेवकांनी कडं केलंय. पोलिसांनीही कडं केलंय डी.एस.पी. कलेक्टर, पाच सहा पी. एस. आय. आहेत. १०० जणांचा मोर्चा. त्यात ५० बायका. तान्हुल्यासहीत आलेल्या. जोरदार घोषणा चालू आहेत. प्रा. अरुण कांबळे आहेतच. प्रा. कांबळे शांतता करताहेत आणि डॉ. अरुण लिमये, पुष्पा भावे, ग. वा. बेहरे, रंगा वैद्य, आलेयत समझोत्यासाठी. पण प्रा. कांबळे स्पष्ट सांगताहेत की, ' आमचा बहिष्कार आहे. भूमिका जाहीर केली. आत येणार

नाही वा संमेलन उधळणारही नाही. संमेलनाध्यक्षाला बोलावणारही नाही. लोकशाही पद्धतीने निषेधासाठी आम्ही मोर्चा आणलाय.'

प्रा. गं. बा. सरदार स्वतः होऊन येताहेत. प्रा. कांबळे त्यांचं स्वागत करून निवेदन वाचतात.

त्यावर प्रा. गं. बा. सरदार म्हणतात,

'मी तुमच्या भूमिकेचा वैयक्तिक व तत्वतः समर्थक आहेच. मी समारोपाच्या भाषणात त्याची दखल घेईन.'

घोषणा सुरू होताहेत. प्रा. कांबळेच घोषणा देताहेत. शाहू, फुले, आंबेडकरांचा विजय. तर फसवा, पुरोगामी, ढोंगी साहित्यिक, कवि अनिल, दलितांशी गद्दारी करणाऱ्या साहित्यिकांचा व संमेलनाचा धिक्कार होतोय. नंतर बापुराव जगताप, विलास वाघ वगैरे बोलताहेत. मोर्चाचा समारोप होतोय. प्रतिनिधी जेवायला निघताहेत. वातावरण तंग.

इकडे दुपारी ४ ला संमेलनाच्या गेटवर स्ट्रीट पोअेट्रीचा प्रयोग चालूच. ५।६ कवी. भाऊ पंचभाई, डॉ. रमेश जनबंधू, प्रल्हाद चेंदवणकर वगैरे गोळा होताहेत. आणि रोडवरच सुरू होतेय वेदनेची मांडणी, जमलेले लोक दाद देताहेत. आणखी लोक जमताहेत. नवे कवी येताहेत. आता तर बापुराव जगताप आणि यशवंत मनोहर आलेयत. एक सहजस्फूर्त, वाढता प्रतिसाद मिळतोय या नव्या प्रयोगाला.

पाच वाजलेयत. खुले अधिवेशन सुरू झालेय. सर्वजण जाग्यावर. दलित प्रतिनिधी व साहित्यिकांनी संमेलन शांतपणे पार पाडण्याचं आवाहन केलंय. पण सर्व थोडेच त्यांचं ऐकणार ? ढसाळ ग्रुपनीही संमेलनास पाठींबा दिलाय. पण काय होईल काय सांगावं. खुलं अधिवेशन. म्हणजे यापूर्वीचं काम गुप्त रीतीनं झालं असं नव्हे असं डॉ. आष्टीकर म्हणताहेत. न. म. जोशी ठराव मांडण्यास उभे राहिलेत. तेवढ्यात स्त्रियांमधून घोषणांना प्रारंभ. पन्नासेक महिला मधूनच उठल्यात. त्यांच्या घोषणा, आवाज वाढतोय. नामांतराचा आणि आंबेडकरांचा जय चालूच. पंधरा एक मिनिटं हा गोंधळ चालूच आहे. पन्नालाल सुराणा शांततेचं आवाहन करताहेत. शेवटी शांतता होत नाही हे पाहून स्त्री–पोलिस व स्त्री–स्वयंसेविकांना महिलांना बाहेर

काढण्याची सूचना देताहेत. एकीकडे ठरावचं वाचनही चालू. पोलिसांचं बायकांभोवती कडं. तीन–चार पी. एस. आय. बायकांना दटावताहेत. महिला पोलिस नाहीतच. स्वयंसेवकाचंही मोठं कडं उभंच, जबरीनं बाहेर काढू बघताहेत. कुठूनतरी एक महिला पोलिस येताना दिसते. अखेर त्यांना बाहेर काढलं जातंय. मंडपाबाहेर पोलिस व्हॅन्स उभ्या. जणू काही होतच नाही या थाटात संमेलनाचं काम चालू. बायकांना पोलिस गाडीत बसवताहेत. तेवढ्यात गेटकडून मुलांचाही एक जथा येतोय. त्यांनाही गाडीत घातलं जातंय, दोन गाड्या घोषणांच्या निनादात निघून जाताहेत. तिकडे गं. बा. सरदार समारोपही करताहेत. प्रतिसादही छान मिळतोय. पुन्हा काही तरूण प्रेस लॉबीकडून घोषणा करीत घुसतात. त्यांना पोलिस व स्वयंसेवक जोरजोराने रेटीत बाहेर नेतात.

संमेलन समारोप शांतपणे (?)पार पडलाय. संमेलन 'सुरळीत' पार पडलं म्हणून आभाराच्या टाळ्या जोरात होताहेत. जो तो जायला निघालाय. ५४ व्या वर्षी संमेलनाचा समारोप होतोय. तिसरा दिवस संपत आलाय आणि रात्री प्रेस कॉन्फरन्स घेऊन प्रा. अरुण कांबळे ह्या गोंधळाचा निषेध करतात आणि आम्ही सकाळी लोकशाही पद्धतीनं निषेध केला. बहिष्कार असल्यानं संमेलनास आलो नाही. झालेल्या गोंधळाचा निषेध करताहेत.

बार्शीकरात आणि इतरात चर्चा आहेच. बार्शीच्या रसिकवर नगराध्यक्षा प्रभाताई झाडबुकेंना, पहिल्या नागरिकाला, का सन्माननीय स्थान देण्यात आल नाही? पालिकेने २५,००० देणगी मेंबरांचा विरोध असतानाही मंजूर करूनही प्रभाताईंना राजकारणातीत भूमिकेतून का स्वागत, प्रास्ताविक, वा इतरत्र स्थान दिलं नाही? घडलं हे अयोग्यच होतं. रात्रीच्या गोंधळात नगरपरिषदेचे कर्मचारी होते असा काहींचा आरोप आहे. तो किती खोटा किती खरा कुणास ठाऊक? सुरळीत पार पडलेल्या संमेलनातली ही कडवट चव!

❖

दुःख पेलण्याएवढे...!

' दुःख पेलण्याएवढे
बळ नाही डोळा
कडू काळचा आवंढ्यानी
भरला गळा '

मराठवाड्याचे मातीपुत्र ना. धों. महानोर आपल्या विरहाकूल आसवांनी भरून आलेल्या आवाजात हृदयात वेदना ओतणारे शब्दजीव पेरीत होते. अंबडच्या मत्स्योदरी महाविद्यालयाचा कै. नरहर कुरुंदकर मंडप व मंडपाखालील दीड-दोन हजार डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. कविता पुरी करता करताच महानोरांचा गळा दाटून आला. शब्दापेक्षाही दुःख मोठं होतं. ओलं होतं. ही पंधराव्या मराठवाडा साहित्य संमेलनातील दुसऱ्या दिवशीची रात्री बारा-साडेबाराची वेळ. कवी रमेश दिक्षितांच्या भाषेत मराठवाड्यातील ' प्रल्हाद पोरके ' करणाऱ्या प्रज्ञाश्री प्राचार्य कुरुंदकर गुरुजींची आठवण संमेलनभर ग्रासून होती. कुठे कुणा तरी वक्त्याला. नवोदिताला, कवीला, कथाकाराला आठवण यायची अन् सारं वातावरण दुःखगर्भ व्हायचं. खरोखरीच

दु:ख पेलण्याएवढं बळ कुणाच्या 'डोळा' होतं ? गुरूजींच्या दु:खग्रहणानं हे संमेलन नि उपस्थित रसिक मंडळी वावरत होती. प्रत्येक संमेलनास हजर असणारे, तरुणांचा गोतावळा जमविणारे, खाजगी बैठका रंगवणारे, वक्तृत्वानं सभागृह जिंकणारे, नव्यांची पाठराखण करणारे, आपल्या ' जिवंत ' अस्तित्वानं संमेलन चैतन्यशील करणारे कुरुंदकर गुरुजी. हे सत्य कुणाच्या मनास पटतच नव्हतं. वाटायचं अजूनही गुरुजी येतील नि बोलतील संमेलनात चैतन्य पेरतील. पण चैतन्याऐवजी गुरुजींनी संमेलनात दु:ख पेरलं. . . असंच संमेलनात वातावरण . . . आसुभरल्या आठवांनी. . . आर्त वेदनेनं आकंठ दाटलेल्या स्वरांनी. . . भावनांनी भरलेलं !

।। परंपरेस पुनरुज्जीवन ।।

अंबड हे संमेलन गाव आज जालना जिल्ह्यातील तालुक्याचं गाव; श्रीमंत इतिहास परंपरा असणारं. समर्थ रामदासांचं जन्मगाव जांब याच तालुक्यातलं तर मायबोली मराठीची आद्य कवयित्री महदंबा ही देखील याच तालुक्यातील रागसगावची. ' आनंद ' व इतर हस्तलिखीतांची परंपरा १९३५ पासून पुढे चालवत चालवत आज बारा हजारांवर पुस्तकं असणारं हुतात्मा नाथरेकर वाचनालय असणारं हेच गाव. ' आग्रा ' घराण्याची गायकी परंपरा चालविणारं संगीताचं गोविंदराव जळगावकर या अवलियाचं घराणंही याच गावाचं भूषण !

संपन्न वारसा असूनही आज पाण्यासाठी या गाववासियांना वणवण फिरावं लागतं. टँकरचा आधार घ्यावा लागतो. इतिहासात ' पाण्याचा ' वाहता झरा पण वर्तमानात पाण्यासाठी तडफड. असं हे अंबड. हे अंबड संमेलन यशस्वी झालं ते संयोजक असणाऱ्या अखंड परिश्रम घेतलेल्या व्यक्ती डॉ. धुंडीराज कहाळेकर, प्रा. प्रल्हाद लुलेकर, प्राचार्य अशोक हजारे, डॉ. कुलकर्णी, प्रा. ठोसरू, शिवाजी दळणर, मंगेश वाघमारे यांच्यामुळेच !

मराठवाडा साहित्य संमेलनास निजामी राजवटी विरुद्धच्या लढ्याचा पूर्वेतिहास आहे. डॉ. नांदापूरकर, डॉ. र. म. भुसारी, प्रा. कहाळेकर महाराज, तात्यासाहेब कानोले, दे. ल. महाजन, न. शे. पोहनेरकर या जेष्ठांच्या मराठी मायबोलीवर नितांत प्रेमानं नि

निर्व्याज निष्ठेनंच मराठवाड्यातील मराठी भाषा व साहित्य आज जिवंत आहे. ज्यावेळी मराठीवर प्रेम करणं हा गुन्हा ठरे तेव्हा ते मराठी मायबोलीचं संरक्षण करण्यासाठी संघर्ष उभारण्यास धावले. हाच त्यांच्या कर्तृत्वाचा मोठेपणा ! पहिलं मराठवाडा साहित्य संमेलन दोन व तीन ऑक्टोंबर १९३७ साली हैद्राबादला झालं ! त्याचे अध्यक्ष होते बाबासाहेब खापर्डे. दुसरं संमेलन द. वा. पोतदारांच्या अध्यक्षते– खाली नांदेडला भरलं.

ही संमेलन परंपरा १९६८ नंतर मात्र खंडित झाली. त्यानंतर तेरा वर्षे म्हणजे गतवर्षीपर्यंत (वसमतनगर अध्यक्ष प्राचार्य भगवंतराव देशमुख.) मराठवाडा साहित्य संमेलन होऊ शकलं नाही. मसापच्या अकार्यक्षमतेचं ते लक्षण म्हणावं लागेल आणि म्हणूनच यावर्षी लगेच संमेलन होत असल्याचा आनंद व्यक्तविताना प्राचार्य देशमुख म्हणाले की, मला वर्षभरात अध्यक्षपदाची सूत्रं दुसऱ्या अध्यक्षाकडे सोपविण्याची संधी मिळाली हे चांगलं झालंच !

।। हे कोण अध्यक्ष ।।

या पंधराव्या संमेलनाचे अध्यक्ष होते संत वाङमयाचे व प्राचीन वाङमयाचे अभ्यासक हैद्राबादचे डॉ. श्रीधरराव कुलकर्णी. त्यांच नाव जाहीर झाल्यावर काही मराठीच्या प्राध्यापकांनीही विचारलं की, ' हे श्रीधरराव कोण? '

श्रीधररावांनीही ' दलित व ग्रामीण साहित्याची संमेलने घेऊन वेगळे फड उभारून साहित्याची परंपरा मिरासदारांच्या स्वाधीन करणार आहात का ? ' असा आपल्या सनातन विचारी भाषणातून सवाल करून आपला कालबाह्य वाङमयीन दृष्टिकोनच सिद्ध केला. याउलट उद्घाटक व निग्रो साहित्याचे अभ्यासक प्राचार्य जनार्दन वाघमारे यांनी, ' दलित साहित्य हे दलितांच्या आत्मभानाचा अविष्कार आहे. खेड्यातील सामाजिक स्थिती व सभोवतालचा निसर्ग या दोहोतील द्वंद्वात्मक संबंधातून व संवादातून ग्रामीण साहित्य निर्माण झालं आहे. उद्याच्या मराठी साहित्याच्या वृद्धी व समृद्धीमध्ये वंचित समाजघटकांचे अधिक योगदान राहणार आहे. ' असा आशय मांडणारे प्रभावी भाषण केलं. अध्यक्षांचं नि उद्घाटकांचं भाषण म्हणजे

' समांतर ' नि परस्परविरोधी मतं मांडणारी भाषणं म्हणायला हवीत. रटाळ झालेल्या उद्घाटन समारंभात पुष्पहार घालण्याच्या 'हाराहारीत' संमेलन संयोजक डॉ. कहाळेकरांचा अवमान केल्यामुळं ते पुष्पहार घालण्यास गेलेच नाहीत. समारंभानंतरचं पहिल्या दिवशीचं कंधारकर महाराजांचं कीर्तन झालं नाही.त्याऐवजी गझल गायक नाथराव नेरळकर यांचं गायन झालं.

संमेलनाचा दुसरा दिवस. सकाळचा कार्यक्रम महत्त्वपूर्ण संवादाचा. विषय : ' आत्मकथनपर दलित साहित्य ' अध्यक्ष : 'अस्मितादर्श'चे संपादक व दलित साहित्यातील प्रमुख विचारवंत प्रा. गंगाधर पानतावणे वक्त्यांमध्ये नामवंत. परिसंवादात लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ.प्रभाकर मांडे यांनी दलित आत्मकथनाकडे शास्त्रीय दृष्टीनं पाहण्याची गरज प्रतिपादीली व नव्या येऊ पाहणाऱ्या या साहित्यास पारंपरिक मानदंडाने जोखून चालणार नाही तर डोळस पाहणीसाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोन आवश्यक असल्याचं सांगितलं. प्राचार्य जनार्दन वाघमारेंनी स्वतःचा वेगळा रूप-घाट घेऊन येणारं हे दलित आत्मकथन मराठी साहित्यास नवं असून ते भितीवर टांगलेल्या चित्रासारखं नसून रस्त्यावर फडफडणाऱ्या पोस्टरप्रमाणं आहे असा विचार मांडला. गेवराईच्या प्रा. देवकर्ण मदन यांनी हे साहित्य माणूस या मूल्याच्या शोधाचं साहित्य आहे असं मत मांडलं तर प्रा. प्रकाश मेदककर यांनी दलित आत्मकथनाची समीक्षा करण्याची आवश्यक, पात्रता व दृष्टी आजच्या मराठी समीक्षेत नसल्याची टीका करून हे वाङमय म्हणजे सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेचा भाग असल्याचं सांगितलं.

।। दलितांचं गॅझेट ।।

' आठवणींचे पक्षी ' कार प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत प्रभावी भाषण करून सुशिक्षित समाजाला ज्ञात नसणाऱ्या उपेक्षितांच्या दैन्याचा, संस्काराचा व संस्कृतीचा उद्गार म्हणजेच दलित साहित्य असल्याचं प्रतिपादन केलं. गंगाधर पानतावणे यांचा अध्यक्षीय समारोप म्हणजे विचारप्रवर्तक व्याख्यानाचा वस्तुपाठच होता. ते म्हणाले की, " दलित आत्मकथनपर साहित्य हे दलितांचं ' गॅझेट ' आहे. दुभंगलेल्या इतिहासाची कथा आहे. वंचित भयग्रस्त

माणसाच्या मनातील धुमसणारी 'धुमसट' तीव्रतेनं व्यक्तविणारी, भाषेचा अनुभवाचा स्वतंत्रपणा असणारी व वाङमयीनच नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक चळवळ आहे." हा परिसंवाद अप्रतिम झाला. त्यानं श्रोत्यांना खिळवून ठेवलं.

दुपारचं सत्र कथाकथनाचं होतं. सुमारे चार तास चाललेलं हे कथाकथन शिवाजी देवढे, राम निकम, भास्कर कुलकर्णी, शिवाजी मुंढे, किशोर घोरपडे, प्रा. एकनाथ आबूज, बंकट पाटील, अर्जुन व्हटकर, मधुकर देशपांडे, शंकर परचुरे व अध्यक्ष डॉ. श्रीधरराव कुलकर्णी यांच्यापैकी काहींच्या कथांनी कधी रंगले तर काहींच्या मोठ्या कथांनी लांबले. . . राम निकम यांचं कथाकथन सर्वाधिक प्रभावी राहिलं.

रात्री कवीसंमेलन. तरुण कविंची मोठी उपस्थिती. बाहेर गावच्या प्रतिनिधी यांचाच प्रामुख्यानं समावेश. विशेष असं की यावेळी कविंची निवड केली नव्हती. सर्वांना मुक्त व्यासपीठ होतं. तरुणांचा प्रतिनिधी माधव उहाळे यांच्या पत्रकामुळं मोठ्यांचं वेगळं व नव्यांचं वेगळं अशी दोन कवीसंमेलनं न होता ते एकत्रितच झालं. नवोदितांनी या कल्पनेचं टाळ्या वाजवून कौतुक केलं. कवीसंमेलनाचं संचलन प्राचार्य गजमल माळी व कवी ना. धों. महानोर यांच्याकडे. कवीसंमेलनात राजेंद्र अत्रे (येरोळ ता. निलंगा जि. उस्मानाबाद), लक्ष्मीकांत हालकीकर (हालकी जि. उस्मानाबाद), गुडसूर ता. उदगीर जि. उस्मानाबादच्या माधव कदम या अतिग्रामीण भागातून आलेल्या कविंचा तसंच प्रा. फ. म. शहाजिंदे, प्रा. देवकर्ण मदन, विलास वैद्य, प्रा. शरद देशमुख, बसवराज कोरे, रमेश देवळे, गौतम सुर्यवंशी, माधव उहाळे, प्रकाश ताडले, नारायण बोरूळकर या नव्या दमाच्या कविंचा, राजा मुकुंद व श्री. दि. इनामदार यांच्यासारख्या जाणत्या व ज्येष्ठ कविंचा तसंच प्रतिभा देशपांडे, प्रा. शशीकला दहिवाला कवयित्रींचाही समावेश होता. कवीसंमेलन शेतकऱ्यांची कविता, महानोरांचा प्रभाव असणारी कविता, महानुभवाची कविता, बालबोध कविता, गेय कविता, या विविध काव्यप्रकारांचा (?) समावेश झाल्यानं 'मजा' आली. प्राचार्य माळींच्या मधल्या मधल्या कॉमेंटस्नी काही वेळा रंग भरला. कवी. ना. धों. महानोरांच्या श्रोत्यांवर परिणाम साधणाऱ्या

दु:खाच्या कवितेनंतर कविसंमेलन अचानक संपल्याचं जाहीर केलं गेलं! हे असं अचानक का थांबवलं हे कविसंमेलनाचे अध्यक्ष महानोरांनाही समजलं नाही.

।। बायकांत पुरुष ।।

शेवटचा दिवस. सकाळी महिला साहित्यिक परिसंवाद होता. मराठवाड्यातील या जागृत व साहित्याभ्यासक महिलांनी सुमारे साडेतीन तास हा परिसंवाद चालवून एकप्रकारे ' हम भी कुछ कम नही ' सिद्ध केलं. नांदेडच्या डॉ. ताराबाई परांजपे यांच्या अध्यक्षते–खाली या परिसंवादात डॉ. मंगला वैष्णव, सौ. सुनंदा केतकर, सौ. चंद्रज्योती मुळे,– भंडारी, ॲड. उषा घोटणकर, सौ. शांता जोशी, कु. शुभांगी सोडाणी, प्रा. मुमताज देशपांडे, प्रभावती देव, डॉ. कुमूद गोसावी व सौ. सुनेत्रा ओक, या मराठवाड्यातील स्त्री–लेखिका वक्त्या–साहित्य अभ्यासिकांनी खणखणीत भाषणं ठोकून मराठी साहित्यात स्त्रीचं यथायोग्य चित्रण नाही, आता स्त्रीयांनीच आपलं खरं जीवन मांडावं, लिहावं असं स्पष्ट मत व्यक्त केलं. परिसंवादात व्यासपीठावर मध्येच आलेले शिक्षण राज्यमंत्री ना. विलासराव देशमुख वगळता कोणीही पुरुष तेथे प्रवेशू शकला नाही. मंत्रीमहोदय संमेलनास रसिक म्हणून भेट देऊन गेले.

दुपारी पुन्हा कविसंमेलन भाग दोन झालं. यात भरपूर कविंनी भाग घेतला. त्यात भ. मा. परसवाळे, प्राचार्य गजमल माळी या प्रमुख व इतर नवकविंच्या कवितावाचनाचा कार्यक्रम झाला. याशिवाय दुसऱ्या दिवशीच्या कविसंमेलनानंतरही एक खाजगी कविसंमेलन झालं. तेही चांगलं रंगलं. त्यात संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीधर कुलकर्णी व मसापचे चिटणीस प्रा. तु. शं. कुलकर्णी यांनीही कविता म्हटल्या. ना. धों. महानोरांनी पळसखेड्याची लोकगीतं म्हटली. हे संमेलनही रंगलंच ! अशा रीतीनं या संमेलनात तीन कवीसंमेलनं झाली आणि कवीसंख्या सुमारे शंभर - - - - (चक्क सेंच्युरी हो !)

संमेलनाचा समारोप नेहमीच्या प्रथेप्रमाणं खुल्या अधिवेशनात झाला. त्यात कै. नरहर कुरुंदकरांच्या नावानं साहित्य व समाजशास्त्र या विषयाचं मराठवाडा विद्यापीठात अध्यासन निर्माण करावं आणि

मराठवाडा साहित्य परिषदेस अनुदान वाढवून मिळावं हे प्रमुख ठराव मंजूर झाले. रात्री स्थानिक संगीतज्ञ गोविंदराव जळगावकर यांचं गायन झालं तर त्यानंतर तरुण लेखक व दिग्दर्शक प्रा. मुरलीधर गोल्हार यांचं पारितोषिक विजेतं ' प्रश्नांकित ' हे नाटक सादर झालं. प्रा. सोमनाथ रोडे व डॉ. कहाळेकर यांच्या आभारानंतर हे संमेलन संपलं !

।। अघोषित बहिष्कार ।।

या संमेलनाचं वैशिष्ट्य काय ? तर बाहेरच्या प्रतिनिधीत बहुसंख्य तरुण कविंचा भरणा, अतीग्रामीण कवींनाही संधी, उत्कृष्ट परिसंवाद हे म्हणावं लागेल. मात्र संमेलनावर प्रख्यात ग्रामीण साहित्यिक प्रा. रा. रं. बोराडे, प्रा. भास्कर चंदनशीव, प्रा. फ. मु. शिंदे, प्रा. बापुराव जगताप, बाबा भांड, भालचंद्र नेमाडे, डॉ. एस. एस. भोसले, प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, आदिंचा ' अघोषित ' बहिष्कार होता असं वाटतं. अर्थात यातील काहीजण ' अपरिहार्य ' कारणामुळं येऊ शकले नाहीत हा भाग वेगळा ! शिवाय या संमेलनात दलित कवी व साहित्यिक यांचा सहभागही फारच कमी होता. मराठवाड्यात दलित व ग्रामीण साहित्याची समर्थ चळवळ असताना हे असं का व्हावं ? बाहेरचे प्रतिनिधीही संख्येनं फारच कमी होते. याचा विचार परिषदेनं करावा.

❖

इथे दुःखांना बांध नाही... !

नांदेड नगरीतील सकाळच्या अकराची वेळ. झुंझरूका होऊन बराच अवधी लोटलेला. बऱ्यापैकी बोचणारे ऊन, न कर्त्या वारी आयोजित केलेली न्या. रानडे वादस्पर्धा. एनएसबी चे छोटुकलं कँपस्. हॉल म्हणून वापर होणारा कॉलेजचा वर्ग. फोकटमे मज्जा मारायला आलेल्या नांदेड नगरीतील रंगीबेरंगी तरुणांची उदंड उत्साही (वाहून जाण्याइतपत) तरुणाई. त्यामुळं अर्थातच आधीचाच अपुरा वर्ग हाऊसफुल्ल झालेला. संयोजकांचे अपुरे संयोजन दर्शविणारा.

।। गौतमचं ऐकतो कोण ? ।।

आता ' तो ' माईकसमोर उभा. त्याचं नाव गौतम सोळंखे. अंबेजोगाईच्या रामानंद तीर्थचा ग्रामयुवक. पांढरी टोपी, लालसर शर्ट, पांटराच पायजमा अशा गावरान ड्रेसात. अशा अवताराच्या गौतमला पाहून ' पहिला बकरा ' चांगलाच मिळाला या आनंदात त्याचं ' पांडू हवालदार ' म्हणून कुस्वागत करणारा मुलांचा मॉब. गौतम घाबरलेला, बिथरलेला, भांबावलेला. व अशाच झुमदार गोंधळात त्याचं ' आजची भारतीय चित्रपटसृष्टीची वाढ अनिष्ट दिशेने होत आहे ' असं

असं अनुकूल असणारं भाषण संपलं. ' गांधीवाद श्रेष्ठ की टिळकवाद श्रेष्ठ ' असं म्हणणारा काळ कुठला व बॉबी श्रेष्ठ की शोले श्रेष्ठ असं म्हणणारा आजचा काळ कुठला? असं त्याचं म्हणणं फक्त परिक्षक आणि तोच ऐकतो.

।। भगतला दणदणीत टाळ्या ।।

आता पीपल्स् कॉलेज नांदेडचा भगत उभारतो. ' परतिष्ठीत परसंग ' असे खास गावरान उच्चार करत करत तो म्हणतो, ' आम्हाला श्रीकृष्णाचे अश्लिल नखरे पवित्र वाटतात पण सिनेमातलं थोडंही सोसत नाही. हे ढोंगच नाही काय? ' अर्थात भगतला पोरं दणदणीत टाळ्या देतात हे सांगणे नकोच.

चित्रपटसृष्टीच बंद झाली पाहिजे असं म्हणणाऱ्या भिमराव जाधव (मिलिंद आर्टस्, औरंगाबाद) याला या मॉबनं गारदच केलं असेल असं वाटतं ना? पण नाही. या गंभीरपणे भाऊक बोलणाऱ्या भीमरावनं चक्क या साऱ्या मॉबला तर गारद केलंच, वर आपलं वरील विक्रमी वाक्यसुद्धा सुनावलंन्!

औरंगाबादच्या शासकीयच्या संजिव उन्हाळेनं एक ' धमाल किस्सा ' सुनावून पोरांना खुलवलं. ' शिव्या कुणा देऊ नये ' ही दिवाकरांची कविता शिकवणारा गुरुजी, ती कविता वर्गातील पोराला म्हणता आली नाही म्हणून सरळ, ' भोसडीच्या, माय मेली काय? ' असं गालीप्रदान करून ' शिवी कुणा देऊ नये ' हे सुरेखरित्या समजावतोन् काय ? (अर्थात यामुळं चित्रपटसृष्टी विरूद्ध बोलणाऱ्या संजिवला कुणी शिवी देत नाही हं !)

।। स्पर्धा रंगली पानासारखी ।।

आणि येणाऱ्या प्रत्येक स्पर्धकांबरोबर स्पर्धेला रंगत येत जाते, पान रंगावं तशी. (आणि ही रंगत शेवटी ' बेरंग ' व्हावी इतकी वाढतेही) स्नेहलता काटेकर ही कृषिगृह परभणीची काकूबाई स्टाईल गृहिणी सर्वांना एकदमसे ' शू शू ' करेपर्यंत बोअर करते. तर माधुरी महाजन ही वसमत्तनगरची डॅशिंग पोरगी ' कुरूप मुलावर पण मी प्रेम करीन ' असं म्हणून कुरूप पोरांची प्रेमळ सहानुभूती मिळवते. नि ' बसंती नाचो ' हा आग्रह पण ! तर मानवतहून आलेली एन. एस.

खान ही मुस्लीम मुलगी येऊन न भीता विचार मांडून जाते. स्पर्धेत पहिले पारितोषिक जिंकलेला, विरोधकांवर आल्या आल्या हल्ला करून त्यांचे विचार म्हणजे 'चार आण्याची कोंबडी व बारा आण्याचा मसाला' असा कोंबडीसारखा खमंग विनोद करून पोरांना व बक्षिसालाही जिंकून जातो; तर त्याच्या स. भु. स ढाल मिळवण्यास साथीदार ठरलेला आपल्या विचारगर्भ, मोजक्या व सुटसुटीत मांडणीत दुसरे बक्षीसही घेऊन जातो. ही जोडगोळी म्हणजे शिवप्रसाद मंत्री व देवीदास तुळजापूरकर ! एकंदरीत विचार, विषयाची गहराई सांगणारे कमी होते हे नमूद करणे मात्र महत्त्वाचे वाटते !

।। दुसऱ्या दिवशीचा बेरंग ।।

याच स्पर्धेत दुसऱ्या दिवशी, आदल्या दिवशीच्या रंगलेल्या स्पर्धेचा बेरंग करतात श्रोतृवर्ग मंडळी ! खरं तर श्रोत्यांनी अक्षरशः ७० स्पर्धकांपैकी जवळजवळ ५० मुलांना बोलूच दिले नाही. 'अरे ओ सांबा,' ए बसंती, पांडू हवालदार, महाराजकी जय या हुकमी गोंधळी विचारांनी व उच्चारांनी स्पर्धकांना जंग जंग पछाडण्यात आले. (बिचाऱ्या स्पर्धकांनी ते सहनही केले !)

पण याचा अतिरेक झाला. बक्षीस समारंभाच्या वेळेस! प्रा. नरहर कुरुंदकरांसारख्या प्रख्यात नि समंजसपणे व्याख्यान देणाऱ्या व्यक्तीलाही श्रोतृवर्गाने न ऐकता गलिच्छ अशा कॉमेंटस्‌नी दुखवले. खुद्द कुरुंदकर गुरुजी (नांदेडकर प्रा. कुरुंदकरांना गुरुजी या गोड नावानंच पुकारतात !) नांदेडकर असतानाही तेथीलच मुलांनी हा घृणास्पद प्रकार करावा हे निषेधार्हच.

अर्थात सभातज्ञ कुरुंदकर गुरुजी समारोपाचे भाषण न करून या वर्गाला गार करतात व बक्षीस समारंभातील उत्साह, आनंद ओसरून भयाण गंभीर वातावरणात तो कार्यक्रम पार पडतो. कुरुंदकर सरांनी मारलेल्या या 'मौन धक्क्यामुळे' गोंधळबाज गार होतातच, वर क्षमा पण मागतात पण यामुळं गालबोट लागलं हे मात्र खरं !

।। कुरूंदकरांचा आम्हा अभिमान ।।

स्पर्धकांच्या इच्छेवरून कुरूंदकर सर नंतर थांबून स्पर्धकांसाठी आपले खास शैलीदार 'चितपटाख्यान' सांगून पुन्हा आनंद भरतात.

हा माणूस चित्रपटावर काय बोलणार ? असं वाटत होतं; पण त्यांनी चित्रपटावर दिलेले ते भाषण ऐकून त्यांच्या कलंदर कलावृत्तीची नि सव्यसाची अष्टपैलूत्वाची खात्रीच पटली. हा प्रचंड आवाक्याचा माणूस मराठवाड्यातील आहे याचा सार्थ अभिमान सर्वांना आहे तो उगीच नव्हे!

तर अशी ही यंदाची न्या. रानडे वाद स्पर्धा. प्रा. फ. मु. शिंदे आणि प्रा. बापुराव जगताप यांच्या संयोजनात झालेली व गाजलेली पण ! स्पर्धेच्या एक परिक्षिका सौ. प्रतिभा रसाळ (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा शहाणे वादपटू) यांनी सांगितलेल्या शेराप्रमाणं झालेली !

" हम मिले भी मगर ऐसे; हाय !
जैसे सुखे खेतमें बादल;
बिन बरसे चले जाए ! ! "

० ० ०

इकडे औरंगाबादी विद्यापीठात मात्र एक वेगळेच संगीत नाट्य घडले. अर्थात ही भानगड निवडणुकीचीच असणार हे सांगणे नकोच. मराठवाडा विद्यापीठात एकूण ६३ सी. आर. असल्याने विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ निवडणूक ही प्रेस्टीजची होती नि दरवर्षी असतेच आणि ती गरमाईच्या हवेत पार पण पडते पण यंदा मराठवाडा विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू श्री. शंकररावजी खरात यांनी दाखविलेल्या आपल्या कार्यक्षम निर्णयशक्तीनं निवडणुकीच पुढं ढकलण्याचं पुण्यकर्म केलं. २३ सप्टेंबरला साडेबारापर्यंत अर्ज द्यावेत अशी नोटीस होती. त्यावेळपर्यंत विद्यार्थीवर्गाचा एक गट (ज्यांच्यात पदासाठी वाद चालतो तो !) आपले फॉर्म भरू शकला नाही. त्यामुळे ह्या गटानं (हा गट कोणता हे सुज्ञास सांगणे नलगे) वेळ वाढवून घेतली. माननीय कुलगुरुंकडून एक पर्यंत. तरीही ते अर्ज वेळेत भरू शकले नाहीतच म्हणे. त्यामुळं लोकशाहीविरोधी समजल्या जाणाऱ्या दुसऱ्या गटानं ' लोकशाही मार्गाने निर्णय द्या ' अशी मागणी शंकरावांकडे केली. तर पहिला प्रेशरफूल गट म्हणाला की, अर्ज स्वीकारणाऱ्यांनी आपली घड्याळं मुद्दाम पुढं करून ठेवली होती.

आणि या दोन गटाच्या गोंधळात कुलगुरु खरातसाहेब हे आपला निर्णय निर्वाचन अधिकाऱ्यांचे जाबजबाब घेऊनही रात्री १० पर्यंत देऊ

शकले नाहीत. इकडं दोन्ही गटांची मुलं अस्वस्थ होती. पोलीसही आले.

।। हा का कार्यक्षमतेचा आदर्श ।।

साधा व्हॅलीड/अनव्हॅलीडचा निर्णय द्यायला कुलगुरु इतका विलंब लाऊ लागले तर विद्यापीठातील इतर अधिकारी त्यांचा कोणता 'सपाटून कामाचा' आदर्श ठेवतील हा प्रश्न आहे. शेवटी कुलगुरुंनी पहाटे चारला आपला निकाल देऊन वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रतिनिधींची निवड अवैध मार्गाने झाल्याने संपूर्ण निवडणूकच पुढे ढकलण्यात येणार असल्याचं जाहीर केलं !

विद्यार्थ्यांमध्ये निवडणुकीची चुरस राहणार, गटबाजी राहणार हे उघडच आहे. पण त्यांना त्वरित निर्णय न देऊन पुन्हा एकदा गोंधळ बोलविल्यासारखेच झाले नाही काय ?

।। मेडिकलची सुरम्य संध्याकाळ ।।

विद्यापीठातील या नाट्याकडं चक्क कानाडोळा करून मेडिकलच्या मुलांनी मात्र 'सुरम्य संध्याकाळ' साजरी केली. या मेडिकलच्या मुलांनी विद्यार्थी संसदेच्या उद्घाटनाच्या निमित्ताने 'डालिंग डालिंग' हे धमालबाज नाटक बसवून संसदेच्या उद्घाटन आनंदात सर्वांना सामावून घेतले आणि मेडिकलच्या मुलांची टच्च रसिकता सांगायला नकोच. जुन्या विद्यार्थी संसद 'प्रेसिडेंट पेशंटला' डिसचार्ज देऊन नवीन प्रेसिडेंटनं पेशंट बनून एक वर्ष डिसचार्जची वाट पाहायची हा प्रकारही भलताच मजेशीर! यंदा कु. विजया रमणनं गतवर्षीच्या अरुण दायघर या पेशंटला डिसचार्ज दिला.

महिला महाविद्यालयानं सौ. ज्योत्स्ना देवधरांना पकडून संसदेचं उद्घाटन तर केलंच वर त्यांच्याकडून कथाकथन ऐकण्याचा 'चान्स' मारून आपली चिकाटी दाखविलीन् काय! तर मिलिंद कलामध्ये 'धम्मचक्र अनुवर्तन' दिनानिमित्त 'गौतमाचा गृहत्याग' या विषयांवर मुलं गंभीरपणे गंभीर व्याख्यानं ऐकताना आढळली.

।। रक्तदानवाल्यांचा क्लब ।।

मराठवाड्यात औरंगाबादच्या स. भु. लाच फक्त रक्तदान युनिट आहे व ते आदर्श कार्य करीत आहे. इकडे नांदेडमधील दिपनाथ पत्की, श्यामल कुरुंदकर, शोभा, शिवाजी शिराढोणकर, रंजना रेड्डी,

उमा पप्पू, किशन कोटगिरे, अरुण देव, सन्मुख गोडमपल्ले आदि महाविद्यालयीन तरुण मंडळींनी आपला वेगळा 'ब्लड डोनर्स क्लब' स्थापन केला असून, 'व्हालंटियरी डोनेशन' सिस्टीम या पोरांनी ॲडॉप्ट केलीय. अल्पावधीतच अधिकाधिक रक्त मिळविण्यासाठी ठेवलेली लायन्स क्लब, औरंगाबादची ढाल पण या नांदेडच्या मुलांनीच मिळवलीय. नांदेडला ब्लडसाठा करण्याची सोय नसल्याची खंत दिपनाथनं बोलून दाखवली. तर हीच नांदेड कंपनी बाबा आमटेंसाठी 'आनंदवन मंडळ' चालवत असून, औषधी गोळा करून आनंदवनला पाठविण्याचा उपक्रम पण 'जोरोमे' है! तर औरंगाबादचेच प्रा. ढोबळे, प्रा. कोरान्ने, प्राचार्य रत्नाळीकर, अनिल महाजन, मानवेंद्र काचोळे ही मंडळी औरंगाबादी औषध गोळा करण्याच्या कामी लागली आहेत. बाबांची मराठवाड्यातील तरुणांवर केवढी पकड आहे नाही ?

उस्मानाबादला चक्क नवीन आलेल्या प्राचार्या सौ. विजया पाटील यांनी एक कवीसंमेलन आयोजिले नि त्याला सोलापूरचे प्रख्यात कवी डॉ. वि. म. कुलकर्णी यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविले. दस्तुरेखुद्द सौ. विजया पाटील यांनीही काव्यवाचनात स्वतःची द्रौपदी कविता वाचून रंग भरला; तर प्राचार्यासमवेत काव्यवाचनाचा आनंद प्रथम उपभोगिल्याचे डॉ. वि. म. नी मान्य केले.

।। आगळे, वेगळे प्राचार्य ।।

औरंगाबादच्या वसंतराव नाईक महाविद्यालयाचे नाव ऐकून होतो. या कॉलेजात 'वेगळेपण' आहे. वसतीगृहातील पोरांसाठी, ग्रामयुवकांसाठी हे महाविद्यालय श्रमसंस्कार केंद्र चालवतं. प्राचार्य राजाराम राठोड यांनी सकाळी यायला सांगितलं आणि जाऊन पाहिल्यावर मात्र आपल्या महाविद्यालयाला श्रमसंस्काराची प्रयोगशाळा बनविणाऱ्या, पोरांना श्रमाबरोबरच आंबेडकर, बाबा आमटे, साने गुरुजी, भाऊराव पाटील यांची विचारदीक्षा देणाऱ्या या प्रयोगशील, प्रेमळ प्राचार्यांबद्दल आदर दाटून आला.

दररोज सकाळी या कॉलेजची मुलं सहाला उठून चक्क बागेला पाणी देणे, इमारतीचा पाया खोदणे, ग्राऊंड तयार करणे, विहीर खोदणे अशी श्रमाची कामे तीन तास वर्षभर करतात.

।। कारखान्यात काम ।।

महाविद्यालयाची अधिक माहिती देताना एक उत्साही तरुण प्राध्यापक मित्र प्रा. बापुराव जगताप म्हणतात की, ' आमची तीस चाळीस मुलं औरंगाबादच्या औद्योगिक वसाहतीतील'' श्री" इंडस्ट्रीज-मध्ये जातात. तिथं तीन तास काम करतात. तो कारखाना ह्या मुलांना पैसे देतो. विशेष म्हणजे प्राचार्य राठोड सरांच्या प्रयत्नांमुळे हा कारखाना दोन वर्षाच्या कामानंतर तिसऱ्या वर्षी त्या मुलांना काम न करताच ९० रु. स्टायपेंड देणार असं ठरलंय.

नाईक कॉलेजचं वसतीगृह दोनशे मुलांचं आहे पण तुम्हा आम्हाला माहीत असणारे 'पॉश' वसतीगृह नव्हे ! याबद्दल या मुलांना एक पैसाही द्यावा लागत नाही. (किंबहुना त्यांच्याजवळ तो नसतोच) ते तीन तास काम करतात. श्रमावर श्रद्धा ठेऊन मोठ्या अभ्यासिकेत जाऊन अभ्यास करतात. कधी कधी हवेशीर झाडाखाली पण एकत्र जेवतात, आनंदात राहतात. एखाद्या गुरुकुलागत राहिल्यागत !

अर्थात ग्रामीण भागातून आलेल्या या मुलांची भाषा नि सामान्य ज्ञान म्हणजे कमालच ! प्राचार्य राठोडांना मुख्यमंत्री म्हणणारं नि कृष्णा नदीला मराठवाड्यात आणणारं ! म्हणून या महाविद्यालयान या मुलांचे भाषा सुधारणा वर्ग घ्यायला सुरुवात केली असून त्यांना सामान्य ज्ञानाची गंगाजळी पण दिली जाते. या भाषा वर्गाची जबाबदारी प्रा. सुरेश पुरी, प्रा. व्यंकटेश पवार, प्रा. बापूराव जगताप ही उत्साही प्राध्यापक मंडळी पार पाडतात.

मराठवाड्यात तालुका पातळीवर असणाऱ्या कॉलेजातील मुलांची काही खास वैशिष्ट्ये असतात.जी तुमच्या आमच्या सारख्यांना हृदय हेलावणारी, चक्रावून सोडणारी वाटतात. वाड्यावाड्यातून, खेड्याखेड्यातून येणारी ही पहिलीच पिढी असते, उच्चशिक्षणाचा उंबरठा ओलांडायला मिळालेली ! वर्षानुवर्ष अज्ञानाच्या नि त्यामुळे अंधश्रद्धा, धर्मांधता, अमानवता यांच्या अखंड, अगतिक गर्तेत गोवल्या गेलेल्या ग्रामीण गोरगरीबांना ज्ञानदीप दाखवणारी पिढी. अशा झगडाळू मुलांची ओळख करून घ्यायचं ठरवलं नि सरळ अहमदपूर कॉलेजच्या नवीन सुरू झालेल्या वसतीगृहात शिरलो; संचालक डॉ. यादवराव

गायकवाड यांना घेऊन! सोबत प्रा.कागणे नि प्रा.पानपट्टे होतेच.मुलांचं जेवण चाललं होतं. खीर होती. सगळी जणं सणाला घरी जाऊ शकत नव्हती. ती म्हणाली, 'आम्हाला कुठला सण नि कुठलं काय? घरी एक वेळची भ्रांत !' डॉ.गायकवाड म्हणाले,'संचालक मंडळाच्या प्रेरणेनं व आमदार किसनराव देशमुख, भगवानराव नागरगोजे, प्राचार्य बाबुराव उगिले यांच्या प्रयत्नाने वसतिगृह यंदाच सुरू झाले. १२५ मुलं आहेत. ४० मुलं दलित आहेत. अनेक मोफत. १० मुलं एम. ए. ची; यंदाचं एम. ए. सुरू झाल्यानं आलेली ! कंधार, निलंगा, गंगाखेड, मुखेड, लोहा या दूरदूरच्या गावांहून स्वस्तात वसतिगृहाची अहमदपूर कॉलेजला सोय झाल्याचं ऐकून फक्त कपडचांनिशी आलेली ही मुलं! कॉलेज महिना अडिच हजार रूपये खर्च करतं या मुलांसाठी ! ! डॉ. गायकवाडांना मी काहींच्या मुलाखती घ्यायच्या म्हणतो. नि एक एक भांबावलेला, कोऱ्या करकरीत चेहऱ्याचा, चेहऱ्यावर दुःखाच्या छटा दिसणारा पुढं येतो नि त्याच्या दारिद्र्याच्या दर्दभऱ्या दुःखानं विषण्ण व्हायला होतं. . .

चव्हाण बाबू हा बी. ए. चा मुलगा. वासुदेव हा डी. एन. टी. जमातीतील मुलगा. याचं गाव अहमदपूर तालुक्यातील विळेगाव. याला शेती अजिबात नाही. स्वतःचे म्हणावे तसे घर नाही. आई वडील शेतमजूर. एकूलता एक मुलगा. वसतिगृह नव्हतं तेव्हा गावात राहायचा, तारांबळ व्हायची. आता तो आपल्या शिष्यवृत्तीतून घरी महिना ४० रुपये पाठवतोय. आईवडिलांच्या संसारासाठी !

।। जिद्दी विद्यार्थी ।।

हा अच्युत शिंदे. अहमदपूर तालुक्यातील कोपरगावचा. आई-वडील म्हातारी. अगदी थकलेली. त्यांचा भार याच्यावरच. वसतिगृह नव्हते तेव्हा याला घरी ३५ रु. पाठवावे लागत. मग राहिलेल्या पैशात त्याला जेवण मिळणं कठीण व्हायचं. आता वसतिगृहामुळं ३५ रु. त जेवण राहणं होतं. राहिलेले सर्व पैसे हा घरी पाठवतो. चहा नाही, सिनेमा नाही, व्यसन नाही. तसंच लायब्ररीमध्ये पुस्तक वाटायचं पण काम करतो नि २५ रु. पण घरी पाठवतो. लहान भावंड गुराखी आहेत म्हणाला. त्यानं त्याचा एक किस्सा सांगीतला. त्याच्या वडिलांना भूमीहीन म्हणून जमीन मिळाली दोन एकर सहा गंठे ! पण प्रत्यक्ष

ताबा देताना सरपंचाने व तलाठ्याने मला मोठा रस्ता जाणारी जमीन दिली. म्हणजे त्याला एक एकर पण प्रत्यक्ष मिळाली नाही. याच्या गावात ' एक गाव एक पाणवठा ' नाही. दलितांसाठी वेगळा पाणवठा आहे. एस. वाय. ला असणारा अच्युत शिंदे पुढे समाजासाठी झगडणारा युवक बनायचं म्हणतोय !

रंगनाथ शिरसाट हा बारावीचा मुलगा. मंजरवाडी या नांदेड जिल्ह्यातील गावचा. जेवण व राहण्यासाठी १० रु. देतो. या १० रु. साठी संचालक डॉ. गायकवाडांकडे तो पाणी भरतो. कपडेपण गायकवाडांनीच दिलेत. शेती नाही. आई–वडील थकलेले. मोठा भाऊ मजूरी करणारा. घर नाही.चहा, व्यसन काही नाही. सिनेमा पण नाही. वसतिगृहामुळंच शिक्षण घेऊ म्हणतोय. मिळेल तेवढे, जमेल तेवढे शिक्षण घ्यायची दांडगी जिद्द!

माधव भोईवार हा एम. ए. अर्थशास्त्राचा विद्यार्थी. हा दूरच्या निलंगा तालुक्यातील बुजरूगवाडीचा. पूर्वी बी. ए. ला औरादच्या आर्य यांच्या कॉलेजात वर्षाला ७५ किलो हायब्रीड देऊन राहिलेला. नांदेडला सोय नव्हती. पण अहमदपूरला एम. ए. निघाल्यानं व १५ रु. त सोय झाल्यानं आलेला. याचा भाऊ गुराखी आहे. आई वडील थकलेले, जमीन पडिक. एम. ए. नंतर नोकरीचा प्रयत्न आणि ती न मिळाल्यास याची चक्क रोजगार हमीवर घाम गाळण्याची पण तयारी आहे.

बाबू काळवात हा ज्युनियरचा. अहमदपूर तालुक्यातील. गतवर्षी अधिक हालाखिनं व वसतिगृह नसल्यानं एक महिनाच अहमदपूरात राहिला. त्यानंतर घरीच. परिक्षेलाच आला. शेती नाही घर नाही. आई–वडील मजूर. मोफतमध्ये वसतिगृहात राहतो. यंदा वसतिगृह नसतं तर शिक्षण सोडायला लागणार होतं. यानं खड्डे खणून मिळविलेल्या पैशात मजा करायची सोडून वह्या पुस्तकं घेतलीन.

तर ज्ञानोबा संदाडे हा नांदेड जिल्ह्यातील लोह्यावरून आलेला ज्युनियरचा मुलगा. यलम समाजाचा, सायन्सला आहे. वडिल पार थकलेले. शेती नाहीच. भाऊ शेतमजूर पण त्याचं त्यालाच भागवता येत नाही. ह्याला मदत कशी करणार ?

मुस्लीम समाजातील हा बी. ए. चा रशिद पठाण, महिना १५

रु. देतोय. प्रा. कलमेंकडे पाणी भरून. घरी जमीन नाही. घर नाही. आई–वडील म्हातारे. धाकटा भाऊ सालदारीवर नोकर. रोजगार हमीवर काम केलंय्. देवावर विश्वास नाही. गोषा पद्धतीला विरोध, समाज सुधारण्याची इच्छा. शिक्षणामुळं नवी दृष्टी मिळाल्याचं मान्य करतो !

तर अशी ही वसतिगृहातील मुलं अशी त्यांची शिक्षणाची जिद्द, असं हे त्यांचं दर्दभरं दारिद्र्य ! तिथून निघताना मला ओळी आठवतात,

" इथे दुःखांना बांध नाही
नि सुखाचा शोध नाही ! "

❖

ग्रामीण युवकांच्या मनाची कवाडं ठोठावली तेव्हा...

तालुका पातळीवरील असणाऱ्या कॉलेजातील मुलांचे सर्वेकष विश्वच वेगळं असतं, तुम्ही आम्ही जाणून कल्पून असणाऱ्या कॉलेज-विश्वाहून ! हा विद्यार्थी त्यांच्या घराण्यातील पहिला शिकणारा असतोय, गावातीलही पहिलाच असतोय. वाड्यावाड्यांतील खेड्या-खेड्यातील कॉलेजांचे उंबरठे ओलांडणारी ही पहिली–वहिली पिढी असतेय, पिढ्यान्‌पिढ्यानच्या अखंड अगतिक अज्ञान गर्तेत गोवल्या गेलेल्या गोरगरिबांच्या कच्च्यांबच्च्यांची ! म्हणूनच ह्या पिढीचं शिक्षणानं सुसंस्कारित, सुज्ञ नि सकस झालेलं मत अजमवायचं ठरवलं. अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बाबुराव अुगिले यांनी सहकार्याचा हात दिला तर उत्साही कामसू प्राध्यापक श्री. दिनकर कुलकर्णींनी प्रत्यक्ष परिश्रम घेतले हा सर्वेक्षण रिपोर्ट तयार करण्यासाठी !

आम्ही अेकूण अठ्ठावीस प्रश्नं असणारी अेक 'विद्यार्थी प्रश्नोत्तरी तयार केली. विद्यार्थी व युवामनांच्या अनेक अंतरंगांचा ठावठिकाणा घेणारे ते प्रश्न होते. त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय

जीवनाच्या अंगांशी ' ओळख ' करून घेणारे ते ' सवाल ' होते. त्यात आम्ही नाव टाकण्यास बंदीच घातल्यानं ग्रामीण विद्यार्थ्यांची लाजणारी, बुजणारी मनाची कवाडं खुलून त्यांची मन:कंपनं दिसलीत, त्याचं वास्तव व्यक्तिमत्व चितारलं गेलंय ! सुमारे दोनशे विद्यार्थी मित्रांनी ही प्रश्नोत्तरी भरलीय, त्यात तेरा मुलींचाही समावेश होता बरं ! चार दोन चावट पोरांची चिल्लर उत्तरं सोडता बहुतेकांनी ही आगळीवेगळी परीक्षा गंभीरपणेच दिलीय हं !

तर आता उत्तरांकडे वळू यात.

शिक्षणपद्धती– अेक शिक्षा

आजची शिक्षणपद्धती योग्य आहे का ? या प्रश्नाचं उत्तर मिश्र स्वरूपात मिळालं. अर्थात बहुमत अपेक्षेप्रमाणेच 'आजची शिक्षणपद्धती एक शिक्षा' हे सांगणारं होतं. पंच्याअैंशी विद्यार्थ्यांनी या थोर शिक्षण-पद्धतीवर तोंडसुख (पेनसुख) घेतलेय तर पंच्चावन्नांनी आपला 'पुळका' दाखवलाय. मुली मात्र मोठ्या प्रमाणावर आजच्या शिक्षणप्रणालीवर 'दिलखुश' आहेयत असं दिसलं कारण १३ पैकी बाराजणींनी शिक्षण-पद्धतीचे ' गोडवे गायलेत ! ' (अर्थात हा अजाणता, अवाचन नि अज्ञानाचाच परिणाम बरं !)

पुढं पुढारी होणार !

आपण पुढे कोण होणाराहात ? याला उत्तरताना एक लिहितोय, ' मी पुढं कोण होणार हे भ्रष्टाचार, वशिलेबाजी यांनाच माहीत. (असं विनोदी पण मार्मिक लिहावं जरा !) याबरोबर कुटुंबियांच्या तुमच्याबद्दल अपेक्षा काय ? असाही सवाल टाकला होता. उत्तरं अनेकांगी मिळालीत. अर्थात खालच्या थरात राहणाऱ्या नि दारिद्र्याची झळ सोसणाऱ्या या 'ग्रामयुवकांना' आर्थिक सुखवस्तुपणाचे मध्यमवर्गीय स्वप्न पडावं हे साहजिकच. त्यात डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, व्यापार कलेक्टरांदी 'पैसेवाल्या' नोकरी वा व्यवसायाचे अनाहूत आकर्षण दिसलेय. दहा टक्के मुलांनी चक्क ' समाजसेवक ' होणाराय असं लिहिलंय. हे मात्र खरोखरीचं कौतुकास्पद म्हणावं लागेल नि त्यासाठी ही पुढारी मंडळी आईवडिलांचा विरोध सोसण्यासही 'तय्यार' आहेत. (अेवढं सोप्पं नाही ते बाळानो!) मुलींनी गृहिणी होणार (व्हा, व्हा !

दुसरं काय होणार म्हणा !) हे पारंपरिक उत्तर दिलंय आणि आईबाबांच्या अपेक्षा ' पैशाभोवतीच ' आहेत हे सर्वांनीच लिहिलंय !

किती बेकार ही बेकारी!

बेकारीबद्दल काय वाटते ? या प्रश्नाचं उत्तर काय मिळणार हे पूर्वजाणिवेने आम्ही जाणून होतोच ! हळहळ वाटते, कळकळ वाटते, दु:ख वाटतं, खेद वाटतो, वाईट वाटतं, चीड येते नि बंड करावं वाटतं,

या सर्वांगी शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त झाल्याहेत. सर्व तरुण 'घटस्फोट' द्यायला तयार असताना आपल्या 'घरोब्याशी' चिटकून बसणारी ही बेकारी ! एकानं बेकारीबद्दल मजा वाटतेय असं लिहिलंय (हा जीव टुणटुणशी पण सुखाचा संसार करील मग !) बेकारी ही शिक्षणामुळे वाढतेय हा एक 'गैरसमज' दृढ व्हायला लागलाय. पण शिक्षण हे व्यक्ती विकासाचं साधन असून बेकारी हे 'आर्थिक संकट' आहेय हे समजलं पाहिजे. शिक्षणाशिवाय ही बेकारी कशी बेकार आहे हे कसं समजणार, अं ?

ग्रामीण भाग सुधारला !

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भाग सुधारला का ? या प्रश्नाचं उत्तर बहुतेकांनी 'थोडाबहुत सुधारला' असं दिलंय. तरीही ५३ टक्के विद्यार्थी मित्रांनी ग्रामीण भाग सुधारला नाहीय असंच मत मांडलय. मुलींनी मात्र ९९ टक्के ग्रामीण भाग सुधारला नसल्याचं ठामपणे सांगितलंय! अर्थात ग्रामीण भागात स्त्री-स्वातंत्र्य किती कोते आहेय याचेच मुलींचे उत्तर द्योतक आहेय. मुलींना अजूनही 'बला' समजल जातंय!

देवबाप्पाची चलती !

देव मानता का? देवपूजा करता का? या प्रश्नाला मात्र फार मोठ्या प्रमाणावर 'होकार' मिळालाय. मुलींकडूनही व मुलांकडूनही! ८० टक्के मुलं ही 'संत तुकाराम' निघाले तर ९० टक्के मुली ह्या 'संत मीराबाई' निघाल्या. एकंदरीत देवबाप्पाची चलती आहेन् काय? (जय संतोषी माँ!)

न जाणारी जातबाजी !

आपण धर्मभेद, जातिभेद मानता का ? या प्रश्नाचं उत्तर थोडं गंभीरपणे विचार करायला लावणारं मिळालंय. कारण सुमारे ४० टक्के विद्यार्थी मित्र–मैत्रिणींनी आम्ही धर्मभेद, जातिभेद मानतो हे मुक्तकंठाने कबुल केलेय. तर अेकदोन प्रामाणिक पोरांनी 'वरून दाखवत नाही पण आतून पाळतो' असं लिहिलंय. तर एका हिंदुत्ववादीनं मुस्लिमांना वेगळा कायदा करून सरकार धर्मभेद पाळतं तर आम्ही का पाळू नये असा उलट सवाल टाकलाय. ग्रामीण भागातून

शिक्षणानं संस्कारित झालेल्या या पिढीतही जातीयवादी जळमटं जिवंत आहेत हे खेदाने नमूद करावे वाटतेय.

पिताजींची परवानगी हवी !

प्रेमविवाह आंतरजातीय विवाहासाठी घरातील मंडळींचा विरोध पत्करील काय ? या बंडखोरी वृत्तीदर्शक प्रश्नाच्या उतरात केवळ ३० टक्के मुलांनी आईबापांविरूद्ध बंडखोरी करण्याची मानसिक तयारी दाखवलीय. ७० टक्के मुलं अजूनही ' पिताजीको पूछेबिगर मैं कैसे कर सकता ? ' या कॅटॅगिरीतले आढळले. ९० टक्के मुलीतर याबाबतीत वडिलांच्या आज्ञेबाहेर नाहीतच. एकीनं तर लिहिलंय, ' मला तसलं काही करायला आवडत नाही ! ' तर दुसरीनं लिहिलंय, ' मी जीवनात कुणावर प्रेम करण्याच्या भानगडीतच पडणार नाही. (अहो, तुम्ही खूप म्हणाल, पण वेळकाळ काय तुमच्या हातात आहेय?)

राजकारणाच्या सीमेवरील वारकरी !

राजकारणात विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा काय ? या सवालाला अनपेक्षित पराभव स्वीकारावा लागला ! कारण ५० टक्के मुलांनी राजकारणात भाग घेऊ नये असा विचार मांडलाय. एकानं तर 'फक्त पाहत राहावं' असा साजुक सल्ला पण दिलाय. मुलींनी मात्र राजकारणाला ' शिवताशिवत ' पण नको म्हटलंय. एकंदरीत ही मुलं राजकारणाच्या सीमेवरील वारकरी आहेयत म्हणायचे !

हुंडाविरोधी मंडळी

आपण हुंडा घेणार का ? आणि फॅशन आवडते का ? या प्रश्नाच्या उत्तरात ६० टक्के विद्यार्थी हुंडाविरोधी विचाराचे आहेयत तरी चाळीस टक्के गडी हुंड्याचे ' पाळतीवर ' आहेतच (बेटो, 'आत' जायचं का ?) तर एकानं सरळ म्हणलंय, 'माझ्या बहिणीला घेतला नाही तर मी पण घेणार नाही ! ' तर दुसरा म्हणतोय, ' मी घेणार नाही पण वडिलांचेसाठी घ्यावा लागेल ! ' मुलींनी मात्र १०० टक्के विरोध दर्शवून हुंडा घेणाऱ्यांशी लग्नच करणार नाही असा दमपण दिलाय. (कुमारिका रहावं लागेल अं !) आणि सर्वांनी एकमुखानं फॅशनचा पुकारा केलाय.

" रॅंगिंग क्या चीज है ? "

' आम्हाला व्यसन नाही हो ! ' असं ९० टक्के मुलांनी मत मांडलंय. पण मुलांतील एकदोन ' कंट्रीबाज ' निघालेच. (मोसंबी, तेरी जय हो !) सिगारेटवाले पण चार-पाच, तंबाखूबाले दहाबारा सापडलेत ! विशेष म्हणजे रॅंगिंग नावाचा गरीब होतकरू मुलांचा अश्लील छळ करणारा घृणास्पद ' फेमस प्रकार ' या ग्रामीण पोरांनाच माहीत नाही. उलट अनेकांनी रॅंगिंग म्हणजे काय ? हा प्रतिसवाल टाकलाय ! (मित्रांनो, तुम्हाला माहीत नाही तेच बराय!')

स्त्रीयांना स्वातंत्र्य ?

स्त्रीयांना स्वातंत्र्य द्यावे काय ? बायकोला समान हक्क द्याल काय ? स्त्रीयांनी नोकरी करावी काय? या प्रश्नांची उत्तरं ' महिला ' दशकाच्या निमित्ताने महत्त्वाची होती. ७५ टक्के मुलंही स्त्रीयांना स्वातंत्र्य द्यावे नि स्त्रीयांनी नोकरी पण करावी, या मताची आहेयत. पण आपल्या स्वत:च्या बायकोला स्वातंत्र्य द्यायला ५० टक्के मुलं तयारच नाहीत. (अंगावर आल्यावर काखा वर करण्याचे हे धंदे काय !) एक जीव म्हणतो, ' स्त्रीयांनी नोकरी करावी पण नोकरीत प्रेम करत बसू नये ! ' तर दुसरा म्हणतोय, ' पुरुषांनाच नोकरी मिळेना तर स्त्रीयांना कुठून देणार? ' आणि चक्क-चक्क कमाल म्हणजे अेक विद्यार्थिनी स्त्रीयांना स्वातंत्र्य देऊ नये या मताची निघालीत ! अजूनही ग्रामीण मुली पारंपरिक स्त्रीकल्पनात गुंतल्यात म्हणायचं!

सिनेमा हवा, नाटक नको

महिन्यात सिनेमा किती पाहाता? नाटककंपनीचे नाटक पाहिलेय का? या प्रश्नांची उत्तरं अपेक्षितच आलीत. सिनेमा हा ९५ टक्के मुलांना आवडतो नि महिन्यातून दोन पाहणारे ते आहेत. ग्रामीण भागातही सिनेमाने कशी लोकप्रियता गाठलीय हेच सूचित होतेय यावरून! नाटककंपनीचे नाटक मात्र ९० टक्के मुलांनी पाहिलेच नाहीय. ग्रामीण भागात कंपन्यांची नाटकं होतच नसल्यान पाहिल्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही, नि तिकिट पण कुठं परवडतात झालाच तर! (आपलं गणेशोत्सवातील ' फुकट तमाशा ' बरा!) महिन्याला

काहीच न खर्च करणाऱ्या पासून महिना ५० रु. खर्चणाऱ्यापर्यंत 'पॉकेटमनी' वाले सापडलेत. अर्थात पुण्या-मुंबईच्या पोरांच्या मानाने हे फारच 'चिल्लर' असले तरीही खेड्यापाड्यांतही पॉकेटमनीचं फॅड फेमस झालंय तर!

विज्ञानाने नवी दृष्टी दिल्याचं ७२ टक्के मुलांनी कबूल केलेय व तितक्यांनीच विज्ञानापुढे धर्मनिष्ठा टिकणार नाहीय असं छातीठोकपणे सांगितलंय ! विज्ञानाची नवी दृष्टी ग्राम युवकांतही जाऊन पोहचलीय याचंच हे प्रत्यंतर आहेय ! ४५ टक्के मुली मात्र अजूनही धर्मनिष्ठच आहेत.

आर्थिक हलाखी, छंद नॉर्मल

आपली आर्थिक परिस्थिती कशी आहे ? याचं उत्तर ८० टक्के मुलांनी वाईट आहे असं दिलंय. तर १५ टक्के मुलांनी बरी आहे असं म्हटलंय. तर ५ टक्के 'चांगले' अर्थवान सापडलेत. ग्रामीण कॉलेजं ही खऱ्या अर्थानं गरिबीनं गांजलेल्या भारताची खरीखुरी प्रतीकं आहेत हेच खरं !

आपला छंद काय ? यात खेळ, वाचन, अभ्यास आले. काही 'अेक्स्ट्रा ऑर्डिनरी' हॉबीज् आढळल्या नाहीत. तस अेकानं आपला आवडता नि एकमेव छंद हा 'प्रेम करणे हा सांगितलाय तर दुसऱ्याने 'पोरींना छेडणे' हा सांगितलाय. ग्रामीण भागातील पोरांना छांदिष्टपणा करायला वेळच कुठं मिळतोच म्हणा !

पुढारीपणाची निर्यात

भारत देशाबद्दल आपणास काय वाटते ? या प्रश्नाचं उत्तर संदिग्ध मिळालंय. तरीही सर्वांनीच भारतीय संस्कृतीचा, देशाचा अभिमान असल्याचं लिहिलंय. अर्थात बेकारी, वशिलेबाजी, लाचलुचपत यावर सर्वांनीच पेनसुख घेतलेय म्हणा ! एका चलाख मुलीने 'या देशाचे पुढारीपण निर्यात करावे' असा अभिनव सल्ला दिलाय ! तर दुसऱ्या एका मुलाने जातिभेद नष्ट करण्याकरिता प्रत्येक कॉलेजांचे प्राध्यापकांनीच कॉलेजमधील मुलामुलींचे आंतरजातीय विवाह घडवावेत असं आवाहन केलंय (काय महाराज, प्राध्यापकांना नोकरीवर राहू द्यायचं नाही काय ?)

तर असा हा ग्रामीण कॉलेजयुवकांचा प्रातिनिधिक सर्वांगीण सर्व्हे रिपोर्ट ! अशी ही त्यांची मतं ! त्यांना सामाजिक समस्यांची पूर्ण जाण आली नसली तरी अंधश्रद्धा, धर्मवेडेपणा, जातीयता याच्या विरुद्ध बंडखोरी इच्छिणारी ही धांदरणारी युवामनं ! विज्ञानाचे नव्या दृष्टीनं पुरोगामी बनू पाहणारी ! पण 'कन्यका' मात्र अजूनही पारंपरिक संस्काराच्या 'गोषातच' अडकल्यात असंच म्हणावं लागेल. तर बोला, 'स्त्री स्वातंत्र्याचा विजय असो !!'

❖



REFBK-0025583

सुधीर वामनराव गव्हाणे हे गेल्या दीड दशकापासून पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. महाराष्ट्र टाईम्समधील 'हवा कॉलेजची' व 'सांस्कृतिक स्तंभ लेखन', सा. मनोहर, सा. दिनांक मधील स्पेशल रिपोर्टस्, सा. मराठी प्लिटझ्मधील मर्मभेदी राजकीय वार्तापत्रे आणि दै. संचार, दै. मुंबई सकाळची यशस्वी बातमीदारी याद्वारे ते महाराष्ट्रातील जागृत वाचकांना परिचित आहेत. महाराष्ट्रातील बहुतेक प्रमुख वृत्तपत्रांमध्ये त्यांचे पाचशेवर लेख, वार्तापत्रे, मुलाखती, रिपोर्टस् प्रसिद्ध झालेले आहेत. १९७८–७९ साली त्यांनी विषमता निर्मूलन परिषदेवरील सा. मनोहरमध्ये प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टला राज्य पातळीवरील कै. भालाकार भोपटकर पारितोषिक मिळवून या क्षेत्रातील आपली लेखन गुणवत्ता सिद्ध केली आहे.

वृत्तपत्रांच्या रविवार पुरवणी संपादनाचे त्यांचे कौशल्य व अनुभव त्यांची संपादन प्रतिभा स्पष्ट करणारा आहे. औरंगाबादच्या दै. अजिंठाचे त्यांनी संपादिलेले रविवार पुरवणींचे विशेषांक मान्यवरांनी गौरविले आहेत. तर औरंगाबादच्या दै. लोकमतच्या 'साहित्य जत्रा' या रविवार पुरवणीच्या विशेष संपादनास सायंटीफीक टेंपरामेंट प्रमोशन ट्रस्टचा राज्यपातळीवरील 'म. फुले नियतकालिक पुरस्कार' व भारतीय पातळीवरील इंडियन फेडरेशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर्सचा विकास पत्रकारितेचा पहिला पुरस्कार मिळाला आहे.

गव्हाणेंच्या औरंगाबाद आकाशवाणीच्या तीन वर्षाच्या 'सहसंपादक (संहिता)' या पदावरील सेवेत नभोनाट्य, श्रुतिका, रूपके, भाषणे, संवाद आदि आकृतीबंधातील शंभरावर संहिता प्रसारित झाल्या आहेत. त्यांच्या 'धर्मांतर' या गाजलेल्या नाटकाचे महाराष्ट्रभर पंचेवीसावर प्रयोग झाले असून अहमदनगरच्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनातही प्रयोगाचा सन्मान नाटकास मिळाला आहे. सद्या ते मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात अधिव्याख्याता आहेत.